म. ग्रं. सं. ठाणे
विषय म०पु०
सं. क्र. ७९

# नर्मदेच्या तटाकी

REFBK-0007211

ग्रंथ
क्रमांक ७४८९
पॉ. नं. ३५५२
स्वावलंबन
म.

सन् १९६६

# नर्मदेच्या तटाकीं

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७२११
ग्रं. ५८०६
REFBK-0007211
REFBK-0007211

दर्पदमन-सामर्थ्याची वृद्धि करणारा जो अग्नी त्याची भक्तजनांनीं वेदीवर संस्थापना केली आहे. त्यास हवि अर्पण करून आम्हींहि त्याला प्रकट व्हावयास लावूं. हे सत्प्रतिपालका अग्निदेवा, पराक्रमाच्या कृत्यांत आमचा तूं प्रसन्न अंतःकरणानें संरक्षणकर्ता हो.

—ऋग्वेद

मङ्गल साहित्य प्रकाशन, पुणें ४.

तत्त्वविवेचक प्रवासवर्णन
प्रकाशन ६६ वें : पहिली आवृत्ति
गुरुपौर्णिमा, १८७१ : जुलै १९४९
पृष्ठसंख्या ७६ : मूल्य १। रुपया
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मङ्गल साहित्य प्रकाशन
संचालक : अमरेन्द्र गाडगीळ
अनुशासक : दि. वि. काळे, एम्.ए.
प्रकाशिका :
सौ. मङ्गला अमरेन्द्र गाडगीळ
मङ्गल साहित्य प्रकाशनाकरितां
आनन्दचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.
मुद्रक :
अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ
मङ्गल साहित्य मुद्रणालय
आनन्दचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.



सं. नं. ७५५

परमपूजनीय गुरुदेव !

आपली पूजा करण्यास याहून वेगळी सामग्री मजजवळ उपलब्ध नाहीं.

★

यावेळीं ज्यांचा असीम स्नेह मला आपल्या
चरणांजवळ उपलब्ध होऊं शकला, ते
**श्री. दत्तात्रेय गोपाळ जोशी**, वकील, मण्डलेश्वर
यांचेंही कृतज्ञतापूर्वक स्मरण

—गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

# जनान्तिकम्

वाचकवर्ग,

या लहानशा आयुष्यांतील जवळ जवळ बारा वर्षें परमार्थसाधनेंत व्यतीत झालीं. हातीं काय लागलें, त्याचा नक्की हिशेब मजजवळ नाहीं.

जें कांहीं मला आठवतें, त्यांतली पहिली प्रमुख गोष्ट ह्मणजे सज्जनांचा सहवास. याबद्दल मी मला धन्य समजतों. सज्जनांच्या संगतींत अध्यात्माची चर्चा करतांना आणि ऐकतांना जे कांहीं क्षण व्यतीत झाले, ते माझ्या आयुष्यांतील अत्यंत समाधानाचे क्षण आहेत.

दुसरी, तेवढीच महत्त्वाची गोष्ट—माझ्या हातून अर्धवट घडलेली नर्मदा-प्रदक्षिणा. दुर्दैवानें शरीरदौर्बल्यामुळें मला प्रदक्षिणा पुरी करतां आली नाहीं.

पण जेवढी प्रदक्षिणा झाली, तेवढा माझा काळ अत्यंत सुखांत गेला. अयाचित वृत्तीनें, बरोबर अत्यंत कमी सामान, आणि बरोबर दुसरें कोणी नाहीं, असा मी नर्मदामय्याच्या तटाकीं स्वच्छंद विहरत होतों, नर्मदामय्याशीं गोष्टी बोलत होतों आणि तिचें गुज ऐकत होतों.

त्या सुखद कालांत तिनें माझ्या मनांत जे विचार स्फुरविले, ते आपणापुढें प्रस्तुत आहेत.

यांतलें बरें आणि वाईट, दोन्ही नर्मदामाईचें.<br>
कारण माझी दृढ श्रद्धा आहे कीं,<br>
मी तिचा पुत्र आहें.

**गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर**

## संचालकीय

१६६

आणि हेंहि पुस्तक दिसावयाला एक साधें प्रवासवर्णन असलें तरी आपल्याला एक महत्त्वाचा संदेश सांगत आहे. अर्थात् पुस्तक कांहीं संदेश सांगण्यासाठीं लिहिलेलें नव्हे; तर आपले अनुभव अनेकांना सांगण्यासाठींच. तथापि, ज्या पवित्र वस्तूचें हें वर्णन आहे त्या पवित्र वस्तूच्या सान्निध्यांत संस्कारशील मनावर उमटणारे विचारतरङ्ग खरोखरीच उदात्त, मननीय, हृदयंगम, नि श्रेयस्कर आहेत. भारतमाता आपल्या अंगावर अशीं अनेकानेक उत्तमोत्तम आभरणें ल्यालेली आहे. परंतु आम्हांला त्यांचें दर्शन घेऊन कृतार्थ होण्याची बुद्धि सुचेल नि आम्ही ती तडीस नेऊं तेव्हां !—

● ● ●

ज्याला ऋजु अंतःकरण घेऊन तिज-जवळ जातां येईल, अशा प्रत्येकानें तिच्या-जवळ जावें, तिच्या कुशींत बसावें, अगदीं निःसंकोच मनानें !

कारण ती आपली आई आहे.

आणि मग तिच्या जवळून भारतीय संस्कृतीच्या पुनरुद्धाराचा तो परमतेजस्वी मंत्र घेऊन प्रत्येकानें समाजसन्मुख होऊन परतफिरावें,

अगदीं प्रत्येकानें !

● ● ●

# नर्मदेच्या तटाकीं

- जय जय जगदम्ब मात
- " नर्मदे हर ! "
- नर्मदामाईचें प्रथमदर्शन
- हरिरेव जगत्
- मातृभूची मूर्ति
- यो वै भूमा तत् सुखम्
- म हे श्व र
- घातिली रे पाणपोई !
- त स्मा त्

१६५

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ७२९९

## १ : जय जय जगदम्ब मात

नर्मदा !

फार सुंदर आहे नर्मदा.

आतां कदाचित् तुमच्या वा माझ्या सौंदर्याच्या व्याख्येंत अंतर असेल ! पण माझ्यावर अविश्वास करूं नका तुम्ही. मीझ्या दृष्टिकोनांतून पहाल तर तुम्हांलाही असें आढळेल कीं खरेंच ! कुणी कलाकारानें त्रिभुवनांतलें सगळें सौंदर्य अगदीं नाजूक हातानें हळूच गोळा केलें आणि तें इथें आणून या शिवकन्येच्या दों बाजूंनीं व्यवस्थितपणें रचलें आहे. त्या सौंदर्याच्या अपूर्व परिमलानें हा सर्व परिसर दरवळून उठला आहे.

मग तुम्ही विचाराल कीं, भल्या माणसा, तुझा दृष्टिकोन तरी कोणता ?

कदाचित् तुमच्या त्या विचारण्यास व्यंगोक्तीचा, व्याजोक्तीचा वास येत असेल. कदाचित् तुम्ही हा प्रश्न विचारतांना माझ्या या विचित्रपणाबद्दल ( ! ) आलेलें हंसूं दाबून आपापल्या मुद्रा ओढून आणलेल्या उसन्या गांभीर्यानें नटविल्या असतील. कुणाच्या प्रश्नांतून ऋजु प्रामाणिकपणाही ओतप्रोत वहात असेल.

त्या तुमच्या मुद्रांकडे, व्याजोक्तींकडे व व्यंगोक्तींकडे दुर्लक्ष करून मी असें उत्तर देईन :

माझा दृष्टिकोन !—एका अर्थानें पाहिलें तर माझा नव्हेच मुळीं तो. तो आहे ऋषींचा, आचार्यांचा. विश्वांतील चराचर पदार्थांचें मनन करीत आपल्या प्रसन्न कुटींतून पवित्र दर्भासनांवर बसलेल्या त्या ऋषींना जें स्फुरलें, तोच दृष्टिकोन मी माझा म्हणतों. प्रत्येक पदार्थाचें योग्य मूल्यमापन करण्याची अतिसूक्ष्म बुद्धि ज्या ऋषिवर्यांनीं अनेक वर्षांच्या तपश्चर्येनें प्राप्त करून घेतली, ते ऋषि जें बोलले, तें मी माझें म्हणतों.

तुम्ही विचाराल कीं, त्या ऋषींनीं केलेल्या तपश्चर्येच्या परिपाकावर तूं आपला अधिकार कसा सांगूं शकतोस ?

कसा म्हणजे ? अगदीं सहज ! कारण त्या ऋषींनीं केलेली ती तपश्चर्या काय त्यांच्या स्वतःकरितांच होती ? ह्या दशेन्द्रियांशीं त्यांनीं जो एवढा बिकट संग्राम करून आपलें मन एकाकार केलें, तें केवळ एका व्यक्तीकरितांच ? त्यांनीं रचलेले हे तपश्चर्यांचे पर्वत काय केवळ एका व्यक्तीलाच वर चढून दृष्टीच्या एका फेंकीसरशीं चहूं बाजूंना दिसणारें अनंत विश्व स्पष्टपणें पहातां यावें म्हणून ?

छे छे ! !

असें भलतें सलतें कांहीं बोलूं नका ! त्या ऋषींच्या उद्देशाविषयीं अशी शंका मनीं उपजूं देणेंही त्यांच्यावर महान् अन्याय ठरेल.

**संगच्छध्वं संवदध्वं । सं वो मनांसि जानताम् ॥**

असा संघटनेचा दुंदुभिनाद घुमवीत जे ऋषि लोकयात्रेचे अग्रदूत होऊन चालले, त्यांनीं केलेलें कृत्य हें त्यांच्या समाजाच्या हिताकरितां होतें.

आणि मी त्या समाजाचा एक घटक, या नात्यानें त्या ऋषींच्या विचार-धनाचा वारस, म्हणून ऋषींच्या दृष्टिकोनाला माझा दृष्टिकोन म्हणतों.

हो ! तुम्हीं मघां विचारलेल्या–किंवा तुमच्या मुखीं मीं घातलेल्या प्रश्नाचें उत्तर द्यायचें राहिलेंच नाहीं का ?

त्या दृष्टिकोनाचें स्वरूप असें--

**सत्यं शिवं सुन्दरम् ॥**

ही सौंदर्याची व्याख्या. जें सत्य असेल तें सुंदर. जें शिव म्हणजे कल्याण-कारक असेल तें सुंदर. हीच शब्दयोजना उलटवून अर्थ करायचा असेल तर, जें सुंदर असेल तें सत्य आणि शिव असलें पाहिजे.

ही सौंदर्याची व्याख्या तुमच्या व्याख्येशीं जुळते ? पहा जुळेल तर.

पण सत्य म्हणजे तरी काय ?

जें कृत्रिम नसेल, तें सत्य. जें सर्वभूतांचें आत्यन्तिक हित करणारें असेल तें सत्य.

**यद्भूतहितमत्यन्तमेतत्सत्यं मतं मम ॥**

ही ऋषींची व्याख्या. जें जगाचें कल्याण करणारें असेल, तें सत्य. जें शिव असेल तें सत्य. जें नैसर्गिक असेल, तें सत्य.

तर मग नर्मदेजवळ ही निसर्गजन्य कल्याणकारकता आहे का ?

हो हो ! नुसती निसर्गजन्य कल्याणकारकताच नव्हे, तर सौंदर्याचें लक्षण जी नवीनता, तीही नर्मदातटाकोंच्या प्रत्येक कणाकणांत मुसमुसलेली आहे !

**प्रतिक्षणं यन्नवतामुपैति । तदेव रूपं रमणीयतायाः ।**

प्रतिक्षणीं नवीनता ! प्रतिक्षणीं वेगळा साज ! प्रतिक्षणीं नवा वेश ! नर्मदेंत अमरकंटकाजवळ शिशूचें सारल्य आहे, अवखळपणा आहे, रुसणें आहे, फुगणें आहे. शिशु रुसला, म्हणजे कोपऱ्यांत जाऊन बसतो, दिसत नाहीं. नर्मदा रुसली म्हणजे अमरकंटकाजवळ उन्हाळ्यांत दिसेनाशी होते. शिशु इकडेतिकडे धांवतो, वागडतो. नर्मदाही अगदीं इतस्ततः वाहिली आहे अमरकंटकाजवळ. शिशु रडूं लागला म्हणजे डोळ्यांतून पाणी वहातें. नर्मदेच्या मूळ प्रवाहाला अमरकंटकापाशीं येऊन मिळालेले असंख्य जलप्रवाह पाहून एक परिक्रमावासी मला म्हणाला,

" मय्या रो रही है ! देखो, चारों ओर पानीही पानी फैल चुका है । "

" क्यों रो रही है ? " मी विचारलें.

" पिताजी उसे ससुराल भेज रहे हैं न ! " उत्तर मिळालें.

काय सुंदर कल्पना ! अगदीं घरगुती. भगवान् शंकर नर्मदेला तिच्या पतिगृहीं पाठवीत आहेत, म्हणून ती रडत्ये ! ओह् ! या कल्पनेंतही कृत्रिमता नाहीं, अगदीं मानवी स्वभावाशीं, निसर्गाशीं सुसंगत !

अमरकंटकापासून पुढें चला. जबलपूरजवळ. अन् मग तुम्हांला असें आढळेल कीं, आतां नर्मदा तरुण झाली आहे. बाल्याचा अवखळपणा संपला, आतां एकाद्या तेजस्वी ऋषिकन्येप्रमाणें तारुण्य अंगीं प्रविष्ट झालें आहे हिच्या. तारुण्यांत जें विलोभनीय सौंदर्य, शरीराचा नीटनेटकेपणा, चापल्य आणि बल शरीरीं प्रादुर्भूत होतें, अगदीं तंतोतंत तसें ओजस्वी रूप प्राप्त झालें आहे हिला.

शरीराचा नीटनेटकेपणा तर तिच्या पात्रावरूनही आढळून येईल तुम्हांला. पुढें गेल्यावर कधीं कधीं नर्मदा पात्र बदलते, पण या भागांत तेंच तें रेखीव पात्र. ठसठशीत, नीटनेटकें.

चापल्य आणि बल! जबलपुराजवळ भेडाघाटीं पहा जाऊन. एक भला मोठा खडक आडवा आला वाटेंत. त्याला वाटलें, सासरीं जाणाऱ्या या देवकन्यकेशीं दोन गोष्टी बोलतां आल्या, तर पहाव्या.

पण तेजस्विनी नर्मदा! ती त्या खडकाचें तें औद्धत्य सहन करते काय? छे! एका धडकेसरशीं त्या खडकाचें भव्य शरीर विदीर्ण करून चपलतेनें स्वतः-पुरती वाट काढीत आणि त्याच्यावर गुरगुरत नर्मदा जी निघाली, ती कसची येत्येय् त्याच्या हातीं? त्या नर्मदेनें दिलेल्या धडकेनें तो खडक भीतीनें पांढरा फिट्टक् पडला आहे! जा, अजून जाऊन पहा तिथें. तो पांढरा पडलेला खडक, आणि नर्मदेचें गुरगुरणें, दोन्ही पाह्यला सांपडतील तुम्हांला. बिचारे लोक म्हणतात, भेडाघाटला नर्मदेंत संगमरवर सांपडतो, पण त्यांना ही अंदरकी बात काय माहीत?

आणि जसजसा समुद्र जवळ येत चालला, तसतशी नर्मदेच्या गतींत पति-गृहीं जाणाऱ्या युवतीची मंथरता, मंदत्व आलेलें आढळेल. अमरकंटकाजवळचा तो अवखळपणा मागें राहिला. जबलपुराजवळील चपलताही नाहीं राहिली. आतां गुजराथेंत प्रविष्ट झाल्यावर एखादा गुर्जर युवतिसमूह मार्गानें जात असतां जसा गजगतीनें चालतो, तसें स्थैर्य प्राप्त झालें आहे हिला. नुसतें स्थैर्य नव्हे; गुर्जर रमणीची उदारताही आहे त्याबरोबर. गुजराथेंत नर्मदेच्या दों बाजूंनीं मैलोमैल पसरलेल्या खरबुजांच्या आणि कलिंगडांच्या वाड्या बघा एकदां जाऊन! उमाप पीक, भलं थोरलं फळ, त्या फळाचें उत्कृष्ट माधुर्य; सगळेंच कांहीं अलौकिक!

वाडीवाले शेतकरीही अलौकिकच. कोणी एखादा चांगला सात्त्विक परिक्रमा-वासी दिसला, कीं अत्यादरानें बोलावतील, यथावत् सत्कार करतील. तो परिक्रमावासी लाजेनें "नको नको" म्हणत असेल. पण प्रत्येक "नको" बरोबर यांच्या आदरा-तिथ्यशीलतेला अधिक चेव येईल.

एक भलें मोठें रसरसलेलें फळ आणवतील ते शेतकरी. अन् आपल्या विळ्यानें भल्या मोठ्या पण प्रमाणबद्ध, सुंदर खापा करून त्या परिक्रमावासीच्या पुढें ठेवतील. त्याला आग्रह करकरून पोटभर खाऊं घालतील. आणि मग शेवटीं त्याच्या पायां पडतील.

श्रद्धेनें परिपूरित झालेले हे, आणि संकोचयुक्त कृतज्ञतेनें ओतप्रोत झालेला तो. तो त्यांना मनोमनीं "तुमचें कल्याण होवो!" असा आशीर्वाद देईल आणि बाहेर पडेल.

आतां तुम्ही कदाचित् त्यांच्या या बावळटपणा( ! )बद्दल त्यांना हंसाल. त्यांच्या या तथाकथित व्यवहारशून्यतेबद्दल नांवें ठेवाल तुम्ही. शिवाय असेंही म्हणाल कीं, " काय मूर्ख आहेत ! स्वतःचें कलिंगड खाऊं घालून स्वतःच पायां पडतात ! "

म्हणा वापडे ! तुमच्या या प्रच्छन्न निंदेनें त्यांच्या ऋजु आदरातिथ्यांत, श्रद्धेंत कमीपणा निर्माण व्हायचा नाहीं. हा प्रकार असाच किती तरी वर्षापासून चालत आला आहे, आणि जोंपर्यंत तुमची ती पांढऱ्या पायांची तथाकथित सुधारणा ( ! ) त्या श्रद्धालु लोकांपर्यंत पोंचून त्यांचीं साधीं, सरळ मनें विषाक्त करून टाकीत नाहीं, तोंपर्यंत तो तसाच चालू रहायचा. जशी नर्मदा उदार, दों दों हातांनीं थेट अमरकंटकापासून वाहून आणलेली जलसम्पत्ति, तिचें वितरण करीत चाललेली, अगदीं तसाच गुर्जर किसान !

पण नर्मदेचें हें स्वरूपवैचित्र्य इथेंच संपत नाहीं. प्रतिवर्षीं नवीं लेणीं लेत असलेली नर्मदा ! गत वर्षीची स्थिति या वर्षीं आढळायची नाहीं. गत वर्षीं एका ठिकाणीं पर्वतप्राय वाळूचा ढिगारा असेल, तर या वर्षीं त्याच ठिकाणीं महामूर खोल पाणी असलेला डोह दिसेल; आणि लोक तुम्हांला सांगतील, " इथला ठाव पहायला सात बाजांचें सुंभ पुरत नाहीं ! " आज नर्मदातटाकींच्या एकाद्या विशाल वृक्षाखालीं बसून तुम्ही आपले श्रम दूर कराल, आणि पुढल्या वर्षीं श्रमपरिहाराकरितां पुनः तिथें याल ! पण...तुम्हांला तिथें तो अति विशाल वृक्ष–त्याचा मागमूसही आढळायचा नाहीं कुठें ! आणि त्याच्या पलीकडेच दुसरेंच एक त्या जातीचें रोपटें डौलानें वाढत असलेलें दिसेल.

सृजन आणि संहार ! उभयविध सामर्थ्य आहे नर्मदेच्या अंगीं. आपल्या या अलौकिक सामर्थ्याचा उपयोग करून नर्मदा दोन्ही तटाकीं प्रतिवर्षीं नवीन सृष्टि रचीत असते.

आणि एका वर्षांतील तिचीं विविध रूपें ! हिंवाळ्यांत जाऊन पहा.

**शरत्कालु रिगे । आणि सरिताही वोहटूं लागे ॥**

प्रतिक्षणीं क्षीयमान होत असलेलें जल, प्रतिक्षणीं अति शुद्ध होत चाललें आहे. प्रत्येक दिवशीं त्याची चव, त्याचें माधुर्य, त्याचा गोडवा, त्याचें तेज उजाळत

चाललेलें आढळेल. त्याच्या रूपांतही जी एक हिरवी, निळसर झांक आहे; इतरत्र दुर्लभ आहे ती !

हिंवाळ्यांत एकाद्या प्रभातीं नर्मदेवर चला तुम्ही. नर्मदेस शीताची बाधा होऊं नये, म्हणून सृष्टिमातेनें तिच्यावर धुक्याचें पांघरूण हळू हातांनीं घातलेलें आढळेल तुम्हांला. अन् त्या आवरणामुळें नर्मदा दिसायचीही नाहीं.

पण थोडा वेळ तिथेंच उभे रहा. भगवान् सहस्ररश्मीला एकदां या जगताच्या पटावर प्रवेश करूं द्या, अन् मग पहा. जसा एकादा पडदा हळू हळू बाजूला सरकून रंगभूमीचें दर्शन घडवितो, अगदीं तसें धुकें हळू हळू अदृश्य होईल आणि स्वतः नष्ट होऊन एका अति रम्य, अति भव्य अशा दृश्याचें दर्शन घडवील !

सबंध नर्मदेच्या तटाकावर रांगत असलेल्या गवतावर आकाशांतून अगणित मोत्यांची पखरण झालेली दिसेल तुम्हांला. पण ते मोतीं गोळा करायला जाऊं नका हं. कारण तो चारा सूर्यकिरणरूप राजहंसांचा आहे !

जों जों ऊन्ह तळपूं लागेल, तों तों नर्मदातटाक अधिकाधिक स्पष्ट होत चाललेला दिसेल. नर्मदेच्या त्या अति पवित्र जलाचें दर्शन झाल्यावर तुम्ही म्हणाल, " असें सुंदर पाणी कधींच पाहिलें नव्हतें ! "

आणि जों जों धुकें नाहींसें होत जाईल, तों तों तुमच्या दृष्टोत्पत्तीस येत जाईल कीं, अशाही थंडीच्या कडाक्यांत सूर्योदयाबरोबर सूर्यास अर्घ्यप्रदान करण्याचा नियम असलेलीं दहा-पांच माणसें आपल्या अगोदर इथें येऊन स्नान उरकून सूर्यास अर्घ्य देत म्हणत आहेत,

**सूर्याय इदमर्घ्यं दत्तं न मम ।**

त्यांच्या ठिकाणचा अहंकार गलित झाला आहे, आणि ते म्हणत आहेत, " हा सूर्यास दिलेला अर्घ्य माझा नव्हे, हा नर्मदेचा ! "

उन्हाळ्यांत चला नर्मदातटाकीं. सकाळपासून पोरें-पोरी, तरुण-तरुणी, वृद्ध-वृद्धा, सगळ्यांची गर्दी दिसेल तुम्हांला स्नानासाठीं. आणि ज्या ठिकाणीं ही पाश्चात्य संस्कृती पोंचली नाहीं, जीं माणसें अजून निसर्गापासून फार दूर गेलेलीं नाहींत, अशा अन्तर्भागांत चला. कदाचित् त्या ठिकाणीं पोंचण्याकरितां ५-५० मैल चालावें लागेल.

आणि मग त्या ठिकाणीं त्या लोकांचा स्नानाचा आनंद पहा तुम्ही. बारा-पंधरा वर्षांपर्यंतचीं पोरें तर नर्मदेवर आल्याबरोबर आपापल्या लंगोट्या सोडून भिरकावून देतील आणि नर्मदेंत उड्या घालतील. त्यांचीच आहे ती नर्मदा. तीं रोज इथें पोहायला येतात. कुठें खडक आहे, कुठें उथळ पाणी आहे, कुठें कपार आहे, कुठें डोह आहे, सगळें त्यांना माहीत आहे. पावसाळा संपल्यावर सगळें माहीत करून घेतलें आहे त्यांनीं.

पाणवठ्याचे स्वाभाविकपणें दोन भाग झालेले. एक भाग स्त्रियांचा आणि दुसरा पुरुषांचा. एकदां स्त्रियांच्या भागाकडे नजर टाका तुम्ही. या पांढऱ्या पायांच्या ' सुधारणे 'मुळें पुरुषांत निर्माण झालेला कामुकपणा आणि त्यामुळें स्त्रियांत निर्माण झालेली अवास्तव लज्जा, कुठें चुकूनसुद्धां यांचा मागमूस आढळायचा नाहीं. त्या ठिकाणीं नर्मदेंत स्नान करीत असतां स्त्रियांच्या मुद्रांवर निर्भयतेचें तेज दिसेल तुम्हांला.

तरुण आपापसांत स्पर्धा लावतांना दिसतील. " पलीकडील झाडाला कोण शिवून येतो ? " शेजारीं तरुणी स्नान करीत असून देखील यांच्या मनांत कसलेंही किल्मिष आढळायचें नाहीं. मोकळ्या मनानें स्नानें उरकतील, धोतरें पिळतील आणि निघून जातील. त्यांना स्वावलंबनाचे पाठ शिकवावे लागत नाहींत !

दुपारीं सूर्य कडाकून तापत असतां नर्मदातटाकीच्या एकाद्या विस्तीर्ण वृक्षाखालीं बसा तुम्ही. सूर्यप्रकाशानें पांढरी वाळू चमचम करतांना दिसेल तुम्हांला. नर्मदेच्या त्या अति विस्तीर्ण पात्राविषयीं तुम्ही आपल्या मनांत आश्चर्य करीत असतां अचानक एकादा उंटांचा तांडा दृग्गोचर होईल दूरवर;—

एकामागून एक, धीमी चाल चालत ते उंट नर्मदेच्या पाण्यांत प्रवेश करतील, आणि ( त्यांच्या ) छातीइतक्या पाण्यांतून पलीकडे जाऊन जसे आले तसे हळू हळू दृष्टिआड होतील. तुम्ही त्या अपूर्व दृश्याचें कौतुकच करीत रहाल !

आणि पावसाळ्यांत ? तुम्ही नर्मदेपासून अर्धा-पाव मैल लांब आहांत, तोंच गंभीर ध्वनि ऐकूं येईल तुम्हांला. अति गंभीर, अति सखोल ! उत्सुकतेनें तुम्ही नर्मदेच्या तटाकावर येऊन उभे रहाल, आणि समोर पहाल कीं;—

एक अति विशाल, अति विस्तीर्ण दृश्य आपल्यासमोर पसरलें आहे. मातकट रंगाच्या पाण्याचा एक अति विस्तृत प्रवाह आपणासमोरून अतिशय वेगानें पुढें सरकतो आहे ! जवळ जवळ एक मैल रुंदीचा !

त्या प्रवाहाबरोबर काय काय आहे ?

त्याबरोबर लांकडें, झुडपें, मेलेलीं जनावरें, मोठमोठाले भुजंग अगतिक होऊन तें पाणी नेईल तिकडे वहात आहेत. मोठमोठाले प्रचंड वृक्ष, पण त्या जल-प्रवाहाच्या विस्तीर्णतेशीं आपल्या मोठेपणाची तुलना केल्यावर लाज वाटल्यामुळें शरीरें लपवीत त्या प्रवाहाबरोबर झपाट्यानें पळत आहेत !

तुम्ही त्या अति गंभीर दृश्यापुढें स्वतःला विसरून जाल. कदाचित् तुम्हांला त्या दृश्याशीं एकाकार होऊंन जावेंसें वाटेल. या प्रवाहांत उडी घालून त्या अपूर्व दृश्यांत स्वतःला विलीन करून घ्यावेंसें वाटेल.

पण मग तुमच्या मनांत सुप्त असलेला व्यक्तित्वाचा अहंकार नागाच्या फडे-प्रमाणें डोकें वर काढील, आणि प्राणभयास पुढें करून तो म्हणेल, " तूं जिवंत परत न येऊं शकलास तर ? "

● ● ●

पण नर्मदेला मी सुंदर म्हणतों, तें या " प्रतिक्षणं नवताम् " मुळें नव्हे.

त्याचें कारण वेगळेंच आहे.

आणि तें कारण म्हणजे नर्मदेच्या कांठीं मैलोमैल पसरलेलीं दुर्गम वनें.

तुम्ही म्हणाल, " ऊंः ! त्या सृष्टिसौंदर्यामुळेंच तूं नर्मदेला सुंदर म्हणतोस ना ? मग तसलें सृष्टिसौंदर्य आमच्या खंडाळ्याच्या घाटांत आणि महाबळेश्वरींही आहे ! "

नव्हे नव्हे. सृष्टिसौंदर्यामुळें मी नर्मदेला सुंदर म्हणत नाहीं, तर त्या सृष्टीच्या दुर्गमत्वामुळें. ती सृष्टि अति दुर्गम असल्यामुळें तिथें अनेक ऋषींनीं विश्वकल्याणाकरितां तपश्चर्या केली. तिथें त्यांच्या मननांत बाध निर्माण करण्याकरितां सहजासहजीं कुणीही येणें शक्य नव्हतें. भोंवतालीं पसरलेल्या दुर्गम वनांमुळें चटकदार खाद्यपदार्थांचा तिथें अभाव होता. कंदमुळें हेंच तिथलें खाद्य अन् नर्मदेचें अति पवित्र पाणी हेंच तिथलें पेय.

या सर्व सोयींमुळें लुब्ध होऊन ऋषींनीं नर्मदातटाकीं वास्तव्य केलें. त्यांना नर्मदातटाक आवडला. इथें त्यांचें मन अगदीं सहज एकाग्र झालें. त्यांच्या इंद्रियांचा उपशम अगदीं सहज झाला. ज्या विक्षेपामुळें समाधि सिद्ध होत नाहीं, ते विक्षेप अगदीं सहज नाहींसारखे झाल्यामुळें जिकडे मन जाईल, तिकडे समाधीच लागूं लागली !

**यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधयः ।**

या स्थितीच्या अनुभवाशीं तद्रूप झाल्यावर मग त्यांनीं त्यांच्या समाजाकरितां विश्वाचें एकेक गूढ उकलून दाखविलें. त्यांचें मन अतिसूक्ष्म झालें. तें अति कठीण समस्यांमध्येंही अगदीं सहज प्रवेश करूं लागलें. आणि मग इथें बसून त्यांनीं ठरविलें कीं, व्यक्तित्वांत सुख नाहीं, समष्टित्वांत सुख आहे. मोठें तें सुखरूप.

**यो वै भूमा तत्सुखं, नाल्पे सुखमस्ति ।**

इथें बसून त्यांनीं समाजधारणेचे नियम बनविले. इथें बसून त्यांनीं समाज-कल्याणाची चिंता केली. इथें बसून ते समाजाच्या रूपाचे होऊन समाजाच्या सुखानें सुखी आणि दुःखानें दुःखी होऊं लागले.

आणि म्हणून मी नर्मदेला सुंदर म्हणतों.

कदाचित् तुम्हीही मान्य कराल कीं, "हो! खरेंच! खरोखरीच सुंदर आहे नर्मदा!"

★ ★ ★

## " नर्मदे हर ! "

नर्मदेच्या परिक्रमेंत चालत असतां भेटणारा प्रत्येक यात्रेकरू तुम्हांला हा घोष करून नमस्कार करील. तुमच्याहि तोंडांतून अभावितपणें " नर्मदे हर ! " असा उद्गार बाहेर पडेल.

हें प्रवाहपतितत्व आहे काय ?

छे ! प्रवाहपतितत्व नव्हेच हें. हा नर्मदेच्या अदृश्य पवित्रीकरण-शक्तीचा प्रकट आविर्भाव आहे. कित्येक युगें लोटलीं. नर्मदेचा तट हा ऋषीमुनींच्या अस्तित्वानें, विहारानें, संचारानें व तपानें पवित्र झाला आहे. कोणाही नर्मदातीरच्या तपस्व्याला विचारा तुम्ही. तो नर्मदा ही तपोभूमि असल्याचें सांगेल, व पुष्टीकरितां, " रेवातीरे तपः कुर्यात् मरणं जान्हवी तटे " हा श्लोकार्ध देईल.

ऋषीमुनींना रेवेचा तटच कां आवडला ? नर्मदेंत असें काय वैशिष्ट्य आहे ? कितीतरी नद्या आहेत भरतखंडांत.

**गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।**
**नर्मदे सिंधु कावेरि जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु ॥**

हा श्लोक निर्माण करणाऱ्या द्रष्ट्यास नर्मदेचें नांव आठवण्यापूर्वी परमपावनी गंगा आठवली. " गंगा " हें नांव आठवतांक्षणीं केवढा मोठा इतिहास उभा रहातो डोळ्यांपुढें. जणूं काय अगदीं थेट ऋग्वेदकालीन " सिन्धुक्षित् प्रैयमेध " हा समोर उभा राहून—

**इमं मे गङ्गे यमुने सरस्वति शुतुद्रि स्तोमं सचता परुष्ण्या ।**
**असिक्न्या मरुद्वृधे वितस्तयार्जीकीये श्रुणुह्या सुषोमया ॥**

या सूक्ताद्वारें गंगेची आळवणी करीत आहे.

तो महान् शिल्पकार भगीरथ ! केवढे उपकार आहेत त्याचे आमच्यावर ! खरोखर " भगीरथ " प्रयत्न करून त्यानें आमच्या भरतभूमींतून गंगा खेळविली ! ज्याच्यामुळें गंगेला भागीरथी हें नांव मिळालें, तो भगीरथ आठवल्याबरोबर आमच्या आजच्या अकर्मण्यतेची लाज वाटते !

त्यानंतर आठवतो वाल्मीकि. पहा तर तो म्हातारा ऋषि गंगामातेशीं कसा तदाकार झाला आहे तो ! त्याला गंगेशिवाय दुसरें कांहींही नको. भुक्ति, मुक्ति, संपत्ति, वैभव या सर्वांवर तो उदार झाला आहे. त्याला केवळ—

**त्वत्तीरे वसतस्त्वदम्बु पिबतस्त्वद्वीचिषु प्रेङ्खतः ।**
**त्वन्नामस्स्मरतस्त्वदर्पितदृशः स्यान्मे शरीरव्ययः ॥**

गंगेच्या तीरावर वसत असतां, गंगाजल पीत असतां, तिच्या लाटांवर हिंदोळत असतां, तिचें नामस्मरण करीत असतां आणि तिच्याकडे पहात असतां त्याचें शरीर त्याला पडावयास हवें आहे.

अशा त्रिभुवनपावनी गंगेपेक्षां ऋषीला नर्मदा कां आवडली ?

यमुनेचें महत्त्व कमी आहे काय ? आनंदकंद भगवान् मुकुंदाच्या मुरली-नादानें जिचें पाणी पांगुळलें, त्याच्या पदरजांनीं जिचें तटाक केवळ आपल्या दर्शनानें त्रिभुवनास पुनीत करण्याइतकें सोज्ज्वल झालें, श्रीमच्छंकराचार्यांसारख्या निर्द्वन्द्व झालेल्या महात्म्यानेंहि जिची—

**मधुवनचारिणि भास्करवाहिनि जान्हविसंगिनि सिंधुसुते ॥**
**मधुरिपुभूषिणि माधवतोषिणि गोकुलभीतिविनाशकृते ॥**
**जगदघमोचिनी मानसदायिनि केशवकेलिनिनादगते ॥**
**जय यमुने जय भीतिनिवारिणि संकटनाशिनि पावय माम् ॥**

अशी लालित्यपूर्ण स्तुति केली, त्या यमुनेपेक्षांही नर्मदा अधिक योग्य आहे ?

होय. तसें आहे खरें.

' गंगामय्या ' चें विशाल तटाक, कित्येक मैलपर्यंत पसरलेलीं मैदानें, अत्यंत सुपीक जमीन, एकंदर परिसर अत्यंत आनंददायी;—पण तो गृहस्थाला आणि वृद्ध संन्याश्याला. तपस्व्याला लागणारें खडतर जीवन गंगेच्या तटाकीं कोठेंही आढळणार नाहीं. तपस्व्याला इष्ट असणारी भव्यता ज्या ठिकाणापासून गंगेंत निर्माण झाली

तेथपासून तिचा कष्टसाध्य प्रवास संपून ती समृद्धिपूर्ण अशा प्रांतांतून वहावयाला लागते.

तीच गोष्ट यमुनेची. यमुनेवरचें वातावरण भक्तिरसानें ओथंबलेलें खरें. पण तो भक्तिरस हा " रस " आहे. कोणीही त्यांत विरघळून जावें. गोपाललालाच्या विरहकथा गात रडावें, दुसऱ्या क्षणीं हंसावें, कधीं स्तब्ध व्हावें, कधीं उन्मत्त होऊन नाचूं लागावें. तेंही ठिकाण कठोर चित्तवृत्तिनिरोधाला योग्य नव्हे.

तपश्चर्येला एकान्त पाहिजे. तपश्चर्येला पावित्र्य हवें. तपोभूमीपासून सुखोपभोगांचीं साधनें दूर असावींत. जेणेंकरून विरक्ति वाढेल, शमदमाला बळ चढेल, मुमुक्षुत्व फोफावेल, इंद्रियें ताब्यांत येतील, संयम हा सहजसाध्य होईल अशा ठिकाणीं तप केलेलें फार लवकर फलद्रूप होतें. म्हणून तपश्चर्येला खडतर जमीन असावी. तपांत जो एक प्रकाराची कठोरता, उग्रपणा आहे तो वाढीस लागेल, पण त्याबरोबरच चित्त एकाग्र होण्यास साहाय्य होईल, अशी तपोभूमि असावी.

नर्मदाकांठीं हें सगळें आहे.

ज्या एकान्तिक तपोबलाच्या जोरावर ऋषींनीं " कृण्वन्तो विश्वमार्यम् " अशी गर्जना केली, तें तेजस्वी, निग्रहशील तपोबल निर्माण करण्याचें सामर्थ्य एका नर्मदेंतच आहे.

नर्मदेवर चला एकदा. जातांक्षणींच तुम्हांला असें आढळेल कीं ज्या भूभागांतून नर्मदा वहाते त्याचें अंतस्तल कठोर आहे. ऋषींनीं नर्मदेला शंकराची पुत्री म्हटलें. स्मशानीं वास्तव्य करणारा, भस्म फासल्यानें रुक्ष दिसणारा, ' महिम्नां ' त म्हटल्याप्रमाणें,

**स्मशानेष्वाक्रीडा स्मरहर पिशाचाः सहचराः ।**
**चिताभस्मालेपः स्रगपि नृकरोटीपरिकरः ॥**

भयकारक पिशाचांनीं आवृत असलेला, हातीं नरकपाल घेतलेला असा " अमंगल " शंकर हा दिसावयाला जरी सुखकर नसला, तरी त्याच्या हृदयांतून मात्र त्याची पुत्री नर्मदा वहात आहे ! व्यवहारांत तरी मनुष्य दिसतो तसाच कोठें असतो ?

नर्मदेचा परिसर पाहूनच तर ऋषींनीं तिला " शंकरात्मजा " म्हटलें नसेल ना ! तो परिसर अगदीं शंकराच्या वर्णनासारखाच आहे.

नर्मदेच्या कांठीं हिंडत असतां मी एक म्हण ऐकली, "कांटा और आटा इनको नहीं घाटा!" अशी होती ती म्हण. बहुतेक सबंध नर्मदेचा कांठ कांट्यांनीं भरलेला. त्यांतही किती विविधता! कोठें मैलच्या मैल कडू इंद्रावनाच्या वेली पसरलेल्या, त्यांचे कांटे. कोठें हिवराच्या झाडांचें जंगल, त्याचे कांटे. कोठें बाभळींचा विस्तार पसरलेला, त्यांचे कांटे. कोठें गोखरूचीं रोपटीं पसरलेलीं, त्यांचे कांटे. कोठें कोठें निवडुंगही आहेच. याच्या भरतीला दर वर्षी पुरांत जो झाड झाडोरा वाहून येतो, त्यांतलीं शिंदीचीं, बोरीचीं झाडेंही यथाशक्ति आपलें कांटे पसरविण्याचें काम संपन्न करीत असतात. वेकळींच्या जाळ्याही नर्मदातीरीं नाहींत असें नाहीं. म्हणून प्रत्येक परिक्रमा–(प्रदक्षिणा) वासीला मोठें जपून चालावें लागतें. पण श्रद्धेनें नर्मदेची प्रदक्षिणा करणारा तो भाविक यात्रेकरू "नर्मदे हर"च्या औषधानें सगळ्या कांट्यांच्या जखमा बऱ्या करीत असतो!

एक म्हातारा यात्रेकरू "अंगं गलितं" असा, एका ठिकाणीं पायांतला कांटा टोकरीत बसला होता. मी विचारलें, "क्यौं बाबा, कांटा गड गया क्या पैरमें?"

"अरे ये तो नर्मदामय्याकी किरपा है। आखरी तपोभूमी ठहरी। यहां तो ऐसाही चलनेका। इसीमें तप है ना भय्या, इसीमें तप है। कहा है कि, रेवातीरे तपः कुर्यात्।"

तशा वृद्धवयांत तो म्हातारा तपस्वी शरीरदण्डनात्मक तप करीत असलेला पाहून मला लाज वाटली! मी विचार करूं लागलों, 'हा म्हाताराही तप करूं इच्छितो. आणि ज्यांनीं खरोखरीच तप करायला पाहिजे, त्या तपाच्या द्वारें या धकाधकीच्या मामल्यांत टिकूं शकेल असें सुदृढ शरीर कमवायला पाहिजे ते 'लाइफ् एन्जॉय्' करीत आहेत!'

पूर्वी आमच्यांत अशी प्रथा असे कीं उपनयन झाल्यावर बटूला गुरुगृहीं घेऊन जायचें. तिथें त्याला गुरुजींच्या स्वाधीन करायचा. आणि गुरुजींनीं सात-आठ, दहा-बारा वर्षे ज्याच्या त्याच्या बुद्धीप्रमाणें अध्ययन करवून घेतलें कीं मग त्याला तीर्थयात्रेला पाठवायचें.

—रेल्वेंतून नव्हे! पायीं. हेतु हा कीं, त्यानें हा विस्तीर्ण देश प्रत्यक्ष अवलोकावा. या तीर्थयात्राप्रसंगीं नाना प्रकारच्या आपत्तींशीं झुंजायची संवय होऊन तो ब्रह्मचारी बलिष्ठ, भूयिष्ठ, तेजस्वी, ओजस्वी व्हावा. आणि अशा ब्रह्मचाऱ्याचा गृहस्थाश्रम;–त्याला ऋषींनीं "धन्यो गृहस्थाश्रमः।" असें म्हटलें तर तें चुकलें कोठें?

अन् आज ?–जाऊं द्या झालें. नर्मदेच्या कथेंत या अवांतर वायफळ गोष्टी कशाला आणायच्या ?

तटाकावर कांट्यांचीं अरण्यें पसरलेली ही नर्मदा बरीच खोलांतून वहाते. कोठें कोठें खडकांशीं गांठ पडली तर त्यांनाही धडक देऊन तिनें त्यांच्यांतून वाट करून घेतली. आणि जी वरून कोसळली, ती जणूं पातळाचाच ठाव पुसायला निघाली. या खोलीमुळें नर्मदेला अडवून पाटबंधाऱ्यांच्या द्वारें तिला तिच्या परिसरांत खेळविणें अशक्यच झालें आहे. यामुळें एवढा थोरला हा जलौघ अगदीं जवळ धो धो वहात असूनही उगमापासून कित्येक मैलपर्यंत किनाऱ्यावरची शेती मात्र अशी-तशीच आहे !

खालीं गुजराथेंत गेल्यावर शें-दोनशें मैल काय तो सुपीकपणा आढळतो. पण तो नर्मदेच्या पाण्याचा गुण नव्हे, तर गुजराथची सपाट भूमीच अत्यंत सुपीक आहे. त्या शें-दोनशें मैलांत आल्यावर नर्मदाही थोडीशी विलासिनी झाली आहे. अगदीं थेट गंगेप्रमाणें वहाणारें विस्तीर्ण पात्र, मोठमोठाले घाट, सुंदर मंदिरें आणि सायंकाळीं चांदीच्या तबकांतून नर्मदेंत सोडण्याकरितां दिवे घेऊन आलेल्या गुर्जर-देशीय रमणी, त्यांच्या पायांतल्या पैंजणांचा मंजुळ ध्वनि; हें एकंदर दृश्य मोठें रमणीय असलें तरी ज्याकरितां नर्मदा प्रसिद्ध आहे, ज्या एका गोष्टीकरितां ऋषींना नर्मदा आवडली, तें तिचें वैशिष्टय मात्र गुजराथेंत गेल्यावर कमी होतें—कमी कशाचें, नाहींसेंच होतें, यांत शंका नाहीं.

हा शें-दोनशें मैलाचा टापू सोडून दिला तर वर मात्र अगदीं उगमापर्यंत नर्मदा खरोखरीच यथार्थ तपोभूमीच आहे. विशेषतः कान्हदेशांतील काठी संस्थानांतील शूलपाणीश्वराची झाडी, ओंकारमांधात्याजवळचें निबिड वन, अमरकंटका-जवळचा म्हणजे उगमाजवळचा कांहीं प्रदेश हीं स्थानें तर खरोखर अलौकिक आहेत.

तिथलें गहन अरण्य म्हणजे किती सांगूं ? ज्यांचें आयुष्य गांवांतला झाडोरा पहातां पहातां गेलें त्यांना त्या अरण्याच्या गहनत्वाची कल्पनाही करितां यायची नाहीं. वैशाखांतला प्रखर तेजस्वी सूर्य, आणि तोही अगदीं माथ्यावर आलेला. पण झाडांझुडपांची अशी कांहीं दाटी झालेली, कीं त्यांच्या फांद्या सूर्यकिरणांना वरचेवर झेलून धरून या तेजाचा टिपूस सुद्धां खालीं सांडूं देत नाहींत. एकाद्या ठिकाणीं एकादा कवडसा आलाच तर तोही अगदीं “फिल्टर” झाल्यागत गाळून यायचा.

आणि झाडें तरी किती प्रकारचीं ? मला नांवेंही सांगतां येणार नाहींत त्या सर्वांचीं. तेथल्या झाडांचें वैविध्य पाहून आपण एकाद्या वृक्षसंग्रहालयांत तर आलों नाहीं ना, असा भास होणें अगदीं स्वाभाविक आहे. पण तुम्हांला हें सौंदर्य फार वेळ बघवायचें नाहीं. कोणीकडून तरी एकाद्या रानटी जनावराचा सहज टाकलेला हिंकार कानीं पडला, कीं हा सगळा आनंद मावळतो, यांत शंका नाहीं. अशा वेळीं बरें वाटतें नर्मदेकडे पाहून. त्या गहन, भयोत्पादक अरण्यांतून अगदीं हंसत खेळत, कांठच्या झाडांझुडपांशीं गुलगुल गोष्टी करीत, खडकांना पोरकटपणें धडका देत चाललेली ही महेशनंदिनी पाहिली, म्हणजे आपल्या भित्रेपणाची लाज वाटते. या ' नर्मदामय्या 'च्या तटाकावर येऊन वसलें म्हणजे आणखी एक आनंद उपभोगायला मिळतो. तो म्हणजे सूर्यप्रकाशाचा. नर्मदेवरच काय तें ऊन्ह चकाकत असतें. आणि पाण्यावर पडलेला सूर्यप्रकाश परावर्तित होऊन आजूबाजूचीं झाडें त्या उजेडांत लकलकूं लागतात. असें वाटतें कीं नर्मदेनें स्वतःचें तेज या तिच्या कांठीं उभ्या राहिलेल्या झाडांना वांटलेंच आहे !

जेथें सुखसाधनें उपलब्ध होऊंच शकत नाहींत; अशा या निबिड अरण्यांत नर्मदेच्या सहवासांत तप होणार नाहीं, तर मग कोठें होईल ?

अनेक टेकड्यांशीं गप्पागोष्टी करीत द्रुतगतीनें नर्मदा वहात्ये आहे. अन् त्या टेकड्यांचे रंगही किती मजेदार म्हणून सांगूं ? कोठें काळाकभिन्न तर कोठें हिरवागार, कोठें पांढरा शुभ्र तर कोठें लालभडक, कोठें निळसर तर कोठें जांभळट; अशा विविध रंगांच्या टेकड्यांच्या दुबेळक्यांतून एवढा थोरला नर्मदेचा जलौघ वहात असतां पाण्याच्या प्रवाहांत त्या रंगांच्या छटा ज्या कांहीं अवर्णनीय दिसतात, त्या सांगतां पुरवत नाहींत.

नर्मदेच्या त्या अद्भुत प्रपाताचा तो घनगंभीर आवाज कानीं पडूं लागला, कीं चित्तवृत्ति स्थिर होऊं लागते. इंद्रियांची बहिर्मुख ओढ थांबते. मन आपल्या ठिकाणींच विरमतें. कां कोण जाणें, पण सहजच नेत्रांतून अश्रुप्रवाह सुरू होतो. अन् असें कांहीं अननुभूत सुख होतें कीं त्याची जात ठरविणेंच अशक्य आहे. पण हा आनंद प्रत्यक्ष अनुभवून पहाण्याजोगाच आहे. नुसतें वाचून किंवा ऐकून कांहीं तो आनंद कळायचा नाहीं.

अशा ठिकाणीं मन स्थिर होणार नाहीं, तर मग दुसऱ्या कोठें होईल ? अशी ही नर्मदा तपप्रिय ऋषींना न आवडली, तरच नवल !

जलप्रपाताविषयीं प्रसिद्ध अशीं धावडीकुंड, सहस्रधारा इत्यादि ठिकाणें आज तरी जनसमूहापासून अलिप्त आहेत; आणि म्हणूनच त्यांचें पावित्र्य टिकून राहिलें आहे. जिथें जिथें भेडाघाटाप्रमाणें लोक, मोटारी, रेल्वे यांच्या द्वारें सुधारली म्हटली गेलेली ' संस्कृति ' पोंचली तिथें तिथें त्या ठिकाणाचें पावित्र्य पूर्णपणें नष्ट जरी झालें नाहीं, तरी त्यांत बराच कमीपणा आला आहे, ही गोष्ट नाकारण्यांत अर्थ नाहीं.

धावडीकुंड आठवल्याबरोबर अंतःकरण एका विचित्र आनंददायी स्मृतीनें ओतप्रोत होतें. तिथेंही भेडाघाटासारखीच नर्मदा एका भल्या मोठ्या खडकावरून खालीं उडी घेते. नर्मदेनें आपल्या प्रवाहानें जो खडक, सुरीनें लोणी कापावें तसा कापला आहे, त्या उभ्या कड्यांत कितीतरी भुयारें निर्माण झालीं आहेत. कां अन् कशीं तें निसर्ग जाणे ! किती तरी वर्षांपासून झारीनें पाणी ओतावें, तसें नर्मदाजल खालीं ओतलें जात आहे. जेथें पाणी पडतें तेथें भला मोठा डोह निर्माण झाला आहे.

तिथें कोणत्याही भुयारांत जाऊन बसा. समोर या अद्भुत दृश्याशिवाय दुसरें कांहीं दिसणार नाहीं, आणि त्या गंभीर गर्जनेशिवाय दुसरें कांहीं ऐकू येणार नाहीं. जणू काय विश्व नांवाची वस्तु तिथें नाहींच. एक हा समोर कोसळणारा जलप्रपात आणि दुसरा त्याचा सगळ्या ध्वनींना आपल्यांत बुडवून टाकणारा अत्यंत गंभीर ध्वनि, या दोनच वस्तु शिल्लक आहेत; दुसरें कांहीं नाहीं. एकच एक दृश्य. एकच एक नाद. बाकी सगळें हरपलें. कोठें गेलें कोण जाणे !

हा ध्वनि किती वर्षांपासून गर्जतो आहे कोण जाणे !

हें दृश्य किती वर्षांपासून अस्तित्वांत आहे कोण जाणे !

तिथें सगळें लय पावलें !

मात्र एकच उरलें ! !

नर्मदेच्या या अद्भुत दृश्यानें चित्त भारावून गेल्यामुळें त्याच्या तळापासून अभावितपणें निघणारा ध्वनि—

" नर्मदे हर ! "

आणि—

तपश्चर्येचें साध्य—

चित्तैकाग्र्य !

★ ★ ★

## ३ : नर्मदामाईचें प्रथमदर्शन

प्रथम मी नर्मदेविषयीं ऐकलें धुळ्यास पांझरेच्या वाळवंटांत.

तो माझा गुरुगृहवासाचा पहिला दिवस होता. दिवसा पूज्य गुरुदेवांच्याजवळ बसून श्रीशंकराचार्यप्रणीत गीताभाष्याचें अध्ययन केलें आणि सायंकाळीं त्यांच्या-बरोबर सायंसंध्या करण्याकरतां पांझरेच्या वाळवंटीं जाऊन बसलों.

जनसंमर्दापासून दूर, पलीकडच्या तटाकावर गुरुदेवांनीं बांधलेलें गायत्री-मंदिर न्याहाळीत अलीकडल्या तटाकीं मावळत्या सूर्यास आम्ही अर्घ्य देत होतों. अर्घ्यदान करितां करितां सहज माझें लक्ष गुरुदेवांच्या चर्येकडे गेलें.

त्या चर्येवरचें पावित्र्य, जें सायंकालच्या मंद सूर्यकिरणांनीं उजळून निघाल्या-मुळें तप्त सौवर्ण मुद्रांप्रमाणें भासत होतें, तें पाहून मी अभिभूतच होऊन गेलों. पुढील संध्या तशीच शिलकेंत ठेवून मी गुरुदेवांची मुद्रा न्याहाळूं लागलों.

तो वृद्ध ऋषि, ज्यानें आपलें सबंध आयुष्य पठन-पाठनांत व्यतीत केलें, त्याव्यतिरिक्त इतर कांहीं विषयच ज्यास शिवले नाहींत, आतां जन्मभरच्या वाट-चालीनें श्रान्त झाल्यागत वाटला. हा पाठ संपला, आतां तो सुरू करायचा. कठोपनिषद् पूर्ण झालें, आतां केनास प्रारंभ करायचा. पंचदशीचें शेवटचें प्रकरण चालू आहे, आतां अद्वैतसिद्धि हातीं घ्यायची. याचा न्याय पूर्ण झाला, आतां याला वेदान्ततीर्थ करायचें. अशी घेमार देमार जन्मभर चालविली. पळमात्रही विश्रान्ति नाहीं.

पण आतां मात्र दम निघेनासा झाला आहे. जन्मभर केलेले श्रम मुद्रेवर सुरकुत्यांच्या लिपींत लिहिले आहेत. वाचतां येतील त्यानें वाचावेत. आणि मग सहजच त्याच्या मुखांतून उद्गार निघतील, “ काका, आतां विश्रान्ति घ्या तुम्ही ! ”

असे माझे वृद्ध गुरुदेव संध्या करीत होते. पांझरेचें झुळझुळ वहाणारें पाणी आपल्या थरथरत असलेल्या जीर्ण हातांनीं उचलून सूर्यनारायणाकडे दृष्टि स्थिर करून परत तिच्यांतच टाकीत होते. अचानक ते मजकडे वळले आणि म्हणाले, " ऐकलेंस गोपाल ? "

चटकन् उठून मी म्हणालों, " काय काका ? "

" अरे नर्मदेवर संध्येचा फार आनंद बघ ! संध्या करावी नर्मदेवर !

**सबिन्दुसिन्धुसुस्खलत्तरङ्गभङ्गरञ्जितम् ।**

वारंवार उठणाऱ्या तरंगांनीं सुशोभित दिसणाऱ्या नर्मदेच्या हिरव्या पाण्यानें नारायणास अर्घ्य देतांना काय शोभा दिसते म्हणून सांगूं ! जसे कांहीं आपण पाचूचे खडेच उधळतों आहोंत ! "

इतकी सुंदर आहे नर्मदा !

नर्मदेविषयीं कुणी प्रकर्षमात्रें सांगितलेलें असें मी त्या वेळीं प्रथमच ऐकलें. लहानपणीं भूगोल पाठ करीत असतां इतर नद्यांच्याबरोबर नर्मदाही येऊन गेली होती. पण ती इतकी चांगली आहे असें मला कुणी सांगितलें नव्हतें. आज प्रथमच नर्मदेच्या स्वरूपाचा स्पष्ट असा बोध झाला मला.

पण दुसऱ्या दिवसापासून अनुभव असा आला कीं, प्रत्येक दिवशीं नर्मदेची ही स्तुति ऐकायला मिळावी. सूत्रपात कुठूनही व्हावा. सरस्वती पाठशाळेच्या यज्ञमंडपांत बसून काका आम्हांला आचार्यांचें गीताभाष्य शिकवायचे. शिकवितांना एकादें पल्लेदार पण अगदीं अर्थसारल्यानें ओतप्रोत असें वाक्य आलें कीं काका म्हणायचे, " काय सांगूं रे ! आचार्य बोलायला लागले म्हणजे असें वाटतें कीं, गंगामाईच वहाते आहे. गंगौघ आहे नुसता. कुठेंही क्लिष्टता नाहीं. कुठेंही पांडित्याचा आव नाहीं. वहाती भाषा. आणि शब्दही काय, एकेक रत्नच वेंचून प्रयत्नेंकरून जुळून ठेवलं आहे ! गंगेचा प्रवाह जणूं काय !

पण नर्मदामाई ! तिची मजा कांहीं और आहे ! जाल तुम्ही कुणी नर्मदा-परिक्रमेला ? जा जमलें तर. वा ! काय आनंद आहे ! नर्मदातटाकीं काय सुख आहे ! "

अगदीं सगळ्यांनीं हपापल्यागत सगळे प्राण कानांत आणून ऐकत बसावें. आम्हाला वाटे, ' आतां आपल्याला नक्कीच कांहींतरी नर्मदातटाकींचा अनुभव ऐका-

यला मिळणार ! काका आपल्या त्या अनुभूत आनंदाच्या रसांत आम्हांलाही स्नान करूं देणार !' कारण आम्ही त्यांचे आवडते शिष्य आहोंत.'

पण बहुधा निराशेचेच भागीदार व्हायचे आम्ही सगळे. काका म्हणायचे, " तें प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय नाहीं कळायचें रे ! नुसतें सांगून तुम्हांला समजायचें नाहीं तें सुख ! "

माझ्या गुरुबन्धूंची स्थिति कांहीं मला सांगतां यायची नाहीं; मी स्वतः मात्र अस्वस्थ व्हायचा हें ऐकून. इतकें सुख आहे नर्मदेवर !

आम्ही सगळे जेवायला बसलों, म्हणजे काका यायचे आमच्या पंक्तींत आणि म्हणायचे, " बरें कारे, जेवणाचे हे बहुविध प्रकार नाहींत नर्मदेवर. पण तिथल्या अन्नांत जी एक गोडी आहे, ती कांहीं और आहे ! नुसतेच गव्हाच्या आटयाचे रोडगे. नाममात्र तूप. आणि फिकी डाल ! पण ' उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ! ' हें जितकें नर्मदेवर उमजतें, तितकें इकडे नाहीं उमजायचें. तिथल्या अन्नांत पावित्र्य आहे. इकडील अन्नांत भोगलालसा आहे. तिथलें अन्न थोडेंसेंही खाऊन तृप्तीचे ढेंकर येतात. इकडे बारा वाजतां जेवलें कीं तीन वाजतां तोंड चाळवावेंसेंच वाटतें. फार मजा आहे नर्मदेवर. तुम्ही जाल कुणी परिक्रमा करायला ? "

मी माझ्या मनालाच सांगितलें, ' मी जाईन ! '

ज्या अर्थी हा वृद्ध ऋषि नर्मदामाईच्या वेडानें असा वेडा झाला आहे, ज्या अर्थी याला जेवतां, खातां, बोलतां नर्मदा आठवते, त्या अर्थी मी जाईन नर्मदेवर. नर्मदेचें हें वेड लावणारें चांगुलपण मी हुडकून काढीन. तिच्या परिसरांत शिरेन मी. तिचें तटाक धुंडाळीन. तिच्या तीरावर हिंडेन. आणि तिच्या कुशींत बसून तिला हळूच लाडक्या शब्दांत विचारीन,

' आई ! तुझ्या चांगुलपणाचें गुपित मला सांग !

' मग मीही तुझ्यासारखा चांगला होईन. मला शिकव ती विद्या. तुझ्याजवळ असें जें जें आहे कीं ज्यामुळें शहाणीं माणसें तुझा छन्द घेतात, तें तें मला देऊन टाक. तुझी ती लोकसंग्रहाची विद्या मला दे तूं.

' ज्यामुळें ऋषि तुझ्या तीरावर वास्तव्य करण्यांत स्वतःला धन्य समजूं लागले, ज्यामुळें पिकलेल्या पानागत संसार ज्यांच्यापासून गळून पडला असे

तपस्वीही तुझ्या तटाकीं वास्तव्य करण्याच्या लोभानें मधुमक्षिकेप्रमाणें तुझ्याभोंवतीं घोटाळूं लागले, असें तें आकर्षकत्व मला दे.'

आणि एके दिवशीं मी हळूच गुरुदेवांना म्हणालों,

"काका, मी जाईन नर्मदेवर!"

उपनिषच्चिंतनांत विरूं पहाणारे गुरुदेव तटकन् भानावर आले आणि माझ्याकडे वळून म्हणाले, "काय म्हणालास गोपाल?"

"म्हटलें, आपण आज्ञा केलीत, तर मी जाईन नर्मदेवर."

गुरुदेवांची वार्धक्यमग्न मुद्रा स्नेहानें उजळून निघाली. इतके आनंदित झालेले गुरुदेव मी केव्हांही पाहिले नव्हते. जणुं वार्धक्य मावळूं लागलें आणि त्याची जागा निरागस बाल्यानें घेतली. एकाद्या लहान मुलाप्रमाणें ते म्हणाले,

"अहा! काय मजा होईल तूं गेलास तर!"—

मी नर्मदेवर गेल्यानें काय मजा होणार आहे, तें कांहीं मला कळलें नाहीं. पण मला कळलें कीं न कळलें, याची वाट न पहातां, एरवीं विद्यार्थ्याला अर्थग्रहण झाल्याशिवाय पाऊल पुढें न घालणारे गुरुदेव त्या वेळीं मात्र बोलत सुटले.

"काय मजा होईल! अगदीं अवश्य जा. अगदीं अवश्य. तुझें कल्याण होईल. खरोखरच जा गोपाल तूं! अगदीं लवकर जा! संकल्प केला कीं तें काम लांबणीवर टाकूं नये. केव्हां जातोस मग?"

"आपण सांगाल तेव्हां जाईन."

गुरुदेव उठून मजजवळ आले, आणि माझे बाहू आपल्या जीर्ण हातांनीं धरून स्नेहमयी मुद्रेनें मजकडे पहात ते म्हणाले, "अरे म्हणतोस तरी काय? अगदीं मी सांगेन तेव्हां जाशील?"

"हो! आपण म्हणत असाल कीं आत्तां नीघ, तर आत्तांच्या आत्तांही निघेन!"

त्या वृद्ध ऋषीचें अंतकरण अगदीं कांठोकांठ भरलें म्हणूनच कीं काय त्यांतील स्नेह नेत्रांवाटें वाहूं लागला. त्यांनीं मला जवळ घेतलें व थोपटून म्हणाले,

"आत्तां नको निघूंस. उद्यां अक्षय्यतृतीया आहे. सूनबाईच्या हातचें जेव उद्यां आणि मग संध्याकाळच्या गाडीनें नीघ."

— आणि मग ती रात्र नर्मदेच्या कथा सांगतां आणि ऐकतां कशी गेली कोण जाणे, पण उठून पाहिलें तों उजाडायला आलें होतें. त्या दिवशीं अक्षय्यतृतीया. सकाळींच संध्याकाळच्या प्रस्थानाची तयारी सुरू झाली. तयारी तरी काय करा-

यची होती ! दोन लंगोट्या, एक धोतर, एक सतरंजी. गीताभाष्य आणि एक तांब्या. संपली तयारी. प्रश्न उभा राहिला रेल्वेच्या भाड्याचा. पण गुरुदेवांचें नर्मदाप्रेम असें कांहीं विलक्षण कीं त्या प्रेमाच्या ओलाव्यामुळें या प्रश्नाची रखरखही नाहींशी झाली.

संध्याकाळच्या गाडीनें धुळ्याहून बसलों तों मला वाटतें दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं हर्यास पोंचलों. तेथून मोटारीनें हंडिया गांठलें. मोटार गांवांतच थांबली आणि माझें सामान घेऊन उत्सुक अन्तःकरणानें मी कुणीतरी दाखविल्या वाटेनें नर्मदामाईकडे निघालों.

आतां मला रेवामाई दिसेल ! केवढी असेल ती ! चंद्रभागेएवढी असेल का ? कीं गोदामाईएवढी असेल ? तिचें पात्र किती रुंद असेल ? आणि तिचें हिरवी झांक मारणारें पाणी !

आतां मी नर्मदामाईचें दर्शन घेईन ! वैभवशालिनी गंगा सोडून ऋषि जिच्या तटाकीं येण्याकरतां धांवत सुटले, मार्कंडेयपुत्राला जी आश्रयस्थान झाली, अशी तपस्विनी नर्मदा पाहून मी आतां अगदीं धन्य होईन.

आतां मला भगवान् शंकराची कन्या दिसेल ! त्या तपस्व्याची कन्या ! आणि म्हणूनच जी तपप्रिय आहे, अशी नर्मदामाई पाहीन मी.

आकांक्षांनीं परिपूरित असलेलें अन्तःकरण घेऊन मी नर्मदामाईकडे धांव घेत होतों. एकेका पावलागणिक आम्हा दोघांतलें अन्तर कापीत मी सपाट्यानें चाललों होतों नर्मदेकडे. इतक्यांत नर्मदातटाकीं उभ्या असलेल्या एका देवळाचें शिखर मला दिसलें. असें वाटलें कीं जणू काय तें नर्मदामाईच्या चुकलेल्या पाडसांना पालवतेंच आहे !

" या ! इकडे या ! ही इथें आहे नर्मदामाई ! तुमची आई माझ्याजवळून वहाते आहे. अगदीं माझ्या शेजारून ! या लवकर. "

त्याचा तो अनुद्घोषित् हांकारा अनुभवून मला अपरिमित सुख झालें ! किती कृतज्ञता वाढली त्या शिखराविषयीं !

**मारग चुकलें विदेशीं एकलें । तयावरी झाली दिशाभुली ॥**
**हातीं धरोनिया पावविलें घरा । तयाचिया उपकारा काय द्यावें ॥**

काय केलं म्हणजे मी त्या शिखराचा उतराई होईन ? त्यानें मला माझा हात धरून भारतीय संस्कृतीच्या एका भगिनीकडे पोंचविलं. जिच्यामुळें भारतीय संस्कृतीच्या तेजस्वितेला वाळसें चढलें, ती नर्मदामाई भेटविली त्यानें मला. मलाच काय ! कितीकांना त्या शिखरानें साद घालून इथें या संस्कृतीमातेच्या कुशींत आणून झोंपविलं असेल !

दुपारची वेळ. सूर्य आपल्या सहस्र रश्मींकडून जमीन तापवण्याचें काम अगदीं स्वतःच्या देखरेखीखालीं करून घेत होता. पण नर्मदामाईचा ध्यास लागलेला मी—त्याच्या त्या मनापासून केलेल्या कामाचें कौतुक करायला मजजवळ कुठें वेळ होता ? मी झपाझप पावलं उचलीत होतों.

देऊळ जवळ केलें मी. सामान ओवरींत ठेवून दिलं आणि अगदीं नर्मदामाईच्या कांठीं असलेल्या एका वडाखालीं जाऊन उभा राहिलों. तोंपर्यंत मी समोर पाहण्याचें टाळीत होतों. म्हटलं कीं, सगळा प्रान्त दृष्टीच्या टप्प्यांत येऊं दे. मग नजरेच्या एका झेंपीसरसा तो सगळा देखावा सावरीन. एकादा भुकेला जीव, त्याला कांहीं खायला मिळावें; अन् मग तो विचार करतो, 'आतां कुठेंतरी चांगला सांवलींत बसेन आणि मग चांगला तोंडभर घास घेऊन त्याची मौज अनुभवीन.'

अगदीं तसें झालें होतें मला. मला वडाखालीं उभें राहिल्यावर आतां पुढचें सगळें दिसेल अशी खात्री मी पटवून घेतली आणि मग डोळे मिटून मान वर केली. अन् डोळे उघडले !

मला माझ्या डोळ्यांपुढं जें दृश्य दिसलं, नजरेच्या एका भरारींत जेवढं आक्रमितां आलं, तें मी जन्मभर विसरणार नाहीं !

ओह् ! केवढं महान् दृश्य होतें तें ! तो देखावा ज्या पटावर चित्रित केलेला होता, तो पट माझ्या दृष्टीसमोरचं सगळें विश्व व्यापून त्याच्याही पलीकडे पसरला होता. त्याचें तें मोठेपण मी पाहिलें, त्याची ती महानता मी अनुभवली.

—आणि लाजेनें माझें अंतःकरण भरून गेलें. केवढा मोठा घास घेऊं पहात होतों मी ! एक क्षुद्र व्यक्ति मी ! पण तें क्षुद्रत्वच किती मोठें बनविलें होतें मीं ! माझ्या व्यक्तित्वाचा फुगा किती फुगवला होता ! यःकश्चित् कीटाणु, पण हिमालयाशीं बरोबरीच्या नात्यानें गोष्टी करूं पहात होता ! लहानशा कुरलीएवढा जन्तु समुद्राशीं मित्रत्वाचें नातें जोडूं पहात होता ! माझ्या मनालाही हा लज्जेचा भार असह्य झाला.

पण दुसऱ्या क्षणीं ती लाज वितळूं लागली, नाहींशी होऊं लागली. माझ्या मनांत एका नवीनच चांगल्या विचाराचा उदय झाला.

' पण हें महान् चित्रही माझ्यासारख्या छोट्या छोट्या वस्तु मिळूनच झालें आहे नाहीं का ? तर मग मीही त्यांतील एक वस्तु आहें. हें दृश्य मी इथें उपस्थित होण्यापूर्वीही पूर्ण होतें, मी आल्यानें त्याचें पूर्णत्व आणीकच विकसलें. आणीक कोणी येईल, त्याच्या आगमनानें ही शोभा आणीक वाढेल. पण आम्ही दोघेही या चित्रांतून बाजूला गेलों तर—

तरी या दृश्याच्या शोभेंत कांहीं उणेपणा येणार नाहीं. हें पूर्ण आहे, यांतून एकादी वस्तु काढून टाकल्यानें याच्या पूर्णत्वाला कांहीं बाध येत नाहीं—

**पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

तर मग या पूर्णत्वालाच शरण जाऊं या. याच्या पूर्णत्वानें मीही पूर्ण होईन. याच्या महानत्वानें मीही महान् होईन !

वाः ! काय सुखकर कल्पना ! माझें परिछिन्नत्व मी देईन, त्याच्या बदल्यांत मी व्यापक होईन ! माझें व्यष्टित्व देईन आणि मग समष्टीच्या आकाराचा होईन ! माझें व्यक्तित्व गळेल आणि नवें असें समाजरूप लेणें मी लेईन ! माझा परिमित ' मी ' नष्ट होईल आणि हा एवढा मोठा ' मी ' उदय पावेल ! '

आनंदानें माझें अंतःकरण भरून गेलें; आणि माझ्यापुढें पसरलेल्या त्या नर्मदामाईला आणि तिच्या परिसराला, ' हें माझें स्वरूप ' अशा आत्मीयतेनें मी नमस्कार केला ! नमस्कार केला कशाचा, नकळत हात जुळले. माझें दुसरें कांहीं शक्य नव्हतें; म्हणून !

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नं. ............

★ ★ ★

## ४ : हरिरेव जगत्

नर्मदामय्याच्या तटाकीं पहिल्या सकाळीं जागा झालों, तों कसल्या तरी अत्यद्भुत नादानें. बराच वेळ मला कांहीं उमजच पडेना. हें मी काय ऐकतोंय? कसला ध्वनि आहे हा? माझें आंतर आणि बाह्य विश्व एकदमच आपल्यांत सामावून टाकून शिवाय दशांगुलें उरलेल्या परमात्म्यासारखा अवशिष्ट राहिलेला हा ध्वनिराज आहे तरी कसला?

काय हें मेघांचें गर्जनतर्जन आहे?

छे! मेघांचें आरडणें ओरडणें इतकें सुरेल, आणि नंदादीपाच्या ज्योतीगत अखंड नसतेंच मुळीं. क्षणांतच शंभर शतघ्नी किंवा भृशुंडी एकदमच गडगडाव्या, तसल्यागत पोरासोरांना घाबरवून टाकणाऱ्या घनगर्जनेंत इतकें हें सारल्य येईल कुठून?

मग काय हे दहापांच सिंह एकदम भुईला तोंडें मिळवून हिंकार टाकताहेत?

ऊं हूं! त्या रौद्र ध्वनिसमूहाचा अकराळविकराळपणा या भावाजांत कुठें माग काढूनही गंवसायचा नाहीं. शिवाय सिंहगर्जना ही एकाद्या टेंकडीवरून पळत खालीं यावें त्याप्रमाणें पंचमांतून येऊन षड्जांत विलीन होते. हा स्वरचमत्कारही या ध्वनींत आढळत नाहीं कुठें.

तर मग हा ध्वनि कसला आहे?

लहानपणीं शाळेंत शिकलेलें विज्ञानशास्त्र मला डिंवचून हळूंच म्हणालें, "भल्या गृहस्था, पृथक्करण कर ना या ध्वनीचें!"

त्या आंतरध्वनीला मान डोलावून मी पडल्या पडल्याच माझ्या श्रोत्रेंद्रियाच्या हातीं चीरफाडीचीं शस्त्रें दिलीं. श्रोत्रेंद्रिय माझ्या या सूचनेमुळें खडबडून जागें झालें. सगळ्या ज्ञानेंद्रियांच्या शक्तींना त्यानें आपल्या घरीं पाचारण केलें, अन् त्या शक्तींच्या साहाय्यानें तें शल्यकर्म आरंभिलें.

त्या एवा अत्यद्भुत ध्वनींतून आतां मला तीन प्रकारचे सूक्ष्म भेद आढळून आले. वर वर ऐकतां तो ध्वनि एकच असल्यागत भास होत होता. पण आतां मला अशी संवेदना होऊं लागली कीं ती अद्भुतता त्याची एकट्याची मिराशी नसून तीन वेगवेगळ्या स्वरसमूहांचा तो संगम आहे.

दड् ! दड् ! दड् ! दड् !

पंचम–मध्यम–गांधार–षड्ज ! पंचम–मध्यम–गांधार–षड्ज ! पंचम–मध्यम– गांधार–षड्ज् !

पोंऽऽऽ! पोंऽऽऽ! पोंऽऽऽ! पोंऽऽऽ!

आणि मग हळूंच माझ्या मनांत जाणिवेनें प्रवेश केला, कीं ज्या मंदिराच्या अतिप्रशस्त आवारांत झोंपलों आहों आपण, त्याच्या अधिष्ठात्री देवतेची आरती चालली आहे ही, अन् त्या आरतींत मनाला तद्रूप करून टाकण्याकरितां हा भेरी, घंटा आणि शंख यांचा घोष सुरू आहे.

हळू हळू रात्रीं मनाच्या कुशींत झोंपीं गेलेली ती चिमुकली स्मृति नांवाची पोर जागी होऊं लागली, आणि मला आठवलें कीं मी काल दुपारीं नर्मदामय्याच्या तीरीं येऊन पोंचलों होतों, आणि रात्रीं या नेमावरच्या भगवान् पशुपतीच्या मंदिराचा आश्रय घेऊन स्वतःचें सर्वस्व निमूटपणें निद्रादेवीच्या हातीं सोंपविलें होतें.

मग मात्र झडझडून उठून बसलों मी. त्या दगडी ओवऱ्यांतून जरा बाहेर येऊन पाहिलें तों आकाशाचा रंग उजळूं लागला होता. तसाच महाद्वारांतून बाहेर पडून घाटावर येऊन पोंचलों . पूर्वेकडे उगवणाऱ्या शुक्राच्या ताऱ्याकडे माझी दिठी जाऊन तिथेंच क्षणभर घोंटाळली, आणि मग वर वळली.

माझ्या या छोट्याशा आयुष्यांत. मी जितकीं म्हणून सुंदर दृश्यें पाहिलीं आहेत, त्यांत त्या दृश्याचेंही नांव टाकून ठेवायला मुळींच हरकत नाहीं. मला असें वाटलें, कीं ऊर्ध्वमूल आणि अधःशाख अशा अश्वत्थ वृक्षाच्या खालीं मी उभा आहें.

त्याचीं मुळें वर अज्ञानांत–नव्हे अनन्तांत जाऊन पसरलीं आहेत. म्हणून माझी चिमुकली दृष्टि त्यांना पाहूं शकत नाहीं. लगेच माझ्या मनानें निर्णय देऊन टाकला कीं हा कांहीं दृष्टीचा दोष नव्हे. तिच्या वेंचेंत मावलें तितकें गोळा करून बाकीच्या विषयीं ती कुंठित होऊन राहिली आहे. तिच्या शक्तीप्रमाणें काम केलेंन् तिनें.

मग मी त्या मुळाचा लाग शोधणें सोडून देऊन त्या अगदीं या इकडल्या टोंकापासून पार त्या टोंकापर्यंत पसरलेल्या अश्वत्थ वृक्षाच्या शाखा न्याहाळूं

लागलों. जणूं काय त्या शाखांना खूप बहर आला आहे. अन् पिकून तेजस्वी झालेलीं खिरण्यांसारखीं छोटीं मोठीं फळेंच आकाशभर पसरलीं आहेत.

पण हेंही नव्हे. मला माझ्या ज्ञानेश्वराच्या अभंगाची आठवण झाली.

**इवलेसें रोप लावियेलें द्वारीं ।**
**त्याचा वेलु गेला गगनावरी ॥**
**मोगरा फुलला मोगरा फुलला ।**
**फुलें वेंचितां अति बहरू कळियांसी आला ॥**

मी त्या प्रस्तब्ध वेळीं अगदीं तारस्वरांत तो अभंग गाऊं लागलों. अहा! काय मौज आहे! त्या गगनापर्यंत जाऊन पोंचलेल्या इवल्याशा रोपाला हा जो कळ्यांचा बहर आला आहे, त्याची जाणीव प्रथम इतक्या प्रकर्षानें झाली एका ज्ञानेश्वरालाच. त्याला हें तारकांनीं बहरलेलें आकाश पाहिल्याबरोबर एकदम हा अभंग स्फुरला. त्याला वाटलें, या पांढऱ्या शुभ्र मोगऱ्याच्या कळ्याच आहेत कीं काय !

अभंग गातां गातां अचानक माझी दृष्टि आकाशांतून झरकन् खालीं उतरली, आणि माझ्या समोरचा प्रांत धुंडाळूं लागली. तों तिनें असें पाहिलें कीं एक अस्थिर चैतन्यमय आकाश आपल्या समोरही पसरलें आहे ! माझ्या उजव्या बाजूला कितीतरी दूरपर्यंत हा, आकाशाचें प्रतिबिंब आपल्या ठाईं दाखवणारा आरसा पसरला होता, अन् डावीकडेही !

तोंपर्यंत कितीतरी आरसे आले होते माझ्या पहाण्यांत. लहान, मोठे, अंतर्गोल, बहिर्गोल, स्वरूप विकृत् दाखविणारे, असे कितीतरी. पण हा असा एवढा मोठा आरसा, अन् तोही हलणारा, जिवंत, मी आजच पहातों आहें !

प्रत्येक चांदणी, प्रत्येक तारका आपापलें मुख या खालीं पसरलेल्या आरशांत न्याहाळते आहे. किंवा आकाशांत एकाच जागीं बसून कंटाळा आला, म्हणूनच कीं काय दुसऱ्या चांदणीचा डोळा चुकवून खालीं उतरली आहे, अन् या जिवंत दर्पणावर बसून हिंदोळते आहे. क्षणांत इथें, तर क्षणांत तिथें.

इतक्यांत पूर्व दिशा अधिकाधिक उजळूं लागली. सूर्यदादा उदयाला येणार आतां. अन् त्यांनीं जर आपल्याला इथें पाहिलं, तर डोळे वटारून विचारतील, कीं "इथें काय काम आहे ग तुमचें ? ऑं ! पळतां कीं नाहीं ?"

त्या परवडीपेक्षां अगोदरच आपण आपल्या जागीं गेलेलें काय वाईट ? या कल्पनेनें एकेक–एकेक नव्हे सगळ्याच चांदण्या हळूच दिसेनाशा झाल्या. मी अगदीं टवकारून पहात होतों. कदाचित् एखादी चांदणी परत जातांना दिसेल आपल्याला. पण कशाचें काय ! मला कांहीं पत्ताही न लागू देतां सगळ्या चांदण्या वर पळाल्या, अन् वर आकाशांत पसरणाऱ्या प्रकाशाच्या पडद्याआड दडल्या.

हळू हळू सगळें उजळूं लागलें. मी उभा होतों, त्याच्या मागें खूप मोठें सिद्धनाथाचें मंदिर अन् त्याचा विस्तीर्ण प्राकार होता. आणि माझ्या समोरून वहात होती नर्मदामय्या. खूप मोठी. केवढें मोठें पात्र. मला वाटतें, पाऊण मैल तरी असेलच. अन् या पाऊण मैलाच्या पलीकडे ज्यानें मला मय्याचें दर्शन करविलें तें देऊळ उभें होतें.

त्या सूर्यप्रकाशानें आतांपर्यंत रात्रीच्या आवरणांत झांकून ठेवलेलें तें अद्भुत रूप माझ्या समोर एखादी पैठणीची घडी उपलवावी, तशागत दृश्य केलें.

आतां कसें वर्णन करूं मी त्या रूपाचें ? मला कांहीं योग्य शब्द सुचत नाहींत. पण एवढें मात्र मला कळत होतें कीं या दृश्याचा कण अन् कण जागा झाला आहे. या माझ्या डाव्या उजव्या हातचीं हीं विस्तीर्ण झाडें जशीं कांहीं झोंपेतून उठून ताजींतवानीं झालीं आहेत. त्यांचें प्रत्येक पान लहान पोरागत वाऱ्याच्या झोतानें इकडे तिकडे हुंदडतें आहे. प्रत्येक शाखेंत जसा नवा जीव निर्माण झाला आहे.

मय्याच्या अतिशुद्ध पाण्यालाही असें कांहीं स्फुरण चढलें आहे ! प्रत्येक कल्लोल दुसऱ्याला धक्का मारीत आणि गाणीं गात उड्या मारीत सगळ्यांच्या पुढें पळायचा यत्न करतोय्. तिच्यांतल्या मत्स्यांना अन् मकरांनाही कोणीं जाऊन सांगितलें कीं सूर्योदय झालाय्. " खरेंच झालाय् ? " अशा कुतूहलानें ते सगळे हळूच वर येऊन डोकावून पाहून परत मय्याच्या कुशींत लपताहेत.

मला असें वाटूं लागलें कीं माझ्या समोर हा जो खूप मोठा वालुकासमूह पसरला आहे, त्यांतील प्रत्येक कणही जिवंत झाला आहे. मी जर त्याच्याजवळ गेलों, आणि त्याच्याशीं बोलूं शकलों, तर तो मला कितीतरी तपस्व्यांचा इतिहास सांगेल. किती तरी तपस्व्यांचीं पावलें पडून पवित्र झालेला तो कण मला त्या पवित्र ऋषींचें नर्मदा-पर्यटन उलगडून सांगेल.

माझ्या मागच्या देवळाची भिंतही बोलेल माझ्याशीं आतां ! अगदीं उत्सुक झाली आहे ती. आपली भाषा समजणाऱ्या कुणा माणसाची वाट पहाते आहे ती केव्हांची. तें शिखरही जणूं काय आतां परिक्रमावासी तापसांचीं गाणीं गाईल.

हें सगळें चैतन्य कसें निर्माण झालें या दृश्यांत ? कीं प्रारंभींच होतें हें चैतन्यमय ? अगदीं प्रारंभापासून या सगळ्यांत चैतन्य खेळतें आहे ?

मीं माझ्या मनाला प्रश्न केला.

माझ्या मनानें सांगितलें, " मला माहीत नाहीं. ऋषींना विचार हवें असलें तर. "

पण ऋषींना शोधायला कुठें जाऊं आतां ? कीं त्यांच्या ग्रंथांनाच विचारूं ? हो ! ही युक्ति बरी आहे. काय सांगतात ऋषींचे ग्रंथ या दिसणाऱ्या दृश्याबद्दल ?

**यच्च किञ्चित् जगत्सर्वं दृश्यते श्रूयतेऽपि वा**
**अन्तर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थितः ॥**

हें जें कांहीं समोर दिसतें आहे, किंवा ऐकूं येतें आहे तें सगळें आंतून बाहेरून व्यापून टाकून परत चैतन्य अवशिष्टच आहे.

इतके दिवस मी केवळ वेदान्त शिकत होतों. निवळ परोक्ष रीतीनें. पण हें सगळें विश्व, जें मी रोज पहात असें, जें हजारों लाखों लोक रोज पहातात, तें सगळें विश्व खरोखरच चैतन्यमय आहे, असा स्पष्ट बोध मला त्या क्षणीं झाला. मी तो क्षण कधींही विसरणार नाहीं. त्या पवित्र क्षणाची विस्मृति मी कधींच होऊं देणार नाहीं.

तो एकच क्षण, पण त्या एवढ्याशा ज्ञानानें मी जणूं उन्मत्त झालों. एवढ्याशा पावसानें ओढा जसा खळखळूं लागतो तसा. अवचित् सांपडलेल्या एका सुवर्णमुद्रेनें जसें एखाद्या भिकाऱ्याचें ज्ञान हरपून तो आनंदानें वेडा व्हावा, अगदीं तसा मी त्या जाणिवेनें वेडाच झालों !

दोन्ही हात वर उभवून मी ओरडूं लागलों,

**हरिरेव जगत् । जगदेव हरिः ॥**

आजूबाजूला माणसें होतीं कांहीं. पण त्यांना असले वेडे पहायची नेहमींचीच संवय असल्यानें त्यांनीं कांहीं विशेष गौरवून लक्ष दिलें नाहीं मजकडे. मी ओरडतच होतों, " हरिरेव जगत् ! "

हें सबंध विश्व हरिरूप आहे ! त्या छोट्याशा वाक्यांत केवढा प्रचंड अर्थ सांठवलेला होता ! इथें कोणी हीन नाहीं, कोणी दीन नाहीं. कोणी अनाथ नाहीं,

कोणी अपंग नाहीं. कोणी अशक्त नाहीं, कोणी रोगी नाहीं. प्रत्येक जीव हा चैतन्याचा घडलेला चिरा आहे. प्रत्येक जीव हरिरूप आहे.

आम्ही सगळे समर्थ आहोंत. संपन्न आहोंत. दीनतेचा, दौर्बल्याचा कुठें वासही नाहीं. हें विश्व इकडचें तिकडे करण्याचें सामर्थ्य असलेले आम्ही कसला दुबळेपणाचा ओंगळ किळसवाणा झगा पांघरून बसलों होतों इतके दिवस ?

## हरिरेव जगत् ।

या उज्ज्वलतम तत्त्वज्ञानास कुणीं आपल्या काळ्या घाण पदराखालीं झांकून ठेवलें होतें ? कुणीं केला होता हा घाणेरडा उपद्व्याप ?

कोणी का करीना ! आतां मी नाहीं उरूं द्यायचा हें केंबळें ओंगळवाणें तत्त्वज्ञान. दोन्ही हातांनीं खोदून फेंकून देईन हें. अगदीं सातासमुद्रापलीकडे भिरकावून देईन हें सगळें. त्या तत्त्वज्ञानाचा मागोवा काढीत जिथें जिथें तें शिरलें अन् लपलें असेल, तिथून तिथून त्याला अगदीं धुडकावून लावीन मी. सगळ्यांना ओरडून सांगेन,

ऐका हो ऐका ! **हरिरेव जगत् !**

" कहाँके निवासी हो महाराज ? " एकदम माझ्यापुढें उभ्या राहिलेल्या एका ' पंडता'नें प्रश्न केला मला. माझी धुंदी खाडकन् उतरली. असा राग आला मला त्याचा ! त्यानें परत मला नेहमींच्या जगांत आणून ठेवलें होतें. त्याला एका अक्षरानेंही उत्तर न देतां मी तडक नर्मदामय्याजवळ गेलों. घाटापासून दूर, जिथें कोणी विक्षेप करणार नाहीं, अशा जागीं नर्मदेंत उभा राहून मी तिला म्हणालों,

" आई, आई ग ! मला पुनः दे ना मघांचा आनंद ! मघांची स्थिति दे ना मला पुन्हा ! मला वेडा होऊं दे मघांच्यासारखा ! दे ना आई ! "

पण तिनें उत्तर दिलें नाहीं. जणूं तिला असेंच म्हणायचें होतें,

" पोरा, अजून खूप पहायचें आहे तुला. खूप उशीर आहे तुला तिथें पोंचायला. तुझीं खूपशीं भावंडें आहेत. दुःखी, दीन, दुबळीं. त्या सगळ्यांना बरोबर घेऊन मगच तूं तिथें पोंहोंचूं शकशील. ज्या स्थानीं तूं जायचें म्हणतोस, तें एकट्याचें नाहीं. एकट्याकरितांही नाहीं. तें आहे तुझ्या समाजाकरितां. तुझ्या सगळ्या समाजाला आलें पाहिजे या भूमिकेवर. त्याच्याभोंवतालचीं दुःखें, बंधनें झुगारून तो जोमानें, उत्साहानें उठेल त्या दिवशीं त्याच्याबरोबर तूंही येशील या ठिकाणीं ! "

★ ★ ★

## मातृभूची मूर्ति

आणि मय्याच्या तटाकीं ऋषींनीं पाडून दिलेल्या पावटीनें चालत असतां मला असा अनुभव आला कीं खरोखरच वेदान्त हा चार साधूंचा आणि पेन्शनरांचा प्रांत होऊन बसला आहे. बाकी सर्व समाज त्यापासून खूपच खूप दूर आहे.

त्याला अजून स्वतःचीं आधिभौतिक दुःखेंच निस्तरतां निस्तरतां पुरेवाट झाली आहे. अध्यात्माचा प्रत्यक्ष स्पर्शही झाला नाहीं त्याला. प्राचीन काळीं ऋषींनीं अध्यात्म प्रत्यक्ष व्यवहरून दाखवलें.

**विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि**
**शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥**

ब्राह्मण, चाण्डाल, गाई, कुत्रे या सर्वांच्या ठिकाणीं " निर्दोषं हि समं ब्रह्म " विलसतें आहे, हें त्या ऋषींनीं अनुभवलें, आणि मग हा वेदान्त प्रत्यक्ष आचरणरूप केला त्यांनीं. या आचरणापैकीं कालाच्या महान ओघामुळें धुपून धुपून जें काय त्याचें विकृत स्वरूप राहिलें असेल तेवढेंच. त्याहून पलीकडे वेदान्ताचा समाजाशीं प्रत्यक्ष असा कांहीं संबंध नाहीं.

त्याला त्याचीं आधिभौतिक दुःखेंच असह्य झालीं आहेत. आणि हें असह्यपण इतकें भयंकर आहे, इतकें रौद्र आहे, कीं कुणाला जर त्या रौद्रत्वाची क्षणमात्र यत्किंचितही कल्पना आली, तर तो त्या धक्क्यामुळें बराच वेळ मूढ होऊन बसेल !

त्या ऋषिनिर्मित पावटीचें कौतुक करीत मी तिच्यावरून हळूहळू पावलें टाकीत माझी परिक्रमेची वाट संपवीत होतों. तो ऋषींच्या मार्गक्रमणाचा बोलता अवशेष मी तसाच सुरक्षित ठेवूं इच्छीत होतों. तो तसाच रहावा अनंत वर्षेंपर्यंत. नर्मदामय्याच्या तीरीं येणारे सर्व साधक त्या ऋषिप्रणीत मार्गानेंच चालूं शकावे, अशी एक हळुवार इच्छा मीं अंतःकरणांत वागविली होती.

कितीतरी वेदान्तवेत्ते चालले असतील त्या मार्गानें.

कदाचित महामुनि वाल्मीकि सीताविरहाचीं करुण गीतें आळवीत याच मार्गानें चालले असतील.

कदाचित् महर्षि व्यास ब्रह्मसूत्रांतील " जन्माद्यस्य यतः " या सूत्रापैकीं " अस्य म्हणजे जगताचें " या पदाचा मोठेपणा अनुभवीत याच पावटीनें गेले असतील; त्यांना वाटलें असेल, ' खरोखर ! केवढें मोठें आहे हें जगत् ! खूपच मोठें. हिमालय, गंगा ही तर मोठीं आहेतच पण नर्मदाही मोठी आहे ! '

शुक, वसिष्ठ, विश्वामित्र, अगस्ति, मधुच्छन्दा, अत्रि, औड्डुलोमि, किती तरी ऋषि आठवले मला. ते सगळे या पावटीनें गेले असतील. ही पाऊलवाट त्यांनीं आपल्या त्या अतिपवित्र पादपंकजांनीं रुळविली असेल.

जों जों त्या पाऊलवाटेचा हा मोठेपणा मला जाणवूं लागला, तों तों तिच्यावर पावलें टाकावयाचा संकोच वाटूं लागला. असें वाटलं कीं—

ज्यांची थोरवी गातां गातां भल्याभल्यांची मति कुंठित झाली आहे, त्या ऋषींनीं घालून दिलेल्या पावटीनें चालायचा अधिकार तुला नाहीं. तूं आपलीं तीं घाणीनें भरलेलीं पावलें हिच्यावर आणून हिचें पावित्र्य नष्ट करूं नकोस. हा पवित्रपणा असाच कायम टिकूं दे. जो कोणी त्या ऋषींच्या योग्यतेचा असेल तोच चालूं दे या पावटीवरून.

ज्याचें " तुक करतां " तो " ब्रह्म तुकासी " आला, तो महान् तुकाराम चालूं दे या पावटीवरून. सबंध जन्म ज्याच्या मनांत ' व्यवहार-कुशलता ' या चांगल्या छान नांवाखालीं दडलेली कपटपटुता शिरूं शकला नाहीं, अशा त्या पंढरीच्या वारकऱ्याला या पावटीनें जायचा अधिकार आहे. तो जेव्हां कधीं पुन्हा " जें ऋषी बोलले ", तें " साच भावें वर्ताया " येईल तेव्हां त्याच्याकरितां तूं ही वाट मोकळी ठेव.

आणि ज्ञानेश्वर ! वा वा ! तो ज्ञानोबा तर तीर्थयात्रेचे वेळीं खचितच या वाटेनें पंढरीच्या नामदेवाबरोबर चालला असेल. वाटेनें चालतां चालतां ते जो आपापला अनुभव एकमेकांना बोलून दाखवीत असतील, तो मला ऐकायला मिळाला असता, तर किती मौज झाली असती !

मी त्यांची कामारी दासी झालों असतों. त्यांचे कमंडलु घेऊन त्यांच्या मागें चाललों असतों मी. ते थकून कुण्या झाडाखालीं बसूं लागतां मी ही माझी फाटकी सतरंजी अंथरली असती. धांवत जाऊन नर्मदामय्याचें पाणी आणलें असतें त्यांच्या-

करितां. या आजूबाजूच्या गांवीं जाऊन मी माझ्या ज्ञानोबाकरितां मधुकरी मागून आणली असती.

ते दोघे रात्रीं या झाडाखालीं झोंपले असते, तर मी पहारा करीत जागलों असतों. पण पहारा तरी कशाला ? त्यांना कोण मारतो ?

**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥**

अन् मग जे ते दोघे चित्तशुद्धीच्या पल्याडच्या थडीवर उभे होते, त्यांना कुणाचें भय ? " तस्याभयं भवति । " हें ऋषिवचन ज्यांना पाहून सार्थ झाल्याचें समाधान अनुभवूं शकलें, त्यांच्यी भोंवतीं पहारा कशाला ?

ऊंहूं ! पहारा नसता केला मीं. त्यांच्या भजनांत टाळ धरला असता. ज्ञानोबा आपलें,

**सत्य ज्ञानानंत गगनाचें प्रावर्ण । नाहीं रूप वर्ण गुण जेथें ॥**
**तो हा रे श्रीहरी पाहिला डोळेभरी । पहातां पहाणें दुरी सारोनियां॥**

असें " पहाण्याचें " गुज नामदेवाला ऐकवीत असतांना मीं हळूच कान तिकडे देऊन तें आपल्या पोटांत सांठवलें असतें. ते दोघे ब्रह्मानंदीं टाळी लागून त्या रंगांत नाचत असतां मीही आपला उगीचच नाचलों असतों त्यांच्याबरोबर; आणि जर नर्मदेच्या कुशींतच मला माझें जीवन संपवावें लागलें असतें तर ?—

वा ! मग तर त्या सुखाला कांहीं पारावारच नसता ! माझ्या शरीरांतलें हें " आकार स्थूल नाशिवन्त " पृथ्वीतत्त्व " भूमिआंत " जाऊन तिच्यांत मिसळलें असतें, आणि त्यावरून ज्ञानेश्वर चालले असते; तेवढ्यानेंच मी कृतकृत्य झालों असतों.

" दुजा गुण आपीं " मिळाला असता, तर मी नर्मदाजल झालों असतों. अन् मग रोज ज्ञानोबा स्नान करीत असतां मी त्यांच्या अंगावर खेळलों असतों, त्यांच्या पोटांत शिरून त्यांच्या त्या अतिपवित्र शरीराशीं तदाकार झालों असतों.

" तिजा तेजरूप गुण " अग्नींत जाऊन मिसळला असता, तर मी ज्ञानोबांच्या हाताच्या दिवलींत जळणारी वात झालों असतों. माझ्या प्रकाशांत त्यांनीं स्नान केल्यावर गंध लावलें असतें. मला हातीं घेऊन त्यांनीं नर्मदेची आरती केली असती.

" वायुव्यापक चौथा गुण " वायुरूप झाला असता, तर मी त्यांचीं " अष्टांगें " निववलीं असतीं. दुपारच्या कडक उन्हानें घामाच्या धारा निथळत असलेल्या ज्ञानोबांच्यावरून हळूच एखाद्या झुळकीच्या रूपानें वाहून मीं त्यांच्याकडून आशीर्वाद घेतला असता !

आणि माझ्या शरीरांतला " आकाश पांचवा गुण " हा आपल्या ठायीं जाऊन मिसळला असता, तर मी हें इथलें नर्मदातटाकींचें आकाश झालों असतों. माझ्यांत ज्ञानेश्वर-नामदेव आणि बाकी सगळे परिक्रमावासी साधुसंत विहरले असते.

नर्मदामय्याच्या कुशींत पडणाऱ्या शरिराचा विनियोग अशा प्रकारें करून मीं एका बाजूला गंमत पहात बसलों असतों.

सारखा विचारांचा प्रवाह सुरू होता. वाटेल तिकडे भरकटत ते विचार. वाटेल त्या कालांत प्रवेश करीत. अगदीं स्वच्छंदानें नाचत बागडत ते. मन असें वेदकाला-पासून तों आजपर्यंतच्या अतिविस्तीर्ण कालखंडांत हेलकावे खातें आहे आणि शरीर परिक्रमेच्या वाटेवर अग्रेसर होतें आहे, अशा स्थितींत एके दिवशीं दुपारीं मी मय्याच्या तटाकीं असलेल्या एका गांवीं जाऊन पोंचलों.

त्या गांवाच्या नांवापैकीं मला आतां त्याचें शेवटचें उपपद ' घाट ' हेंच काय तें आठवतें आहे. मय्याच्या तटीं असलेल्या गांवांना ' घाट ' असें उपपद नांवाचे शेवटीं लावण्याचा प्रघात आहे. जसें नीलकंठ घाट, सीलकंठ घाट, गोवारी घाट, भेडा घाट इत्यादि. घाट म्हटल्याबरोबर आमच्या डोळ्यांपुढें एक वेगळी कल्पना उभी रहाते. पण त्या प्रांतांत घाट शब्दाचा अर्थ पाणवठा, जिथें माणसें स्नान करूं शकतात अशी जागा.

दुपारचे बारा वाजले होते. पायांना अगदीं चटाचट चटके बसूं लागले होते. अन् त्यांत एखादे ठिकाणीं पाउटी नर्मदेच्या वाळवंटांतून जात असायची. त्या वाळवंटांतली वाळू म्हणजे पांढरीफेक, समुद्रावरच्या वाळूसारखी. बारीक पांढरी वाळू चालायलाही थोडा प्रतिबंध करणारी आणि तापली म्हणजे कांहीं विचारणेंच नको ! त्या तसल्या रसरसलेल्या वाळूंत एक पाय घालायचा, अन् दुसरा काढायचा. शिवाय मुद्रेवर विपरीत भाव दिसतां उपयोगाचे नाहींत ! हें सगळें अगदीं हंसत खेळत सहज करायचें. तितिक्षा इतकी वाढवायची, कीं या सगळ्या कष्टांचा शरीरावर परिणाम भलेही होवो, मनावर मात्र कांहींही न उमटावें. तितिक्षा ही तपाची सहचरी आहे.

एका आम्रवृक्षाखालीं थांबलों मी. त्याचीं पानें उन्हानें त्रस्त झालेल्यांना

घालवीत होतीं. तीं म्हणत होतीं, " या श्रांतांनो, आम्ही आहोंना इथें ! याच वेळीं तर आमचा खरा उपयोग करून घ्यायचा तुम्ही. तुम्हांवर सांवलीचें पांघरूण घालून आम्हांला आमचीं जीवनें सार्थ करूं द्या !"

*त्यांचें तें निमंत्रण स्वीकारून मी* त्या वृक्षाच्या आसऱ्यास गेलों. सगळीकडे कसें धगधगत होतें. पुढल्या वर्षींचीं पिकें चांगलीं यावींत, म्हणून सगळी जमीन *भाजून काढायची होती* सूर्यनारायणाला. त्याचे किरण प्रत्येक मातीच्या कणाला जागें करून आपल्या ऊष्णतेचें दान करीत होते. दानयज्ञच चालवला होता त्यांनीं. अन् त्या यज्ञांतील धूर मृगजळाच्या रूपानें आकाशाकडे झेंप घेत होता.

कुणी चिटपांखरूं दिसत नव्हतें नर्मदेवर. गांव मय्यापासून एका फर्लांगावर वसलें होतें. तिच्या ऐन कांठावर एक चंद्रमौळी झोंपडीच काय ती कशीबशी उभी राहिली होती.

मी, नर्मदेवरून भरून आणलेला पाण्याचा तांब्या उन्हाची झळ न लागेल अशा ठिकाणीं ठेऊन दिला अन् माझी फाटकी सतरंजी पसरून 'गीताभाष्य' उशाला घेऊन जरासा पहुडलों. मय्या हें पांढऱ्या वाळूचें वस्त्र कसें ल्याली याचा विचार करूं लागलों मी. पण मन विचार करीत असलें म्हणून डोळे काय स्वस्थ बसताहेत ! ते उगीच इकडे तिकडे भटकतच होते.

अचानक त्यांनीं पाहिलें कीं माझ्या समोरच्या त्या एकुलत्या झोंपडींतून एक लहानगें पोर बाहेर पडलें. लहानगें म्हणजे किती, एक आठ वर्षांचें असेल. कार्टें-कभिन्न. कमरेला करगोटाही नाहीं, मग लंगोटी कुठली ? केंस उनाड गवतागत वाढलेले. अगदीं आईच्या उदरांतून जसें बाहेर पडलें, तसें तें पोर झोंपडींतूनही बाहेर आलें.

त्याच्या खांद्यावर एक खापरी घागर होती. ती आपल्याला पडलेलें छिद्र एवढ्या लांब बसलेल्या मला दाखवून कुणी तरी केव्हांतरी आपल्याला दगड मारल्याची तक्रार करीत होती. मी अंदाज बांधला कीं तो दगडही लहानसहान नसावा. चांगल्या पेवंदी बोराहून मोठा असला पाहिजे तो. एऱ्हवीं एवढें मोठें भोंक पडायचें नाहीं.

प्रथम तें पोर एवढ्या आगींत कुठें निघालें मला कांहीं कळेना. पण तें जेव्हां नर्मदामय्याकडे वळलें, तेव्हां मी जागच्या जागींच अस्वस्थ झालों. 'हें पोर आत्तां मय्यावरून पाणी आणणार ?'

छे! काय पेटलें आहे रान नुसतें! अगदीं फुटाणे भाजून घ्यावेत तसलें! अशा वेळीं माझा कट्टर शत्रु मजपुढें उभा राहिला असता, तरी मी त्याला तसल्या त्या आगींतून नर्मदेवरून पाणी आणण्याची शिक्षा दिली नसती. अन् हें तर बारकें पोर आहे कोंवळें!

आपल्या इकडे एवढाल्या पोरांना त्यांच्या आया संध्याकाळीं ४ वाजतांही ऊन्ह लागेल म्हणून घराबाहेर पडूं देत नाहींत! सहा सात वर्षांचीं पोरें टकुचीं टोपरीं ल्यालेलीं अन् काजळ घातलेलीं पाहिलीं आहेत मीं. अन् हें सात-आठ वर्षांचें पोर या भडकत्या धगींत नर्मदेवर जाणार?

माझे विचार अन् त्या पोराचे पाय, दोन्ही एकदमच चाललीं होतीं. विचार प्रतिक्षणीं विजेचे धक्के खात पुढें सरत होते, अन् तें असाहाय्य पोर तडफडत, उड्या मारीत, झोंके खात, धांवत नर्मदा जवळ करीत होतें. एकदां मला वाटलें कीं आपण जाऊन त्याला पाणी आणून द्यावें.—पण नेहमींप्रमाणें हें मला तें पोर नर्मदे-वरून परतल्यावर मग सुचलें.

त्या घागरीच्या भोंकांतून गळणाऱ्या पाण्याचा अभिषेक होतो आहे अन् खालीं जळत्या इंगळावरून चालल्यागत होतें आहे, असें तें पोर घागर घेऊन परतलें. माझें जिज्ञासु मन मला म्हणालें ‘चल, त्या पोराला आत्तां पाणी आणण्याची काय आवश्यकता निर्माण झाली तें पाहूं.’

निघालों त्या झोंपडीकडे. पाय भाजतच होते. पण विचार केला कीं त्या पोराच्या पायांपेक्षां तर कांहीं अधिक भाजत नाहींत. त्या झोंपडीजवळ जाऊन पाहिलें मी. एखादें गुरूं मरून पडावें, अन् मग कोल्ह्याकुत्र्यांनीं अर्धवट खाऊन त्याचा सांगाडा उरावा अगदीं तशी ती झोंपडी भेसूर दिसत होती. वर आंथरलेलें केंबळही त्राणहीन होऊन गळून पडलें होतें. म्हणून तिच्या पाठीमागें उभा राहूनही मी आंतला प्रकार न्याहाळूं शकलों.

आंत एकाबाजूस बसलें होतें तें नागवें पोर अन् त्याच्यासमोर बसली होती त्याची आई. ती स्त्री आहे, हें मी वाळलेल्या गवताप्रमाणें डोईवर भुरभुरणाऱ्या तिच्या केसांवरून अन् खालीं लटकणाऱ्या तिच्या स्तनांवरून ओळखलें. केवळ लाज झांकण्यापुरतें एक पटकुर नेसली होती ती. त्या पटकुराचा मूळ रंग कोणता हा खरोखर दहा पांच विज्ञानशास्त्रवेत्त्यांच्या चर्चेचा विषय झाला असता!

घालवीत होतीं. तीं म्हणत होतीं, "या श्रांतांनो, आम्ही आहोंना इथें! याच वेळीं तर आमचा खरा उपयोग करून घ्यायचा तुम्ही. तुम्हांवर सांवलीचें पांघरूण घालून आम्हांला आमचीं जीवनें सार्थ करूं द्या!"

त्यांचें तें निमंत्रण स्वीकारून मी त्या वृक्षाच्या आसऱ्यास गेलों. सगळीकडे कसें धगधगत होतें. पुढल्या वर्षींचीं पिकें चांगलीं यावींत, म्हणून सगळी जमीन भाजून काढायची होती सूर्यनारायणाला. त्याचे किरण प्रत्येक मातीच्या कणाला जागें करून आपल्या ऊष्णतेचें दान करीत होते. दानयज्ञच चालवला होता त्यांनीं. अन् त्या यज्ञांतील धूर मृगजळाच्या रूपानें आकाशाकडे झेंप घेत होता.

कुणी चिटपांखरूं दिसत नव्हतें नर्मदेवर. गांव मय्यापासून एका फर्लांगावर वसलें होतें. तिच्या ऐन कांठावर एक चंद्रमौळी झोंपडीच काय ती कशीबशी उभी राहिली होती.

मी, नर्मदेवरून भरून आणलेला पाण्याचा तांब्या उन्हाची झळ न लागेल अशा ठिकाणीं ठेऊन दिला अन् माझी फाटकी सतरंजी पसरून 'गीताभाष्य' उशाला घेऊन जरासा पहुडलों. मय्या हें पांढऱ्या वाळूचें वस्त्र कसें ल्याली याचा विचार करूं लागलों मी. पण मन विचार करीत असलें म्हणून डोळे काय स्वस्थ बसताहेत! ते उगीच इकडे तिकडे भटकतच होते.

अचानक त्यांनीं पाहिलें कीं माझ्या समोरच्या त्या एकुलत्या झोंपडींतून एक लहानगें पोर बाहेर पडलें. लहानगें म्हणजे किती, एक आठ वर्षांचें असेल. काळें-कभिन्न. कमरेला करगोटाही नाहीं, मग लंगोटी कुठली? केंस उनाड गवतागत वाढलेले. अगदीं आईच्या उदरांतून जसें बाहेर पडलें, तसें तें पोर झोंपडींतूनही बाहेर आलें.

त्याच्या खांद्यावर एक खापरी घागर होती. ती आपल्याला पडलेलें छिद्र एवढ्या लांब बसलेल्या मला दाखवून कुणी तरी केव्हांतरी आपल्याला दगड मारल्याची तक्रार करीत होती. मी अंदाज बांधला कीं तो दगडही लहानसहान नसावा. चांगल्या पेवंदी बोराहून मोठा असला पाहिजे तो. एऱ्हवीं एवढें मोठें भोंक पडायचें नाहीं.

प्रथम तें पोर एवढ्या आगींत कुठें निघालें मला कांहीं कळेना. पण तें जेव्हां नर्मदामय्याकडे वळलें, तेव्हां मी जागच्या जागींच अस्वस्थ झालों. 'हें पोर आत्तां मय्यावरून पाणी आणणार?'

छे ! काय पेटलें आहे रान नुसतें ! अगदीं फुटाणे भाजून घ्यावेत तसलें ! अशा वेळीं माझा कट्टर शत्रु मजपुढें उभा राहिला असता, तरी मी त्याला तसल्या त्या आगींतून नर्मदेवरून पाणी आणण्याची शिक्षा दिली नसती. अन् हें तर बारकें पोर आहे कोंवळें !

आपल्या इकडे एवढाल्या पोरांना त्यांच्या आया संध्याकाळीं ४ वाजतांही ऊन्ह लागेल म्हणून घराबाहेर पडूं देत नाहींत ! सहा सात वर्षांचीं पोरें टकुचीं टोपरीं ल्यालेलीं अन् काजळ घातलेलीं पाहिलीं आहेत मीं. अन् हें सात-आठ वर्षांचें पोर या भडकत्या धर्गींत नर्मदेवर जाणार ?

माझे विचार अन् त्या पोराचे पाय, दोन्ही एकदमच चाललीं होतीं. विचार प्रतिक्षणीं विजेचे धक्के खात पुढें सरत होते, अन् तें असाहाय्य पोर तडफडत, उड्या मारीत, झोंके खात, धांवत नर्मदा जवळ करीत होतें. एकदां मला वाटलें कीं आपण जाऊन त्याला पाणी आणून द्यावें.—पण नेहमींप्रमाणें हें मला तें पोर नर्मदे-वरून परतल्यावर मग सुचलें.

त्या घागरीच्या भोंकांतून गळणाऱ्या पाण्याचा अभिषेक होतो आहे अन् खालीं जळत्या इंगळावरून चालल्यागत होतें आहे, असें तें पोर घागर घेऊन परतलें. माझें जिज्ञासु मन मला म्हणालें ' चल, त्या पोराला आत्तां पाणी आणण्याची काय आवश्यकता निर्माण झाली तें पाहूं.'

निघालों त्या झोंपडीकडे. पाय भाजतच होते. पण विचार केला कीं त्या पोराच्या पायांपेक्षां तर कांहीं अधिक भाजत नाहींत. त्या झोंपडीजवळ जाऊन पाहिलें मी. एखादें गुरूं मरून पडावें, अन् मग कोल्ह्याकुत्र्यांनीं अर्धवट खाऊन त्याचा सांगाडा उरावा अगदीं तशी ती झोंपडी भेसूर दिसत होती. वर आंथरलेलें केंबळही त्राणहीन होऊन गळून पडलें होतें. म्हणून तिच्या पाठीमागें उभा राहूनही मी आंतला प्रकार न्याहाळूं शकलों.

आंत एकाबाजूस बसलें होतें तें नागवें पोर अन् त्याच्यासमोर बसली होती त्याची आई. ती स्त्री आहे, हें मी वाळलेल्या गवताप्रमाणें डोईवर भुरभुरणाऱ्या तिच्या केसांवरून अन् खालीं लटकणाऱ्या तिच्या स्तनांवरून ओळखलें. केवळ लाज झांकण्यापुरतें एक पटकुर नेसली होती ती. त्या पटकुराचा मूळ रंग कोणता हा खरोखर दहा पांच विज्ञानशास्त्रवेत्त्यांच्या चर्चेचा विषय झाला असता !

डोळ्यांच्या खांचेच्या आंत खोल खोल दोन बुबुळें अंधुक दिसत होतीं. सामान्य मनुष्याच्या डोळ्यांत दिसणारें तेज ती किती दिवसापासून गमावून बसली होती, कीं सबंध जन्मांत तिला कधींच तें तेज लाभलें नाहीं हें कांहीं मीं तिला विचारलें नाहीं. गालांच्या ठिकाणीं दोन खळगे पडून त्यांचे तळ एकमेकांना भेटूं पहात होते. एक जिवंत नरकंकाल, बोलता सांगाडा बसला होता माझ्यासमोर.

ती त्याची आई अन् तें पोर दोघेंही त्यांच्यामध्यें असलेल्या एका खापराकडे भुकेल्या लांडग्याच्या दृष्टीनें पहात होतीं. अर्धी वाळकी भाकरी होती त्या खापरांत. त्यांच्या दृष्टींतली ती वखवख पाहून मी सुद्धां भ्यालों. हीं दोघें मजवर तर झडप घालून मला चावून टाकणार नाहींत! एक पाऊलभर मागें सरकलों मी.

एवढ्यांत त्या आईचा वाळका हात पुढें झाला. त्या हातांत एक भाकरीचा तुकडा होता. पटकन् त्या हातावर त्या पोरानें झडप घातली. अन् खूप दिवसांचें उपाशी कुत्रें ज्या आवेशानें त्याच्या पुढें टाकलेला तुकडा गपागप गिळतें, अगदीं तसा त्यानें तो तुकडा चावून गिळून टाकला. आईही अगदीं तशीच भाकरी गिळूं लागली.

एका दोन क्षणांत त्या पोराची भाकरी संपली आणि त्यानें त्या खापरावर झेंप घेतली. त्या आईनें लडखडत त्याला दूर लोटलें अन् गुरगुरत म्हणाली,

"अरे! मुझे चाहिये ना! क्या अकेला खाकर मरेगा?"

मग पुढें मीं जें दृश्य पाहिलें तें सांगायला मला लाज वाटते. कधीं कधीं मनांत विचार येतो, कीं तें भयानकतेच्या मर्यादा वलांघून पलीकडे गेलेलें दृश्य पाहून मी जिवंत कसा राहिलों?

पण राहिलों खरा. अन् मी माझ्या डोळ्यांनीं असें पाहिलें कीं तीं मायलेंकरें एकमेकांवर तुटून पडलीं!

कवींनीं मायलेंकरांच्या प्रेमाचें वर्णन केलें आहे. मला वाटतें कीं जर त्या सगळ्या कवींना तें द्वंद्व दाखविलें असतें, तर त्यांनीं खचितच पळत पळत येऊन आपल्या त्या साऱ्या कविता नर्मदेंत बुडवून नाहींशा करून टाकल्या असत्या!

त्या पोरानें आपल्या जननीच्या झिंज्या धरून लडखडत तिला सपाटे मारायला प्रारंभ केला अन् ती आई आपल्या बाळाच्या अंगाचे आपल्या वाढलेल्या नखांनीं ओरबाडे काढूं लागली!

मी परत फिरलों. आणि माझ्या मनाला म्हणालों, ' वेदान्तांत विरू पहाणाऱ्या मूर्खा, ही बघ तुझ्या आईची मूर्ति ! तूं मोठमोठाले बंगले आणि मोटारी उडविणारे खुशालचेंडू श्रीमंतही पाहिले आहेस. आतां हेंही दृश्य बघ. एकाच समाजपुरुषाचीं हीं दोन अंगें आहेत. वैयक्तिक मोक्षाच्या मागें धांवणाऱ्या सद्गृहस्था, जोंपर्यंत तुझा समाजपुरुष आपल्या या जीर्णशीर्ण अंगांचें निरीक्षण करण्याएवढा सावध बनत नाहीं, तोंपर्यंत तुला मोक्षाच्या मागें लागण्याचा अधिकार नाहीं.

' नाहीं ! कधींही नाहीं ! '

★ ★ ★

## ६ : यो वै भूमा तत् सुखम्

मला एक वेगळा दृष्टिकोन प्राप्त झाला. केवळ व्यक्तीचें हित हें हितच नव्हे- जोंवर हिताहिताचा विचार सामाजिक दृष्टिकोनांतून केला जात नाहीं, तोंवर तो विचार म्हणजे आंधळ्या गरुडाचे पांख मिळणें. याहून अधिक मूल्य नाहीं त्याला.

तर मग ऋषि नर्मदेच्या तटाकीं कां हिंडले ? कां झिजविला त्यांनीं हा कांठ ? त्यांचे हे प्रयत्न वैयक्तिक मोक्षाकरितां नव्हते का ? केवळ आपण एकट्यानेंच आपल्या भोंवतींचीं संसारबंधनें तटतटा उखळून चहूं दिशांस झुगारून द्यावींत, एवढ्याचकरितां त्यांनीं मय्याच्या तटाकीं स्वतःला बांधून घातलें नाहीं का ?

खूप विचार करून पाहिला मी. पण कांहीं उत्तर हातीं लागेना माझ्या. पुढें पुढें तर याविषयीं विचार करण्यास बसायचें म्हटलें कीं माझें मनरूपी घोडें कांहीं केल्या पाऊलच उचलीना ! त्याला विनवून पाहिलें, आंजारून पाहिलें, गोंजारून पाहिलें, धाकदपटशाचाही प्रयोग करतां आला तितका करून पाहिला; पण त्यानें जी आपली पाठ त्या विचारांकडून फिरविली तें कांहीं केल्या तो मोहरा घेईना.

शेवटीं ठरविलें कीं मय्यालाच जाऊन हें कोडें घालूं या. तसाच गेलों तिच्या कांठावर. आणि तिला म्हणालों,

" आई ग ! तूं सर्वसाक्षी आहेस. कितीतरी ऋषि मुनी तुझ्या कांठावरून हिंडत असतां तूं त्यांना पाहिलें आहेस. त्यांचीं बोलणीं ऐकलीं आहेस तूं. त्यांनीं जेव्हां निरनिराळे संकल्प केले असतील, त्यावेळीं तुझ्याएवढा श्रेष्ठ साक्षीदार दुसरा न गवसल्यामुळें त्यांनीं तुलाच सुपारी दिली असेल. त्यांचे संकल्प, त्यांच्या प्रतिज्ञा, त्यांचे निर्धार, त्यांच्या योजना सगळें सगळें तुला माहीत आहे.

तर मग तूंच सांग ना मला ? त्यांच्या योजना वैयक्तिक मोक्षाविषयीं होत्या का ? त्यांनीं, केवळ त्यांनीं हें परतंत्रतेचें बंधन वलांडून पैलथडीस जाऊन लागावें याच कल्पनेनें ते तुझ्या तीरीं ठाण मांडून बसले होते का ?

सांग आई ! मी अस्वस्थ झालों आहें. त्या ऋषींविषयींची माझ्या मनींची पूज्य भावना मळूं पहात आहे. वैयक्तिक मोक्षाच्या मागें लागलेला मनुष्य हा स्वार्थी असतो असें तूंच शिकविलेंस ना मला ?

तर मग आतां माझी ही तोल गमावीत असलेली सद्भावना तूंच नीटनेटकी आणि सुदृढ कर. तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणाकडे धांव घेऊं मी ?"

आईनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. अन् ती उत्तर देणार नाहीं हें मला अगोदरच माहीत होतें. तरी माझ्या मनांतही कांहीं प्रकाश पडला नाहीं. तशाच मनःस्थितींत मी पुढें निघालों.

प्रतिदिनीं सकाळीं उठल्यावरोबर नर्मदेचें दर्शन व्हायचें. तिचा तो विस्तार, मोठेपणा दृष्टीस पडल्यावरोबर रात्रभर आपल्या खोपट्यांत गुरफटून झोंपीं गेलेलें मन एकदम मोठें होऊं पहायचें. पण तें एकदम मोठें होणेंही प्रथम प्रथम त्याला झेंपलें नाहीं. इतकी पवित्र, इतकी विशाल, इतकी मोठी वस्तु पहाणें आजपर्यंत त्याला कधीं माहीतच नव्हतें. कितीतरी देवळें पाहिलीं होतीं मीं. पण तीं देवळें हीं पोरींच्या खेळांतल्या घरकुलागत आणि त्यांतले देवही इवले इवले. भव्यता, मोठेपणा नाहींच कुठेंही. अन् त्यांत देवळांतल्या पुजाऱ्यांनीं त्या देवांची चालविलेली थट्टा पाहून तर कुठल्याही देवळांत दर्शनाला जाऊं नये, असें वाटूं लागलें होतें मला.

**न तस्य प्रतिमा अस्ति यस्य नाम महद्यशः ।**

ज्या देवानें "हें विश्व निर्मियेलें," "महर्षि देवां संस्थापिलें," आणि हें सगळें कुणाच्याही साहाय्याची वाट न पहातां "आपुलिया सत्तामात्रें" घडविलें तो एवढा मोठा परमात्मा एवढयाशा मूर्तीतच येऊन घर करून राहिला आहे, हें तर मलाही पटत नाहीं. पण याचा अर्थ तो त्या मूर्तींत नाहींच असा करायचा का ? मग—

**अणोरणीयान् महतो महीयान् ।**

या ऋषिवचनाला काय अर्थ उरला ? देहूच्या तुकोबांनीं जो त्याला "अणुरणीया थोकडा । तुका आकाशाएवढा ।" असा "येचि देहीं येचि डोळां", बघितला तो व्यर्थच असें म्हणायला माझी जीभ कांहीं धजावत नाहीं.

तुकोबा खोटें कशाला सांगतील ? छे ! अगदीं कल्पनाही असह्य आहे. जो वारकरी शिववाच्या पालखीभर मोहरांना लालचावला नाहीं तो खोटें कशाला बोलेल ? जगानें त्याला साधु म्हणावें म्हणून ?

जगाची परवा त्यानें मुळींच केली नाहीं. "साना थोराची" "भीडभाड" न धरतां जो खरें बोलत सुटला, त्याला खोटें बोलून काय लाभ ?

आणि माझा ज्ञानोबा ! त्यानें तर आपल्या स्वतःच्या अनुभवाच्या पुढें "शिव कां श्रीवल्लभ" यांचेंही म्हणणें रद्दबातल करून टाकलें. अन् मग तो ज्ञानोबाच मीं "श्रीहरी" "विटेवरी" उभा असलेला "डोळेभरी" पाहिला असा निर्वाळा देऊन टाकीत नाहीं का ?

आतां कुणी म्हणेल कीं, तुकोबा, ज्ञानोबा, हीं भक्त माणसें;—त्यांना कांहीं विशेष अनुभव आले असतील. त्यांच्या त्या अनुभवांच्या मागें धांवून आपल्याला काय लाभ ? राजा हत्तीवरच्या अंबारींत झुलतो, म्हणून कुंभारानें आपल्या गाढवा-वरही अंबारी घालायची कीं काय ?

जाऊं द्या.

**आत्मैक्यज्ञानेन विनापि मुक्तिर्न लभ्यते जन्मशतान्तरेऽपि ॥**

असा ध्वज उभारणारे शंकराचार्य, त्यांनीं तर प्रत्यक्ष अनुभवापुढें श्रुतींचीही परवा केली नाहीं. अग्नि बर्फागत थंड आहे, असें सांगणारीं शंभर वेदवचनें असलीं तरी तीं अप्रमाण, अशी घोषणा करणारा, तार्किकांना आपल्या पोतडींत घालणारा महातार्किक भगवान् शंकर, मग त्यानें तरी पंचायतन-पूजा कां स्थापित केली ?

देवळांत देवच नाहीं असें मुळींच नव्हे. तो देवळांतही आहे. पण तो देवळां-तच आहे, असा जो डांगोरा पिटला जातो, तें मात्र अजिबात खोटें. तो देवळांतही आहे. तो बाहेरही आहे. त्या चैतन्यानें हा सगळा "जगदाकार धवळला" आहे. कुठें कुठें म्हणून त्याच्या विना एवढीशीही जागा त्यानें मोकळी ठेविली नाहीं. तो तर "परमाणू माजीं" ही "मांडला" आहे.

'तर मग मला देवळांत कां सुख वाटूं नये ?' मी विचार करतांना उभा राहिलों.

उत्तर दिलें समोर पसरलेल्या दृश्यानें. ही एवढी भव्यता, ही एवढी महानता, हा एवढा मोठेपणा, ही एवढी विशालता कुठें आहे देवळांत ? तिथें आहे संकोच,

तिथें आहे लहानपणा. तिथें आहे परिच्छिन्नत्व. तिथें आहे सगळें इवलें इवलें. माझें पोट भरत नाहीं तिथें.

खूप दिवसांचा भुकेला आहें मी, किती तरी वर्षांचा. आज किती तरी वर्षें माझ्या भुकेची उपासमार चालली आहे. दीड हजार वर्षें जवळजवळ.

जवळ जवळ दीड हजार वर्षें मला कदान्न खावें लागत आहे. माझी बौद्धिक क्षुधा प्रदीप्त होती. काय वाटेल तें पचवून टाकावें तिनें! अनेक संस्कृतींचा संघर्ष होऊन सुद्धां माझ्या तत्त्वज्ञानाच्या पातळीचा कस एवढासाही उतरला नव्हता. उलट त्या संघर्षांच्या धकाधकींत माझ्या संस्कृतीचा पैलून् पैलू उजळून उठला होता.

इथें कुठें तरी गंगेच्या तटाकीं एक मनु नांवाचा हृष्टपुष्ट तेजस्वी म्हातारा आत्मविश्वासानें छाती फुलून जाऊन म्हणाला होता,

**एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।**
**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वे मानवाः ॥**

त्यानें सदावर्त–पाणपोई घातली होती आणि तिच्या दाराशीं उभा राहून तो हांकारीत होता,

"या रे या ! भुकेल्यांनो या ! तहानेल्यांनो या ! सगळे या इथें. निःशंक मनानें. अन् या सदावर्तातील रुचिकर अन्न खाऊन जा. हें सगळें तुम्हांकरितां आहे. अनेक ऋषींनीं वर्षानुवर्षें, कित्येक शतकेंपर्यंत तपश्चर्या करून जो परिपाक साधला, तो केवळ तुमच्याकरितां, अगदीं तुमच्याकरितां."

आणि मग देशोदेशींचे लोक आले. शक आले, हूण आले, बर्बर आले, ग्रीक आले. कोणी जिंकण्याच्या इच्छेनें, कोणी लुटीच्या लालसेनें. कोणी आपली जगज्जेतृत्वाची अतिप्रचंड हाव ही शेवटची आहुति घेऊन तृप्त करण्याकरितां !

पण माझ्या या संस्कृतिमातेची भूक अशी कांहीं प्रखर, उदरांतला जठरानल असा कांहीं प्रदीप्त, कीं या सगळ्यांचीं येतानांचींच पावलें तेवढीं हिमालयाच्या हिममय खिंडींत उमटलेलीं दिसलीं ! हीं शकांचीं ! हीं हुणांचीं ! हीं बर्बरांचीं ! हे सगळे हा अतिसमृद्ध देश लुटून सुरक्षित परत गेले, अशी साक्ष देणारा साक्षीदार—?

काल प्रत्येक घटनेचा साक्षीदार आहे, ज्ञात आणि अज्ञात; गुप्त आणि प्रकट; मंगल आणि रौद्र; सर्व प्रकारच्या घटना ज्या एकानें नीट आपले सर्वतःचक्षु उघडे ठेऊन पाहिल्या, त्या कालालाच विचारा !

त्याचेजवळ उत्तर नाहीं. उलट हंसत हंसत गौरवानें उन्नतमस्तक होऊन तो असें सांगेल,

" या वृद्ध भारताच्या संस्कृतीनें सगळें कांहीं पचविलें. त्या पाच्य पदार्थाला एवढासाही धक्का न लागूं देतां ! त्याच्या मनीं एवढासाही किन्तु न उद्भवूं देतां ! मनीं अनेकानेक विकृत इच्छांचीं ओझीं वागवीत ते या तपस्विनीजवळ आले आणि दुसरे दिवशीं उठून त्यांनीं असें पाहिलें कीं, आपण या भारतीय संस्कृतीचें एक अंग बनून गेलों आहोंत ! तिच्यांत आणि आपणांत वेगळेपणा असा कुठें शोधूनही आतां गवसणार नाहीं. काल आम्ही विजिगीषु होतों, आज आम्ही जें जिंकावें असा हेतु अंतरीं वागवून इथें पदक्षेप केला होता, आपल्या अस्त्रशस्त्रांचें लाघव दाखवीत आम्ही ज्या देशाच्या परिसरांत प्रवेश केला होता, त्या देशाच्या संस्कृतीशीं अभिन्न होऊन आम्ही जेतृत्वाचा अनुभव करीत आहोंत !

आणि मग मोठ्या अभिमानानें, मोठ्या गौरवानें ते आपण आर्य असल्याची प्रौढी मिरवूं लागले. आपण भारतीय असल्याचा दावा सांगूं लागले. इथल्या चाली-रीतींशीं, इथल्या आचारविचारांशीं, इथल्या धर्माशीं एकरूप होऊन जाऊन ते त्या सर्व गोष्टींच्या गौरवाचीं गाणीं गाऊं लागले. "

पण काय करूं रे—!

तो अतिप्रदीप्त जठरानल, आज असा म्लान कां झाला कोण जाणे ! जीवनास अत्यावश्यक असलेली वस्तुही पचविण्याचें सामर्थ्य ज्याचे अंगीं राहिलें नाहीं, उलट करपट ढेंकर देऊन ज्यानें आपल्या भोंवतालचें वातावरणही दूषित करून टाकलें आहे, असा हा रोगी कां झाला ?

कुठून हें केंबळें, रोगट तत्त्वज्ञान निर्माण झालें ?

**पापोऽहं पापकर्माऽऽहं पापात्मा पापसंभवः ॥**

'मी पापी, मी पापकर्मा, मी पापात्मा, मी पापापासून निर्माण झालेला, मी हीन, मी दीन, मी दुःखी, मी दुराचारी, मी दुष्ट, मी दुर्बळ, मी तेजहीन, मी केंविलवाणा ! मी मधुकरी मागणारा ! मी भिकारी ! मी याचक !

मला कुणी थारे ! एखादा भाकरीचा तुकडा ! एखादा अन्नाचा घांस ! एखादा फाटका कपडा ! एखादें धडुतें !

मला जगवा, कारण मी गरीब आहें ! मला धान्य द्या, कारण मी भिकारी आहें ! मला वस्त्र द्या, कारण मी उघडा आहें ! मजवर लक्ष असूं द्या, कारण मी

दुर्बल आहें ! मला साहाय्य करा, कारण मी अशक्त आहें ! माझें बोट धरून चाला, कारण मी अपंग आहें ! माझी राखण करा, कारण मला हें लाजिरवाणें जिणें खूपसें जगून घ्यायचें आहे ! '

हा समाजपुरुष असा दीनवाणा कां झाला ? हा बलशाली, आपल्या अगदीं सहज टाकलेल्या हिंकारानें त्रिभुवनें आंदोळवून टाकणारा केसरी आज असा कोल्ह्याहूनही भेकड कां झाला ?

आई ग ! सांग ना ! मी मुळींच पाऊलही पुढें घालणार नाहीं. तुझ्या तटाकीं ठाण मांडून बसेन. तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणाला विचारूं माझ्या जीवींची आर्तता ? तुझ्याशिवाय दुसरा कोण समजावून घेईल ? माझी मळूं पहाणारी श्रद्धा तुझ्याशिवाय कोण उजाळून नीटनेटकी करील ?

आई ! या अंधारांतून तूं मला मार्ग दाखव.

**असतो मा सद्गमय । तमसो मा ज्योतिर्गमय ।**

आणि मग एके दिवशीं हळूंच माझ्या आईनें तें मला सांगितलें. तिनें एका वस्तूकडे संकेत केला. त्या वस्तूकडे वहात येऊन जणूं तिनें मला या प्रश्नाच्या उकलाकडे बोट दाखविलें.

एके दिवशीं सकाळीं १० वाजण्याचे अंदाजांत एका घाटावर येऊन पोंचलों. नर्मदेनें एक अति गोड असें वळण घेतलें होतें आणि ज्या ठिकाणीं ती आपल्या पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणाऱ्या पथावर येऊन मिळाली, नेमकें त्या ठिकाणीं एक अति-भव्य, अतिविशाल, अतिसुंदर असें महादेवाचें मंदिर होतें. त्या मंदिराच्या शेजारीं एक लहानशी, कशी तरी बांधलेली, ढांसळूं लागलेली, दोन-तीन खणांची धर्मशाळा होती.

मंदिर अतिभव्य होतें, धर्मशाळा एवढीशी होती. मंदिरास अंदाजें पांचशें वर्षें तरी झालीं असावींत, धर्मशाळा पांच-पन्नास वर्षांतील होती. मंदिर घोंटीव काळ्या पाषाणाचें होतें, धर्मशाळा पांढरी माती व लांकूड यांची बनविलेली होती. मंदिराच्या कोणत्याही भागाचा एक लहानसा कळपासुद्धां अजून सुटलेला नव्हता, धर्मशाळा पडूंझडूं लागून चिरविश्रामाप्रत जाऊं पहात होती.

आणि—

मंदिर कुणीं बांधलें, कुणीं बांधविलें, याचा कुठें मागमूसही लागण्यासारखा नव्हता, तर त्या पडूं लागलेल्या 'धर्मशाळा' हें नांव असलेल्या खोपटावर एका सुंदर संगमरवरी दगडांत खोदून पुढील अर्थाचा हिंदी मजकूर बसविला होता—

" या क्षेत्रांत स्नानाकरितां येणाऱ्या यात्रेकरूंचे हाल पाहून अति-दयाळू अंतःकरणानें.....गांवचे कर्णासारखे दानशूर इनामदार श्री...... यांनीं ही धर्मशाळा बांधवून हिचा मालकी हक्क स्वतःकडे व स्वतःच्या वंशजां-कडे राखून ठेवला आहे."

सहज कौतुकानें तें मंदिर न्याहाळीत आणि बांधणाराच्या बुद्धिमत्तेचें कौतुक करीत मी धर्मशाळेकडे वळलों, आणि ज्या क्षणीं ही पाटी पाहिली, त्या क्षणीं आश्चर्यानें स्तम्भित होऊन उभा राहिलों ! मजपुढें दोन चित्रें उभीं होतीं. एक अति विस्तृत तर दुसरें अति क्षुद्र. एक अति सुंदर तर दुसरें अगदीं ओंगळ. एक अत्यंत सुदृढ आणि दुसरें उभें होतां होतांच ढांसळूं पाहणारें—

एका चित्राची वास्तुशान्ति करून तें बांधणारा नम्रतेनें स्वतःच्या अस्तित्वाचा मागमूस उरूं न देतां आईच्या चरणीं विलीन झाला होता, आणि दुसऱ्या चित्राला बांधविणारा आपला स्वर्गमार्ग जणूं काय या कृत्यानें अनवरुद्ध झाला, अशा गर्वानें आरोळ्या मार मारून आपलें व्यक्तित्व प्रगट करीत स्वतःचें नांव जगाला घसा फोडून सांगत होता, आणि त्या स्वर्गद्वारावरील सर्व हक्क त्यानें आपल्या वंशजाकरितां राखून ठेवले होते !

मला अत्यानंद झाला. हर्षानें टाळी पिटून मी नाचत सुटलों आणि आईला म्हणालों, " आई, तूं या स्थलाकडे, या मंदिराकडे वहात आलीस आणि मला माझ्या समोरील प्रश्नाचें गूढ उकलवून दाखविलेंस ! जणूं काय या मंदिराकडे आपला प्रवाह वळवून तूं मला माझ्या प्रश्नाच्या उत्तरापर्यंत बोट धरून नेऊन पोंचविलेंसच !

सांपडलें माझ्या प्रश्नाचें उत्तर !

ज्या क्षणीं या संस्कृतीचे धनी व्यक्तित्व हा केंद्रबिंदु कल्पून त्याचेभोंवतीं रिंगणें घेऊं लागले, त्याचेभोंवतीं पिंगा घालूं लागले, जेव्हां समाजपुरुषाची उपासना थांबली, समाजपुरुषरूपानें जगणें सुटलें आणि जीवनाचे सर्व ओघ व्यक्ति या वर्तुळाकडे वाहूं लागले, जेव्हां व्यक्ति ही वस्तु एवढी मोठी झाली, कीं ती समाजाच्या कल्याणाचा भार आपल्यावर असल्यागत स्वतःची काळजी वाहूं लागली, स्वतःचे लाड पुरवूं लागली, ज्या क्षणापासून हा व्यक्तित्वाचा अहंगंड विस्तार पावतां पावतां नगाधिराजाहून उंचावला,—

आणि त्याचा परिणाम म्हणून ज्या दिवसापासून वैयक्तिक मोक्षाची कल्पना रूढ झाली, त्या मोक्षाकरितां देवाकडे वशिले लावले जाऊं लागले आणि साहजिकच

त्या वशिल्यांच्या अर्जाची भाषाही निर्माण झाली—" मी हीन, मी दीन, आणि म्हणून

**तूंचि होउनि बा सदय मला तारीं।**

मलाच, अगदीं मला एकट्याला! दुसऱ्या कुणालाही नको!

त्याकरितां मी तुझीं देवळें बांधीन, तुझी लहानशी गोजिरवाणी मूर्ति करीन, तुला माझ्या एकट्याच्या हृदयसम्पुष्टांत सांठवून ठेवीन आणि मी तुझा भक्त आहें, अशी थाळी जगभर पिटीन. तूं माझ्याच देवळांत रहा, मीं दाखविलेला नैवेद्यच खा, मीं पांघुरविलेले कपडेच घाल, माझा—सर्वस्वीं माझाच होऊन रहा!"

त्या क्षणापासून आमची ही अति पवित्र संस्कृति,—तिच्या अःधपतनास प्रारम्भ झाला!

हें ओंगळ तत्त्वज्ञान आमचें नव्हेच मुळीं! हें हीन तत्त्वज्ञान, हें संकुचित तत्त्वज्ञान त्या धर्मशाळेचें!

आमचें तत्त्वज्ञान त्या मंदिराचें! तें मंदिर आमच्या भारतीय तत्त्वज्ञानाच्या अनुयायानें बांधलें आणि मग तो नम्रपणें समाजपुरुषांत विलीन झाला! हीं एवढीं तपश्चर्यास्थळें आणि मंदिरें या नर्मदामय्याच्या तटाकीं विराजताहेत, आहे का कुठें त्यांच्या निर्माणकर्त्यांचें नांव? सांपडतो का कुठें त्याचा मागमूस?

नव्हेच नव्हे! ज्या ऋषींनीं आणि ज्या मुनींनीं हें सर्व रचलें, त्यांना हें अवगत होतें कीं, " मीं बांधलें खरें हें मंदिर, रचलें खरें हें तपश्चर्यास्थल—पण हें माझें नव्हे आणि मजकरितांही नव्हे! हें समाजपुरुषाचें, हें विराट्‌रूपाचें. हा विराट्, हा भूमा ओजस्वी व्हावा, हा बलिष्ठ व्हावा, हा तेजस्वी व्हावा, हा भूयिष्ठ व्हावा, म्हणून हे सगळे माझे प्रयत्न. कारण मोठेपणांत सुख आहे, व्यापकत्वांत आनंद आहे, समाजरूप होण्यांत संतोष आहे.

**यो वै भूमा तत्सुखं। नाल्पे सुखमस्ति।**

मग मी तपश्चर्यास्थलें रचीन आणि तीं समाजपुरुषाच्या सेवेस प्रस्तुत करून मी बाजूस सरेन. मी मंदिरें बांधीन आणि तीं लोकगंगेकरितां संस्कृतिमातेच्या स्वाधीन करून मी त्या लोकगंगेंत मिसळून जाईन. कोणीं शोधायचा प्रयत्न केला, तरी त्याला गवसणार नाहीं.

माझी एकच इच्छा. एकच वासना. एकच आकांक्षा. —

हा सुखरूप भूमा अधिक तेजस्वी व्हावा. हा समाजपुरुष अधिक कीर्तिशाली व्हावा. तेवढ्याकरितां माझी सारी धडपड. तेवढ्याकरितां माझे सारे प्रयत्न. या एकाच दिशेकडे माझे सर्व उद्योग एकाकारले आहेत.

माझें नांव कुणी विचारूं नका. माझ्या शोधाकरितां कुणी खटपट करूं नका. माझ्यासारखे व्हा आणि मग तुम्हांला आढळेल, 'अरे वा! मी आतां समाजरूप झालों आहें! हें सगळें म्यां समाजपुरुषानें बांधिलें आहे.' मग तुम्ही माझा शोध करणें-ही सोडून द्याल."

अशा अनेकानेक तपश्चर्यास्थलांनीं भरलेला नर्मदामय्याचा तट, तो आपल्या शरीरावर भटकणाऱ्यांना साद घालून ऐकवीत आहे,

**यो वै भूमा तत्सुखं! नाल्पे सुखमस्ति!**

★ ★ ★

अगदीं आजही,

जेव्हां विदेशी घड्याळांनीं मनुष्याच्या जीवनांत एक महत्त्वपूर्ण स्थान पटकाविलें आहे, जेव्हां प्रथम त्यांनीं भिंती सुशोभित केल्या, मग खिडक्या; त्यानंतर तीं खिशांत शिरलीं, मग मनगटावर येऊन बसलीं; त्यानंतर त्यांना कोटाचीं बटणें हें स्थान बरें वाटलें व शेवटीं त्यांनीं हातांतील अंगठीचा आश्रय केला.

—अशा अगदीं आजही,

त्या एका महान् पतिव्रतेच्या निवासस्थानीं, इन्दूर संस्थानांतील महेश्वराच्या किल्ल्यांत राहणाऱ्या लोकांचे व्यवहार अजून भारतीय कालगणनापद्धतीप्रमाणें चालतात, अजून त्यांच्या बोलण्यांत भाषेंतून नष्ट होऊं लागलेले " मध्यान्ह, प्रहरभर दिवस, तिसरे प्रहरीं, चौथ्या प्रहरास, " हे शब्द रेंगाळत मागें राहिले आहेत.

अजून त्या किल्ल्यांतील सती अहल्यामातेच्या मंदिरांत एक मोठें थोरलें पाण्यानें परिपूरित असें पात्र असून त्यांत एक घटिकायंत्र तरंगत आहे; तें बुडलें, म्हणजे जवळच बांधलेल्या अतिप्रचंड, अतिसुंदर नाद पसरविणाऱ्या घंटेवर तेथील पहारेकरी घटकांचे टोल टाकतो !

तो ऐकणाऱ्या मनुष्याच्या कानांत जणूं काय आनन्दाचे घट रिचविणारा नाद त्याला असें म्हणतो, "या ! अजून या ठिकाणीं भारतीय संस्कृति जिवंत आहे. या ठिकाणचे वृद्ध ब्राह्मण अजून ब्राह्म मुहूर्तावर उठतात, सूर्योदयाचे पूर्वी नर्मदामय्याचें स्नान करतात, दोनप्रहर होईपर्यंत रत्नेश्वराचें पूजन करतात, तिसरे प्रहरीं शास्त्रचर्चा करतात ! अगदीं आजही तुम्हांला या ठिकाणीं सुस्पष्ट स्वरांत चालणारा वेदघोष ऐकूं येईल, व्याकरणाच्या कठिणतम

सूत्रांवर वाद होतांना दिसतील, विश्व सोळा पदार्थांचें बनलें आहे कीं सात पदार्थांचें, अशी चर्चा चाललेली आढळेल, त्या पदार्थांच्या गुणांची चिकित्सा केलेली श्रवणीं पडेल. या इकडे!"

अपभ्रष्ट स्वरूपांत का होईना, अजून महेश्वराच्या किल्ल्यांत भारतीय संस्कृतीचे अनंतांत विरू लागलेले पडसाद ऐकूं येतील. ज्याला त्या अतिमहान् भारतीय संस्कृतीचें दर्शन करायचें असेल, त्यानें बाह्यावरणाचा भेद करून पैलतीरीचें पाहण्याचें सामर्थ्य असलेली दृष्टि घेऊन महेश्वरला जावें, निश्चितच त्या अतिविशाल, पवित्रतम भारतीय संस्कृतीच्या दर्शनानें तो कृतकृत्य होईल.

हें सगळें कोणाचें कर्तृत्व? कोणाच्या पुण्याशयांतील पाणी पिऊन, नष्ट होऊं पाहणारी भारतीय संस्कृति अजून जीव धरून राहिली आहे?

ज्या सतीच्या अलौकिक तेजापुढें दख्खनच्या तट्टांना अटकेचें पाणी पाजणाऱ्या राघोभरारीचें पाणी उतरलें, त्या स्मृतिशेषांच्या पडक्या इमारतींत बिचारी भारतीय संस्कृति अजून आपल्या लेंकरांच्या पुनरुत्थानाची वाट बघत कशी तरी जीव धरून राहिली आहे!

म्हणून अजून महेश्वराच्या पौरजनांना केवळ अहल्याबाईच्या नांवाचा उच्चार केलेला खपत नाहीं. त्या महासतीला 'माताजी' या नांवानें जर न संबोधिलें तर कदाचित् तो बोलणारा मनुष्य तेथील पौरजनांच्या आणि राजदूतांच्या रोषास पात्र होण्याचा संभव आहे!

पण पाथर्डी तालुक्यांतील ही धनगराची पोर जी एवढ्या मोठ्या कीर्तीचें निवासस्थान झाली, ही कोणाची कृपा?

ही माझ्या नर्मदामय्याची कृपा! तिनें आपलें मोठेपण अहल्येला दिलें. जेवढा मोठा ध्वनि, तेवढाच मोठा प्रतिध्वनि; जेवढी मोठी नर्मदा, तेवढीच मोठी तिच्या चरणीं लीन झालेली, तिच्या सान्निध्यांत राहून पुनीत झालेली अहल्या!

महेश्वरविषयीं फार दिवसांपासून अनेक प्रवाद कानीं पडत होते. महेश्वर ही प्राचीन माहिष्मती नगरी; इथून अगदीं जवळ असलेल्या मंडलेश्वरच्या पुण्यभूमींतच एकदां एक वेदाध्ययनशील कर्मठ ब्राह्मण आपल्या घराचीं दारें बंद करून पितृश्राद्ध सम्पन्न करीत होता. त्याच्या रूपानें तेजस्वी वैदिक परम्परेची एक ज्योत तेवत होती. अचानक एक दुसरी, या ज्योतीहून प्रकाशमान, देदीप्यमान ज्योत हिला गिळून स्वतःशीं तद्रूप करून टाकण्याकरितां एका, अगदीं बालपणीं संन्यासाचें

महाव्रत अंगिकारलेल्या महान् तपस्वी, ओजस्वी तरुणाच्या रूपानें या पहिल्या ज्योतीला शोधीत आली !

नर्मदेवर पाणी भरण्यास आलेल्या पौर स्त्रियांना या संन्यासी तरुणानें प्रश्न केला, " मण्डनमिश्राचें घर कोणतें ? "

त्या पौरस्त्रियांत आश्चर्यदर्शक मुग्ध हास्य विकसलें. एकीनें विचारलें,

" स्वामी कोण गांवाहून आले ? मिश्रजींचें घर माहीत नसलेला मनुष्य या देशांत नवीन असला पाहिजे ! स्वामींचें नांव काय ? "

**" नाहं मनुष्यो नच देवयक्षो—"** •

स्वामी बोलूं लागले.

" तें तर आमच्या गांवच्या शुकसारिकांना माहीत आहे. स्वामींच्या विग्रहाचें नांव काय ? "

" शंकराचार्य ! "

आणि तत्क्षणीं पटापट घागरी फेकून त्या स्त्रियांनीं लोटांगण घालीत म्हटलें, **" क्षन्तव्यो मेऽपराधः !** असें या रस्त्यानें जावें महाराज ! आणि —

**स्वतःप्रमाणं परतःप्रमाणं कीरांगना यत्र गिरं गिरन्ति**
**द्वारस्थनीडान्तरसन्निरुद्धाः जानीहि तन्मण्डनमिश्रगेहं ॥**

ज्या ठिकाणीं आपणांला सारिका वेदचर्चामृतांत अवगाहन करतांना आढळतील, त्या घरीं ' मिश्रजींचें घर ' म्हणून खुशाल शिरा आपण ! "

आणि मग त्या घरीं वेदान्तार्थविभासक भगवान् शंकराचार्य व महामीमांसक मण्डनमिश्र या उभयतांत " कुतो मुण्डी " या सुप्रसिद्ध वाक्यानें प्रारंभ झालेला वाद झाला ! त्या वादांत निर्णायकाचें काम केलें मण्डनमिश्राच्या पत्नीनें सरस्वतीनें; आणि त्या आपपर भाव ओळखणाऱ्या सिंहासनावर बसून तिनें आपल्या पतीचा पराभव झाल्याचा निर्वाळा दिला !

त्या न्यायप्रिय महासतीची खूण म्हणून अजून मण्डलेश्वर ( मण्डनेश्वर ) ला एका प्राचीन कालीं बांधलेल्या ग्रामदेवतेच्या मन्दिरांत जाऊन पहा तुम्ही. देवळांत मण्डनेश्वराचें लिंग आणि देवालयाचे बाहेर एकीकडे सरस्वतीची मूर्ति बसविलेली आढळेल. देवळाच्या मागें भगवान् शंकराचार्यांची मूर्तीही स्थापन केलेली दिसेल तुम्हांला, आणि आदरानें तुमचे हात जुळतील !

अशा त्या मण्डनेश्वराच्या शेजारानें पवित्र झालेली माहिष्मती नगरी. एके दिवशीं अनेक दिवसांची ती नगरी पहाण्याची इच्छा तृप्त करण्याकरितां मी महेश्वरला जाऊन पोंचलों आणि घाईघाईनें प्रथम मय्याच्या तटाकीं जाऊन उभा राहिलों.

अद्‌भुत, खरोखरीच अद्‌भुत! आजपर्यंत मैय्याचीं अनेक रूपें पाहिलीं, अनेकविध स्वरूपांत तिला नटलेलें पाहिलें, निसर्गानें आपल्या या लाडक्या कन्यकेच्या शरीरावर चढविलेलीं अनेकानेक बाळलेणीं अवलोकिलीं. जागोजाग मनुष्यानें मय्याचे तटाकीं आपल्या भक्तीचें प्रतीक म्हणून अनेकविध रचना केलेल्याही बघितल्या.

पण जें अहल्येनें केलें, तें कुणालाच जमलें नाहीं ! अहल्याबाई होळकरणीनें ज्या स्वरूपांत आपली सेवा मातेच्या चरणीं अतिश्रद्धेनें प्रस्तुत केली, तें स्वरूप केवळ अलौकिकच !

आणि तें स्वरूप नटवें नाहीं, त्यांत शृंगार नाहीं, त्यांत बुद्धीचें फाजील चातुर्य नाहीं, त्यांत रचनावैदग्ध्य नाहीं; साधें, अगदीं साधें.

ज्याप्रमाणें एखादी कुलवती प्रौढा अगदीं साधीं लेणीं लेवून कुलदेवतेच्या पूजेला निघावी, त्याप्रमाणें.

केवळ अहल्येनें नर्मदामय्याच्या कांठीं घाट बांधले. अगदीं साधे. पण त्या नुसत्या घाटांच्या बांधणींतच जी विशालता, जो विस्तृतपणा, जें विस्तीर्णत्व सांठवलेलें आहे, तें खरोखरीच अपूर्व आहे.

तसें पाहिलं तर महेश्वरीं मय्याचें पात्र अतिशय खोल आहे. आजही नवशिका पोहणारा महेश्वराच्या घाटावर नर्मदेंत शिरण्याचें साहस करीत नाहीं. घाटाच्या दोन चार पायऱ्या उतरून पुढें ठाव घेऊं जातां चार पुरुष उंचीचा कळकही अपुरा पडतो; आणि त्यांत अलीकडे घाटाचे खालीं पाण्यांत गुहा निर्माण झाल्या आहेत कुठें कुठें. नवशिका आणि नवखा पोहणारा एकदां त्या गुहेंत प्रविष्ट झाला कीं, मग ज्याप्रमाणें इसापाच्या कोल्ह्याला आजारी सिंहाच्या गुहेंत शिरलेल्या जनावरांचीं फक्त गुहेकडे जाणारींच पावलें आढळलीं, त्याप्रमाणें त्या नवशिक्याला पुढें काय काय अनुभव येतात हें सांगणारा अजून कुणी भेटला नाहीं !

पण अहल्येची ती नम्र सेवा, त्या होळकरणीचें तें श्रद्धायुक्त वायन नर्मदेनें मोठ्या आवडीनें स्वीकारलें आहे. अजून त्या अति विस्तीर्ण, जवळ जवळ फर्लांग दीड फर्लांग लांबीच्या एकच एक घाटाला यत्किंचितही तडा पडलेला नाहीं, कीं

कुठें दगड उखळलेला नाहीं. जवळ जवळ शेंसवाशें फूट रुंद व दीड फर्लांग लांबीचा तो एकसंधी घाट, नर्मदेनें अजून दीड दोनशें वर्षें झालीं असतांहि, आपल्या त्या अति विस्तीर्ण जलसंपत्तीच्या वेगाबरोबर वाहवून न नेतां तसाच अवशिष्ट ठेवला आहे.

त्या घाटावर भारतीय संस्कृतीचे अवशेषरूप असे कांहीं पुराणे तपस्वी ब्राह्मण अजून सकाळ संध्याकाळ नर्मदेच्या स्नानानें पवित्र होऊन संध्या करीत बसलेले आढळतात. अजून एखाद्या संस्कृतज्ञाला त्या ठिकाणीं उत्कृष्ट, अतिशुद्ध व स्वच्छ शब्दांत म्हटलेलें नर्मदाष्टक, गंगास्तोत्र, शिवमहिम्न अगदीं सहज ऐकूं येईल. एखादा अगदीं सामान्य दिसणारा, फाटकें धोतर नेसलेला, डोईवरील शेंडी भुरभुर उडणारा ब्राह्मणाचा पोर एखाद्या "जगन्नाथ शंकरशेट" शिष्यवृत्ति मिळविलेल्याला लाजवील, अशा अतिशुद्ध स्वरांत व उच्चारांत 'महिम्नस्तोत्र' म्हणतांना आढळेल तिथें.

त्या घाटावर सायंकाळीं जाऊन बसण्यांत आणि एखाद्या चांदण्या रात्रीं त्या घाटावर त्या अतिव्यापक विस्तीर्णतेचा, त्या अपूर्व दृश्याचा, त्या अलौकिक एकान्ताचा अनुभव घेण्यांत जें सुख आहे, तें "वाचेचिया पलीकडे" आहे, याहून अधिक वर्णन कसें करूं मी ?

त्या अपूर्व दृश्यासमोर जणूं काय त्या नर्मदेवरील घाटावर दृष्टि ठेवून उभा असलेला त्या घाटाचा थोरला भाऊ असा महेश्वरचा किल्ला आहे. घाटावरून त्या किल्ल्याच्या भिंतीपलीकडे कांहीं दिसत नाहीं. खूप उंच, भरभक्कम बांधलेली अशी ती भिंत, आणि त्या भिंतीच्या आंतील दृश्यांत प्रवेश करवून देणारें महाद्वार, एवढेंच स्वरूप दृश्य आहे.

महाद्वार, खरोखरीच 'महाद्वार'! अष्टकोनी, लहान लहान होत जाऊन महाद्वाराजवळ संपणाऱ्या, त्याचेपर्यंत मनुष्यास पोंचवून स्वतः नष्ट होणाऱ्या पायऱ्या आणि जिथें त्या पायऱ्या समाप्त होतात तिथें अहोरात्र उभा असलेला, कधींही विश्रांति न घेणारा, विशाल आणि भारतीय बांधणीचा सुदृढ असा दरवाजा.

त्या दरवाजांत पोंचल्याबरोबर आंतल्या त्या विराट् स्वरूपाचें दर्शन होतें. दिव्यदृष्टि प्राप्त झाल्याबरोबर अर्जुनास जसें विश्वरूप दृष्टिसुलभ झालें, त्याप्रमाणें घाटावरील मनुष्यास किल्ल्यांतील विराटस्वरूपाचें दर्शन घडवून देणारा तो दरवाजा.

त्या दरवाजाच्या पायठणीवर उभें राहून पहा, तुमचें मन तुम्हांला अशी ग्वाही देईल कीं, आपण एका अलौकिक वास्तुसमोर उभे आहोंत! अलौकिक

असूनही ज्या वास्तूंत भडकपणाचा लेश नाहीं, नटवेपणाचा वास नाहीं, बेढबपणाची ओळख नाहीं, अशी वास्तु आपण ही आजच पहात आहोंत.

ताजमहाल सुंदर म्हणतात, पण तें एका प्रेमवेडयाच्या आपल्या मृण्मय प्रेयसी-वरील वैषयिक कामुक प्रेमाचें चिन्ह आहे. लोकांना आज ताजमहाल सुंदर दिसतो, दिसायचाच तो ! केवळ बाह्य दृश्यावरच संतुष्ट होणारी विचारशून्य दृष्टि जर ताज-महालाच्या नटव्या सौंदर्यावर " निहायत खूष " झाली, तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं !

कारण त्या दृष्टीला त्या ताजमहालाचा इतिहास कुठें माहीत आहे ? वर्षानुवर्षें तरवारीच्या तीक्ष्ण धारेच्या बळावर राज्य करणाऱ्या राजसत्तेच्या हातीं खुळखुळणाऱ्या आसुडाच्या धाकामुळें काम करणारे, त्या आसुडाच्या फटकाऱ्यांनीं पाठीवर हिरवेनिळे वळ उठलेले अर्धपोटी कामगार त्या दृष्टीला दिसत नाहींत. मोंगली धाटणीच्या ताज-महालाकरितां अनेक वर्षे आपलें भारतीय रक्त अक्षरशः पळीपळीनें आटवीत अजस्र संगमरवरी दगड आपल्या दुर्बल हातांनीं वर चढविणारे ते बिचारे मजूर कुठें दिसताहेत त्या दृष्टीला ?

तिला तें नारकीय दृश्य दिसत नाहीं. तिला त्या उपाशी मजुरांच्या अभागी बायकापोरांच्या किंकाळ्या ऐकूं येत नाहींत. ताजमहालाच्या पायांत सांडलेलें अनेकानेक बंद्यांचें ऊष्ण रक्त तिच्या नजरेस पडत नाहीं. अनेक गवंडी, बेलदार, घाणी हांकणारे यांचे आर्त, गरम सुस्कारे तिला स्पर्श करूं शकत नाहींत.

कारण आतां ते भूतकालाच्या काळ्याकुट्ट गुहेंत दिसेनासे झाले आहेत. विलासी शहाजहाननें आपल्या प्रियेवरील कामुक प्रेमाचें निदर्शन करण्याकरितां ज्या अनन्त मजुरांना अर्धपोटीं राबविलें, ज्या बंद्यांकडून पायींच्या बेड्या पायांत रुतत, घरें करीत असतां ताजमहालाचा पाया खणवून घेतला, ज्या गवंडयांना, ज्या बेलदारांना आसु-डाच्या फटकाऱ्यांच्या धाकावर काम करावयास लावलें, ते सगळे—!

होय ! ते सगळे भूतकालांत विलीन झाले आहेत. त्यांच्या त्या आर्त किंका-ळ्यांचे पडसाद अजूनही ताजमहालाभोंवतीं उठत आहेत म्हणूनच ताजमहाल उदास-वाणा वाटतो. अजून त्या अर्धपोटी कामगारांचीं, भुकेनें मेलेल्या त्यांच्या बायका-पोरांचीं भुतें पौर्णिमेच्या रात्रीं ताजमहालाभोंवतीं सुस्कारे टाकीत असतात ! म्हणूनच तेथें मनाला प्रसन्नता—आल्हाद वाटत नाहीं.

आणि महेश्वर किल्ल्यांतील त्या शिवमन्दिरांत, त्या अलौकिक, भव्य वास्तूंत–

तिथें यांपैकीं एकही नाहीं. तिथें कामुकता नाहीं, तिथें मृण्मय वस्तूवरील प्रेमाचा डौल नाहीं, तिथें वैषयिक वासनांचा बुजबुजाट नाहीं.–

तिथें आहे निर्मल, अति विशुद्ध, नर्मदेच्या स्फटिकवत् जलासारखी, अति-पवित्र भक्ति, उपासना, तन्मयता. तिथें त्या सर्वेश्वराच्या चरणीं स्वतःचें कांहीं एक शिल्लक न ठेवतां लीन होणें आहे. तिथें भारतीय संस्कृतीचें शुद्ध स्वरूप, समष्टींत व्यक्तीचा लय, ध्येयवस्तूशीं तदाकारता आणि अतिविस्तीर्ण अशा सागरांत बिंदूचें पूर्ण विकसित होऊन लय पावणें आहे.

एक अति भव्य, विस्तीर्ण, अगदीं साध्या भारतीय पद्धतीनें बांधलेलें शिव-मंदिर, त्याच्या समोर दगडी फरशीनें मढविलेला विस्तीर्ण प्राकार आणि या भव्य शिवमंदिरासमोर—मला वाटतें विठ्ठलराव होळकरांकरितां बांधलेलें—एक याहून लहान शिवमंदिर.

दरवाजांतून आंत गेल्याबरोबर हें पवित्र दृश्य आंत पाऊल घालणाऱ्या माणसाला जणूं काय बजावीतच असतें,

" सांभाळ! ही वास्तु एका पवित्र सतीची आहे. इथें तिनें आपला जन्म तहानेल्या-भुकेल्यांची चिंता करीत व्यतीत केला. या ठिकाणीं या मंदिरांत ती शुद्धतम साध्वी अनेक वेळां साधुसन्तांच्या हृदयस्पर्शी कीर्तनांनीं हृदय हेलावून निघाल्यामुळें रडली आहे.—

द्रौपदीची ती करुण गाथा ऐकून अनेक वेळां तिच्या डोळ्यांतून मोत्यासारखे मोठमोठाले अश्रु खालीं ओघळले आहेत. त्या अश्रूंनीं ही जागा अति पवित्र झाली आहे.

तूं अपवित्र विचार काखोटीस मारून आंत शिरूं नकोस! दुष्ट कल्पना आपल्याबरोबर घेऊन येऊन तूं हें वातावरण बिघडविण्याचा यत्न करूं नकोस!

तुझ्या त्या घाणीमुळें या दृश्याच्या पवित्रतेवर कांहीं परिणाम होण्याचे अगो-दर पलीकडे नर्मदामाई वहाते आहे, तिजकडे जा, तिच्या पवित्रतेनें पवित्र हो, आणि नंतर मग आंत ये!"

या दृश्याच्या पावित्र्यानें अभिभूत होऊन हातचें कांहीं एक शिल्लक न ठेवतां निरहंकार वृत्तीनें अहल्येला नमस्कार करून वर किल्ल्यांत चढूं लागावें, तों अहल्या-बाईची एकेक स्मृति डोळ्यासमोर सरकूं लागते.—

हें भोजनगृह, इथें मोठमोठाले प्रतापी युद्धचतुर सरदार जेवून गेले, मराठेशाहीचे खांब इथें हात धुवून गेले. मल्हारबाबा, पाटीलबुवा शिंदे, राघोभरारी, एकाहून एक युद्धपटु संग्रामशूर इथें जेवून आंचवले; त्याबरोबरच मोरोपंतासारखे विद्वान, अनेक साधुसंतही इथें तृप्त होऊन अन्नदात्रीला भूरिभूरि आशीर्वाद देत इथून विश्रान्तिगृहाकडे गेले असतील.

हा अहल्याबाईचा वाडा, ही तिची बसावयाची गादी, इथें बसून ती न्यायप्रिय स्त्री आपल्या आवडत्या प्रजेचीं भांडणें तोडीत असे. इथेंच बसून तिनें भारतभर पसरलेल्या धर्मार्थ वास्तूंच्या बांधकामाचे हिशेब चुकविले.

हें अहल्याबाईचें देवघर, यांत बहुमूल्य बाण आहेत, बहुमूल्य मूर्ति आहेत, बहुमूल्य पूजेचीं उपकरणें आहेत—पण त्या बहुमूल्य वस्तूही ज्या एका भक्तीपुढें निष्प्रभ व्हाव्यात अशी नितान्त समर्पणमयी भक्ति, तिचा सुगंध हें आपल्या भोंवतालचें वातावरण पवित्र करून टाकीत चहूंकडे दरवळला आहे. ज्या भक्तियुक्त अंतःकरणानें अहल्येनें हा पूजासंभार जमविला ती

**मुख्यतस्तु भगवत्कृपया एव ।**

प्राप्त होणारी दुर्लभ वस्तु !

होय ! एके काळीं तिचें या ठिकाणीं वास्तव्य होतें. घंटेचा नाद जसा विरत विरत जाऊन सूक्ष्मतम प्रतिध्वनिरूपानें अतिविस्तीर्ण नादाकाशांत अवशिष्ट रहावा, त्याप्रमाणें ज्याच्या अंतःकरणाला क्षणमात्रही कोणाही जातीच्या भक्तीचा स्पर्श झाला असेल, त्याला हा अवशिष्ट राहिलेला सुगंध निश्चित जाणवेल. त्याच्या हृदयाकाशांत त्या परिमलाचें अस्तित्व स्फुरेल.

ही एक लहानशी तटांत असलेली खोली. हिला एकच झरोका आहे, बसल्यावर डोळ्यांसमोर येईल असा. आणि त्यांतून फक्त त्रिभुवनपावनी नर्मदाच दिसते ! या ठिकाणीं ती लाडकी लेक अहल्या केवळ आपली ती वत्सल माताच दिसावी, इतर सर्व दृष्टीसमोरून दिसेनासें व्हावें, या हेतूनें दिवसांतले कांहीं तास घालवीत असे.

तुम्हीही एक क्षणभर बसा या ठिकाणीं आणि नर्मदेकडे पहा. जर तुम्हीं मनांत आणलेंत तर—

कांहीं क्षणांत तुमचें इतस्ततः धांवणारें मन एकाग्र होईल. कारण त्याच्या दृष्टीसमोर त्याला एका अतिविस्तीर्ण आणि अतिगंभीर जलप्रवाहापलीकडे कांहींच

दिसणार नाहीं. त्या जलप्रवाहाचें वहाणें पहाण्याची संवय होऊन त्याबरोबर पहातां पहातां तेंही त्या अमोघ प्रवाहाशीं तद्रूप होऊन जाईल !

तो प्रवाह–

जो अमरकंटकाहून निघाला आणि आपल्या दों बाजूंनीं अनेकानेक तपश्चर्या-स्थलें निर्माण करीत भडोचला समुद्राशीं एकरूप झाला,

ज्यानें आपल्या अस्तित्वानें अति दुर्गम अशा वनप्रदेशांत मनोहर, प्रशान्त अशीं अनेक स्थानें घडविलीं आणि मनुष्याच्या श्रद्धेनें त्या स्थानांवर आपल्या शिल्पकलेचें कौतुक रचून मंदिरें उभारलीं, त्या सहस्रावधि मंदिरांच्या अस्तित्वानें हा सगळा प्रदेश पवित्र झाला.

तो प्रवाह, ती नर्मदामय्या, आणि तिची निरुपम, केवळ आपल्या मातेच्या सेवेचाच छंद असलेली, तिच्या सेवेंत विलीन होऊन आपलें स्वतःचें स्वतंत्र अस्तित्व उरूं न देणारी अशी लाडकी लेक अहल्या !

त्या दोघींच्या पवित्रतम संगमांत स्नान करून तुमचें मन त्या पावित्र्यानें अतिशुद्ध होऊन होऊन गर्जून उठेल–' जय नर्मदा ! ! ' ' जय अहल्या ! ! ! '

★ ★ ★

## ८ : घातिली रे पाणपोई !

पण मय्याची रूपमर्यादा एकटया महेश्वरांतच समाप्त झाली नाहीं. तिचें रूपवैचित्र्य अनन्त आहे, असीम आहे. दृष्टि फेंकाल तिकडे नवनवीं लेणीं ल्यालेल्या या मय्याचें रूपसौंदर्य दृष्टीस पडून तुमची दृक्शक्ति स्तिमित होऊन जाईल.

अन् हीं लेणीं–स्वरूपांत विविधता असेना का त्यांच्या, पण प्रत्येक लेणें आपापल्या अपूर्वाईनें लचलेलें दिसेल तुम्हांला. ही आई श्रीमंत आहे, एकदां ल्यालेलें लेणें परत ल्यायचें नाहीं, अशी पैजच मांडून जणूं काय तिनें हे एवढे साज आपल्या शरीरावर सजविले आहेत.

केवळ पावित्र्य, गांभीर्य, विस्तार, शुचिता, हींच काय तीं सगळीकडे सारखीं. हीच काय ती सगळीकडे समानता. आणि एकदां या सर्व रूपांत अव्यभिचारित्वानें भरून उरलेल्या गुणांबाहेर दृष्टि फेंकली, कीं मग त्या दृष्टीच्या प्रत्येक क्षेपागणीक असा अनुभव येईल कीं या अलौकिक वस्तूंच्या स्वरूपांत वैविध्याचा जणूं काय पूर आला आहे ! सृष्टिनिर्मात्याच्या कोशागारांत जितके म्हणून अलंकारांचे प्रकार आहेत, तितके सर्वच्या सर्व त्यानें आपल्या या प्रिय दुहितेच्या अंगावर घातले आहेत.

पण असेंही असेल कीं, पित्यानें घातलेले अलंकार या तपस्विनीला जणूं काय नकोसे होतात. ती प्रतिवर्षी आपल्या पावसाळ्यांतील जलशक्तिरूप असीम वैराग्याच्या उद्रेकासरशीं या अलंकारांपैकीं कांहीं अलंकार झुगारून देते आणि कदाचित् आपला पिता परत ते आपल्या अंगावर घालील, म्हणून कीं काय, त्यांना पार दूरवर समुद्रांत नेऊन फेंकून देते परत हिंवाळा येतो, आणि तिचा पिता आपल्या लाडक्या कन्येच्या औद्धत्याकडे दुर्लक्ष करून परत आपल्या कल्पनाशक्तीच्या साहाय्यानें नवनवे अलंकार घडवून आपल्या कन्यकेच्या अंगावर चढविण्याचा प्रयत्न करतो !

ही या मायलेंकरांतील स्पर्धा आज हजारों वर्षांपासून चालू आहे. कोणी कोणास हार जात नाहीं, कोणी या स्पर्धेतून अंग काढून घेत नाहीं.

पण या तपस्विनीला कांहीं आपल्या वैराग्यास साजेशीं लेणीं मात्र आवडलीं, तीं तिनें अगदीं जपून ठेवलीं आहेत ! त्यांतलेंच एक महेश्वर. पण एकटें महेश्वरच नव्हे, महेश्वरसारखीं अनेकानेक, मोजतांही येणार नाहींत इतकीं. आपापल्या परीनें प्रत्येकानें स्वतःचें स्वरूप परिपूर्णतया सजविलें आहे, एवढाही उणेपणा नाहीं !

महेश्वरच्या बांधकामाचें लोक कौतुक करतात, कारण तें अत्यद्भुत मानवी कौशल आहे. पण तपस्वी, विरागी, संन्यासी ? त्यांना महेश्वरापेक्षां विजन अधिक आवडतें. लोकान्तापेक्षां एकान्त अधिक आवडतो. जनसंमर्दापेक्षां शांत अरण्य अधिक पसंत पडतें. कारण एकान्तांत जणूं काय सद्‌विचार चहूंकडून उठाव करून मनुष्याच्या अंतःकरणांत प्रवेश करूं पहातात. आपल्या मृदुतम पावलांनीं चहूं बाजूंची शांतता यत्किंचितही न बिघडवितां ते त्या अंतःकरणाच्या दाराजवळ उभे राहून त्यावर आपलें साम्राज्य स्थापूं पाहणाऱ्या सद्‌भावनेस नम्रपणें विचारतात, " ताई, आम्ही येऊं तुझ्या घरीं ? आम्हांला मिळेल थोडीशी जागा ? "

विरागिनी सद्‌भावना स्निग्ध हंसूं हंसून त्यांचें स्वागत करीत म्हणते, " या ना ! तुम्हांकरतांच तर हें घर झाडून पुसून स्वच्छ करून ठेवीत आहें. या ! "

आणि म्हणून संन्याश्यांना विजन हवेंसें वाटतें. आपल्या लेंकरांविषयींच्या वात्सल्यानें अंतःकरण कांठोकांठ भरलेल्या नर्मदेनें तिच्या तटाकीं पाऊल घालाल तिथें निसर्गनिर्मित विजन सजवून ठेवलें आहे.

प्रत्येक स्थलांत कांहीं अपूर्वाई, दिव्यता अगदीं ठेंचून भरलेली आहे. एका ठिकाणीं तिनें खडकांचीच शोभा सजविली. खडक ते काय, आणि त्यांची शोभा ती काय निर्माण व्हायची ? पण नर्मदेचें सर्वच अलौकिक ! तिनें आपल्या पित्याच्या भांडारांतून असे मनोरम, नजरेस पडतांच चित्ताची खळखळ शमवून त्यावरील कल्पनातरंगांच्या लाटा हळूहळू जिरविणारे रंग आणले, कीं ज्यांच्यांत भडकपणा नाहीं पण सौंदर्य आहे; अतिशयपणा नाहीं पण सहजता आहे; कठोरपणा नाहीं पण परिणामकारी परिवर्तनशक्ति आहे. आणि अशा रंगांनीं तिनें ते खडक रंगविले. त्या खडकांच्या रंगांच्या मीलनाकडे लक्ष गेलें रे गेलें, त्यांनीं आपले दैवी रंग एकवटून जी अलौकिक दैवी शोभा रचूं घातली आहे, तिच्याशीं चित्तवृत्ति तदाकार झाली रे

झाली, कीं तोंपर्यंत तिच्याभोंवतीं पिंगा घालणारे असद्विचार हळू हळू काढता पाय घेऊं लागले म्हणून खुशाल समजावें !

दुसऱ्या ठिकाणीं आपला तटाक मनोरम करण्याकरितां माईनें वृक्षांचें साहाय्य घेतलें. नानाप्रकारचे वृक्ष. कोणी जमिनीशीं गुलुगुलु गोष्टी बोलणारे, तर कोणी आकाशाचा ठाव घेऊं पाहणारे. कोणी आपल्या लहानशा आकारांतच आपला विस्तार ठाकठिकीनें सामावून बसलेले, तर कोणी विस्ताराचे बाबतींत पर्वतांशीं स्पर्धा करूं पाहणारे. कुणाचीं खोडें इतकीं बारीक, कीं ते वृक्ष वाळून उन्मळून पडल्यावर त्या बुडखांचा उपयोग कुणा संन्याश्यानें आपला दण्ड करण्याकरितां करावा; तर कुणाचीं खोडें इतक्या विस्तृत आकाराचीं कीं त्यांच्या ढोलींतून एकाद्या परिक्रमावासीयानें खुशाल रात्रभर वास्तव्य करावें. कोणी एवढे लहान कीं त्यांच्या छायेंत मोठ्या मुष्किलीनें एखाद्या तपस्व्याला आपलें अंग संकुचित करून घेऊन बसायला जेमतेम जागा मिळावी. तर कुणाच्या छायेच्या विस्तारांत एखादी दहावीस हजार लोकांची यात्रा अगदीं आपल्या गाडीबैलांसुद्धां खुशाल उतरावी.

आणि त्यांच्या पानांचे रंग ? वाः ! त्यांचें कौतुक काय वर्णन करावें ? चित्र-काराच्या पेटींतही नसतील, त्याला आपलें सर्व कौशल्य खर्ची घालून निरनिराळ्या रंगांचें सामंजस्य साधतां येणार नाहीं, असे नानाविध रंग अगदीं सहजतया या वृक्षांनीं एकत्र करून त्या रंगांनीं आपापलीं शरीरें नटविलीं आहेत. पण त्यांपैकीं एकांतही उत्तानता नाहीं, दृष्टीस पडतांक्षणीं चित्तवृत्ति विक्षेपित होईल, असा उथळपणा एका-जवळही नाहीं. प्रत्येक रंग अगदीं सहजतया, जणूं काय त्या पानाच्या अंतर्भागांतून निघून पानभर पसरला आहे, आणि आपल्या अस्तित्वानें भोंवतालचा एकंदर पवित्रतेचा सुगंध, जणूं काय त्याची वृद्धीच करीत आहे.

तिसऱ्या ठिकाणीं नर्मदा द्वीपांचें लेणें ल्यालेली. छोटीं छोटीं द्वीपें. जेमतेम एक मनुष्य ध्यानास बसूं शकावा, असा आकार. पण तेवढींच तीं बेटें हिरवळीनें अशीं कांहीं सुशोभित झालेलीं ! नर्मदेच्या तटाकापासून दूर उभें राहून पहावें तर असेंच भासतें कीं जणूं काय नर्मदेचें निळसर हिरवें पाणी व मध्येंच पसरलेलीं भडक हिरवीगार छोटीं छोटीं असंख्य द्वीपें, याच्यामुळें रंगवैचित्र्य निर्माण झालेला हा एखादा गालिचाच पसरला आहे कुणींतरी. त्याचे कांठ किनाऱ्यावरच्या मातीच्या रंगाचे. आणि हा एवढा मोठा गालिचा पसरून नर्मदा आपल्या लाडक्या तपस्वी

लेंकरांना इथें वसून एकाग्र होण्याकरितां स्नेहानें आवाहन करीत आहे; असें म्हणत आहे कीं, " इथें या, आणि एकाग्र व्हा ! "

त्यानंतर कुठें वालुकासमूह पसरलेले. अतिविस्तीर्ण, पांढरे शुभ्र, अगदीं नजर फेंकाल तिकडे चहूंकडचा प्रांत व्यापून पलीकडे धांव घेणारे. ती वाळूही अगदीं बारीक, तेजस्वी, मूठ भरून घेतली, तर भुळुभुळु गळणारी. वर ठेवलेला प्रत्येक पाय भस्‌दिशीं खोलवर जावा. जणूं काय त्याला असेंच म्हणायचें आहे, " तपस्व्यांनो, तुमच्या मनांतील सद्‌विचार मजसारखेच स्वच्छ, तेजस्वी आणि विपुल असूं देत. त्यांची संख्या अपरिमित असूं दे.—अगदीं माझ्या या कणांएवढी. "

त्यानंतर एखाद्या जागीं नर्मदेच्या जलप्रपाताचीच अलौकिक शोभा, तर कुठें नर्मदेच्या अतिवेगानें वाहणाऱ्या जलाचा ध्वनि एक घनगंभीर आवाज चहूंकडे पसरवीत तटाकीं उभ्या असलेल्या तपस्व्याचें लक्ष एकाग्र करूं पाहणारा. कुठें असीम, अपरिमित असा तळाची खोली न उमगणारा जलाशय, तर कुठें झुळुझुळु प्रसन्नपणें वाहणारें नर्मदेचें परिमित जल.

या अनेकानेक स्थळांपैकीं कुठेंही जा. कोणत्याही प्रांतांत पाऊल घाला आणि आपल्या मनोवृत्तींचे बांध मोकळे सोडा. जरा क्षणभर त्यांच्या भोंवतालचीं बंधनें काढून घ्या मग तुम्हांला असा अनुभव येईल कीं, एरवीं क्षणाचीही विश्रांति न घेतां वाऱ्यालाही लाजवीत इतस्ततः धांवणाऱ्या या अंतःकरणप्रवृत्ति आतां जा म्हटलें असतांही कुठें जायचें मनावर घेत नाहींत ! हांकून घातल्या असतांही बाहेर पाऊल घालीत नाहींत ! त्यांचें चांचल्य जिरलें, त्यांचा अस्थिरपणा विरला, त्यांची खळबळ शांत झाली. आणि हळूहळू त्या सगळ्या नर्मदेच्या या परम तेजस्वी परिसराशीं तद्रूप होऊं पहात आहेत.

हें क्षेत्र सर्वांस मोकळें आहे. इथें कुणालाही प्रतिबंध नाहीं. इथें येण्यास कुणाच्याही अनुज्ञेची आवश्यकता नाहीं. ज्याचें भाग्य इतकें मोठें असेल, ज्याचें सुदैव त्याला हांकारीत असेल, असा प्रत्येक मनुष्य या आईजवळ जाईल. तिचें दर सर्वांकरितां मोकळें आहे—!

अगदीं सर्वांकरितां. प्रत्येकानें आपापलें दुःख या जगन्मातेला जाऊन सांगावें. प्रत्येकानें या आईच्या कुशींत बसून आपली कथा तिला सांगावी. प्रत्येकानें आपला हृत्ताप या आईच्या कानीं गुजगुजावा.

मग तें दुःख आध्यात्मिक असूं दे, आधिभौतिक असूं दे, आधिदैविक असूं दे. त्या प्रत्येक तप्ताला या ठिकाणीं शांतिलाभ होईल. ही पाणपोई आहे, हें सदावर्त आहे. " सदावर्तातलें मी कसें खाऊं ? " असा संकोच करायचें येथें कारण नाहीं. कारण हें सदावर्त, ही पाणपोई आपल्या आईची आहे. हें सगळें आपलें, अगदीं आपलें स्वतःचें आहे.

याच ठिकाणीं, याच आईच्या कुशींत अनेकानेक महर्षि, अनेक वृद्ध राजर्षि, अनेक तपस्वी, अनेक ब्रह्मचारी, समाजाच्या कल्याणाची अहर्निश चिंता वहाणारे अनेक मुनि, त्याच्या हिताकरितां शिरें तळहातीं घेऊन ब्रह्मांडाचा भेद करूं पाहणारे अनेक क्षत्रिय, असे नानाविध लोक आपापलीं दुःखें, आपापले संकल्प, आपापल्या आकांक्षा, आपापल्या इच्छा बरोबर घेऊन आले आहेत. आपलीं त्रिविध प्रकारचीं दुःखें त्यांनीं हिच्याजवळ निःसंकोच मनानें सांगितलीं आहेत.

आणि या आईनें, या जगन्माउलीनें त्यांपैकीं प्रत्येकाचें दुःख अगदीं परम स्नेहानें, पराकाष्ठेच्या आपुलकीनें ऐकून घेतलें आहे आणि तितक्याच ममतेनें तिनें त्यांच्या पाठीवरून मायेचा हात फिरवून त्यांना मार्गदर्शन केलें आहे.

ही तिची मार्गदर्शनशक्ति अजून क्षीण झाली नाहीं, पुढेंही होणार नाहीं.

आजही ती आध्यात्मिक तापानें तापलेल्याला म्हणेल, " ये, लेंकरा, इथें माझ्या कुशींत ये ! असा जवळ बस ! काय पाहिजे तुला ? चित्तैकाग्र्य पाहिजे ? आध्यात्मिक मोक्ष पाहिजे ?

तर मग तुझें चित्त माझ्या या विस्तीर्ण स्वरूपाशीं एकरस होऊं दे. तुझा वैयक्तिक अहंकार माझ्या या असीम विस्ताराशीं एकरूप होऊं दे. तुझें मन माझ्या या मोठेपणाएवढें मोठें होऊं दे. टाकून दे ती क्षुद्रता. सोडून दे तें व्यक्तित्वाचें ओंगळ पांघरूण. गळूं दे तें परिच्छिन्नत्वाचें शरीर. नष्ट होऊं दे ती व्यष्टित्वाची जुनी घोंगडी. त्या सगळ्या हीन, दीन, दुर्बल, आपल्या हातानेंच आपल्या गळ्यांत खोडा अडकविणाऱ्या कल्पना एका झेंपेसरशीं झुगारून दे ! तें सर्व जीर्ण, शीर्ण, गलितगात्र मीपण एका झपाट्यासरशीं भिरकावून दे. आणि मग या माझ्या " भूमा " स्वरूपाशीं एकाकार हो ! "

ती अधिभौतिक तापानें तापलेल्याला म्हणेल, " ये ! इथें माझ्या या विशुद्ध वातावरणांत येऊन बैस. इथें या निसर्गाच्या सान्निध्यांत येऊन विश्राम घे थोडासा.

तूं आजारी आहेस? काय झालें आहे तुला? अन्न पचत नाहीं? माझ्या तटाकीं हिंड थोडासा. माझ्या तटींचे हे पहाड चढ आणि उतर एकदां. माझ्या पाण्यांत भरपूर अंघोळ कर एकदां. आणि मग जेवणाकरितां पाटावर जाऊन बस. तुला असा अनुभव येईल कीं अनेक वर्षांत लागली नाहीं अशी भूक मला लागली आहे.

तुला काय अन्नाभावामुळें क्षीणता आली आहे? खायला न मिळाल्यामुळें तूं असा दुर्बल झाला आहेस? चल मजबरोबर गुजराथेंत. तिथें माझ्या तटाकींचे मायाळू शेतकरी तुला पोटभर जेवूं घालतील. ते तुझी सर्व प्रकारें काळजी वहातील. माझ्या सुपीक तटाकीं अनेकानेक वर्षें वास्तव्य केल्यामुळें त्यांचीं मनें अति उदार झालीं आहेत. तुला पहातांक्षणीं ते तुला आपला म्हणून तुझी चिंता वहातील."

ती आधिदैविक तापानें तापलेल्यांना म्हणेल, "तुला काय झालें? कोणती दैवी आपत्ति कोसळली तुझ्यावर? वीज कोसळली? पुरांत घर वाहून गेलें? रोगाचा फटका बसून घरचीं माणसें मेलीं?

ये इकडे असा मजजवळ. हे माझ्या तटाकीं अनेकानेक आधिदैविक तप्त बसले आहेत. हे सगळे तुझ्यासारखेच आहेत. हे सगळे तुझे भाऊ आहेत. यांचीं दुःखें ऐकून तुझें दुःख निश्चित कमी होईल. आणि हा सगळा समाज तुझा आहे; याच्या सुखदुःखाशीं समरस होऊन पहा. तुला असें आढळेल कीं, 'माझें व्यक्तीचें दुःख आतां कमी होत आहे. या सगळयांच्या सुखदुःखांशीं एकरूप झाल्यामुळें माझी सहनशक्ति वाढलेली आहे. आतां मी अधिक दुःखांचा भार सहन करण्यास समर्थ झालों आहें.' आणि मग तुला तुझ्या व्यक्तीच्या सुखदुःखांचें कांहींही वाटणार नाहीं.'

नंतर हिच्या ह्या स्नेहाळ उपचारांनीं मन स्थिर झालेला प्रत्येक तपस्वी— तो बलिष्ठ, भूयिष्ठ, ओजस्वी, तेजस्वी आणि समाजकल्याणाकरितां कटिबद्ध झालेला, असा होऊन परत समाजाकडे वळेल. तो परत एकदां समाजसन्मुख होईल. "बहु-जनहिताय बहुजनसुखाय" आपलें हें क्षुद्र शरीर यत्किंचित् मोह निर्माण होऊं न देतां तो या विश्वांत चाललेल्या जीवनयुद्धांत झोंकून देईल.

त्याच्या मनांत स्वतःविषयीं यत्किंचितही कार्पण्य निर्माण होणार नाहीं. तो कायावाचामनानें सर्वस्वीं उदार होऊन समाजकल्याणाचें कंकण हातीं बांधून पाऊल घालील तिकडे दिशा उजळवीत आणि हा आईनें सांगितलेला संदेश प्रत्येकाचे कानीं ऐकवीत समाजांत असा मिसळून जाईल, असा एकरूप होऊन जाईल,

कीं मग शोधूनही तो वेगळा असा सांपडूं शकणार नाहीं!

★ ★ ★

## ९ : तस्मात्

तस्मात् ज्याच्या ज्याच्या मनीं या अतिपुरातन, अतिप्राचीन, वृद्ध भारताविषयीं आपुलकी असेल, ज्याचें अंतःकरण या भारताची प्राचीन दिव्य परंपरा स्मरून त्या स्मरणानें भारावून गेलें असेल, या भारताकरितां अनेकानेकांनीं केलेला असीम अपूर्व त्याग आठवून त्या त्यागाची महानता, गुरुता अनुभवून ज्याच्या नेत्रांचीं पातीं एकदां तरी ओलीं झालीं असतील,

आणि त्यावरोबरच या भारताच्या अति तेजस्वी भारतीय संस्कृतिबद्दल ज्याला जिव्हाळा वाटत असेल, त्या संस्कृतीच्या प्राचीन वैभवाचें व विस्ताराचें ज्याला कौतुक वाटत असेल, तिचा तो विजयी विस्तार आपणास " येचि डोळां " पाहतां आला नाहीं, याबद्दल ज्याचें अंतःकरण तिळतिळ तुटत असेल, त्या परमपावन संस्कृतीला तिच्या पुरातन स्थानावर पाहण्याकरितां ज्याचे नेत्र उत्सुक झाले असतील, त्याकरितां पडेल तो त्याग करण्याची ज्याची सिद्धता असेल, ज्याचें मन संस्कृतिमातेच्या पुनरुत्थापनाचा तो भव्य सोहळा पाहण्यास आतुर झालें असेल,

त्या संस्कृतिमातेच्या कुशींत बसून तिच्या या थोरवीचें अंतरंग जाणून घेण्यास जो उत्सुक झाला असेल, तिच्या या महत्तम गौरवशीलत्वाचें कारण जाणून घ्यावें असे भाव ज्याच्या अंतरांत जागृत झाले असतील,

अशा प्रत्येकानें वर्षांतून कांहीं दिवस, निदान आयुष्यांतील कांहीं दिवस तरी कमींतकमी या नर्मदामय्याच्या तटाकीं घालवावेत. हिच्या जवळ एकटें, अगदीं एकटें बसून हिचें स्तन्यपान करावें. इचा तो स्नेहाळ पान्हा आकण्ठ, पोट भरून प्यावा. ती कोणालाही " नाहीं " म्हणणार नाहीं.

कारण हिनें आजपर्यंत अनेकांस आपलें स्तन्य पाजून हृष्ट, पुष्ट, तेजस्वी

आणि समाजकल्याणप्रवण केलें आहे, त्यांना परत एकदां लोकसंग्रहाकरितां समाजांत परत पाठविलें आहे.

त्या अनेकांची परंपरा फार जुनी आहे. फारच जुनी. मला माहीत नाहीं, इतकी. कोण जाणे किती वर्षें झालीं, तेव्हांपासून ही लोकमाता आपल्या लेंकरांना लोककल्याणाकरितां आपल्या जवळून धाडीत आहे.

मला माहीत आहे मार्कंडेय. जनकल्याणाकरितां लोकसेवेचें कंकण हातीं बांधून घराबाहेर पडलेला तो ऋषिपुत्र, नर्मदेनें त्याला ठाव दिला.

मला माहीत आहेत भगवान् शंकराचार्य आणि त्यांचे गुरुदेव गोविंदयति. नर्मदेच्या तटाकीं ब्रह्माणीला अनेक ऋषींनीं सिद्ध केलेला परिपाक आत्मसात् करून पचविण्यांत तल्लीन झालेले गोविंदयति, दक्षिणेंतून जणूं काय पूर्वयोजनेप्रमाणेंच एक देदीप्यमान तेजस्वी ज्योत आपल्या मार्गांतील अज्ञानांधकार पळवून लावीत ब्रह्माणीस आली आणि गोविंदयतींच्या चरणीं लीन झाली ! श्रीगुरूंनीं त्या ज्योतीला स्वतःच्या ज्योतीशीं तद्रूप करवून घेतलें. शक्तिपात करून त्यांनीं आपलें तेज त्या ज्योतीला दिलें ! ज्या कुणाला तो दिव्य आत्मसाक्षात्काराचा अनुभव प्रत्यक्ष पहावयास मिळाला असेल, मला कळतील का त्यांचीं नांवें ? मी घेऊं शकेन का त्यांचें दर्शन ? एकदांच ! केवळ एकदांच !

जाऊं द्या. तर गोविंदयतींनीं आपण सिद्ध केलेला आत्मानुभव अगदीं सहजतया आपल्या या शिष्याचे, भगवान् शंकराचार्यांचे हातीं सोंपविला. आणि तो तेजस्वी आत्मानुभव, त्याचा पोत पाजळीत भगवान् शंकर देशभर धांवत सुटले. उत्तरेस काश्मीरपासून दक्षिणेस कुमारीपर्यंत; पूर्वेस जगन्नाथापासून पश्चिमेस द्वारकेपर्यंत. सबंध देश त्यांनीं पालथा घातला. सबंध समाज हलवून जागा केला. "अनुष्ठातॄणां कामोद्भवात्—" धर्मावर धुळीचीं पुटें चढूं पाहत होतीं, दिव्य वैदिक धर्माचें, तेजस्वी भारतीय संस्कृतीचें तेज मळूं पहात होतें; अक्षरशः हाडांचीं काडें करून या विरागी संन्याश्यानें ती भारतीय संस्कृति परत एकदां तिच्या पूर्वस्थानीं नेऊन बसविली.

आणि या अतिशयतेची परिसीमा गांठलेल्या परिश्रमांनीं त्या संन्याश्याला आपलें आयुष्य बत्तिसाव्या, केवळ बत्तिसाव्या वर्षी संपवावें लागलें !

अरे हो ! अगदींच कसा विसरलों ? माझे श्रीराम ! दक्षिणेंतील ऋषिकुलांचा उद्धार करण्याकरितां, दक्षिणेकडून भारतीय संस्कृतीवर होत असलेलीं आक्रमणें स्वतःच्या पुष्ट बाहूंनीं थोपवून धरण्याकरितां कैकेयीच्या शापाचें मिष करून जेव्हां

मर्यादापुरुषोत्तम श्रीराम अयोध्येंतून निघाले असतील, तेव्हां त्यांचेबरोबर असेल लक्ष्मण आणि कोमलतनु, सुकुमारी अशी सीतामाई.

त्यांचें वास्तव्य निश्चितच या नर्मदामय्याच्या तटाकीं झालें असेल. खचितच त्यांनीं या आईच्या प्रसन्नतादायी जलांत भरपूर स्नान केलें असेल. त्या तिघांनींही. आणि मग या आईच्या जलाचे अर्घ्य दिले असतील. सीतामाई या मय्याचा अपूर्व विस्तार पाहून आनंदानें हरिखली असेल. नंतर मग त्यांनीं हिच्या तटाकींचीं फळें गोळा करून खाल्लीं असतील, हिच्या तटाकीं विश्राम केला असेल आणि मग आपल्या त्या महान् कृत्याकरितां दक्षिणेंत पदक्षेप केला असेल.

आणि या नर्मदामय्याच्या तटाकीं वसलेलें गढामंडला. तेथील राजानें एक लहानशी मुलगी आपली सून करून आपल्या घरीं आणली, ती हिच्या तटाकीं खेळली. हिच्या तटाकीं तिनें नाना प्रकारच्या क्रीडा केल्या. हिचें पाणी प्याली. हिच्या कुशींत निर्धास्तपणें आपलें डोकें ठेऊन झोंपली. आणि मग मोठेपणीं या नर्मदामय्याच्या तटाकीं परिपुष्ट झालेल्या संस्कृतीचा मानबिंदु जो भगवा ध्वज, त्या भगव्या ध्वजाच्या गौरवाच्या संरक्षणाकरितां ही दुर्गाराणी अक्षरशः रणचंडीचें स्वरूप धारण करून, असुरसंहारिणी कालीमातेचा, दुर्गेचा वेश सजून युद्धक्षेत्रांत अवतीर्ण झाली, आणि आपल्या त्या परमनिशित खड्गास अनेकानेक म्लेंच्छांचें रक्त पाजून शेवटीं त्या युद्धांतच महाविश्रामाची वाट चालूं लागली !

आणीक एक महान् कर्तृत्वशाली पुरुष ! पंजाबांतील आपल्या संचारानें ज्यानें या भारतीय संस्कृतीच्या घरांत सांचलेलीं जळमटें झाडून टाकून तें घर सुखानें राहण्याजोगें केलें, आपल्या शिष्यवर्गाचे हातून शस्त्रें पेलवून ज्यानें तिथें हिंदुधर्मावर होत असलेल्या अत्याचारांस योग्य, आक्रमकांना समजेल अशा भाषेंत उत्तर दिलें, तो महापुरुष गुरु गोविंदसिंह, धर्मरक्षणाकरितां आपल्या चार सोनुल्यांचें मूल्य देऊनही धर्मविस्ताराकरितां अहर्निश तिळतिळ रक्त आटविणारा शिखांचा तो दशम गुरु जेव्हां दक्षिणेंत निघाला, तेव्हां त्यानें या मय्याच्या तटाकीं आपला 'पडाव' टाकला असेल. या मय्याच्या स्नानानें त्याचे श्रम दूर झाले असतील. हिच्या पवित्र जलानें 'कडाई' शिजवून त्यानें भोजन केलें असेल. आणि हिला साष्टांग प्रणिपात करीत हिचा निरोप घेऊन तो दक्षिणेंत पुढें निघाला असेल.

त्यानंतर परमप्रतापी, प्रतिसूर्य, यवनान्तक, क्षत्रिय कुलावतंस छत्रपति शिवाजीराजे ! जेव्हां त्यांनीं जयसिंगाशीं हितगुज करून पितृघातक म्लेंच्छास गादी-

वरून ओढून त्याचा वध करण्याकरितां आणि हा सबंध भारतवर्ष यवनांच्या आसुरी राजसत्तेपासून सर्वथा मुक्त करण्याकरितां आम्यास जाण्याचें निश्चित केलें असेल, त्या संकल्पाप्रमाणें बरोबर प्रत्यक्ष काळाशींही झुंज देणारे जिवलग सखे असे सैनिक व परम प्रतापी "गैरिक" ध्वज घेऊन जेव्हां ते त्या अपूर्व, असीम, अलौकिक साहसाच्या पूर्ततेसाठीं उत्तरेंत निघाले असतील,

तेव्हां त्यांनीं निश्चितच या मय्याच्या तटाकीं कुठें तरी मुक्काम केला असेल. रात्रींच्या प्रशांत समयीं या मय्याच्या वाळवंटांत कदाचित् एकटेंच बसून त्यांनीं आपलें तें गुज, आपलें तें महान् साहस या आईला उकलवून दाखविलें असेल. तिच्याजवळ त्याच्या पूर्ततेकरितां आशीर्वाद मागितेला असेल. अथवा आपले चार-सहा अगदीं अंतरंग-मित्र बरोबर घेऊन ते हिच्या तटाकीं रात्रींच्या चांदण्यांत बसले असतील व या मय्याला साक्ष ठेऊन त्यांनीं आपला तो साहसी संकल्प पुनः एकदां बोलून दाखविला असेल !

आणि दुर्दैवानें त्या साहसांत अयशस्वी होऊन जेव्हां छत्रपति वैराग्याचे वेशांत आम्याहून परत फिरले, तेव्हां त्यांनीं निश्चितच "नर्मदे हर !" हा अलख गाजवीत हिचें स्नान केलें असेल, हिचें स्तन्य पिऊन, त्या स्तन्यानें अंगीं उत्साहाचें वारें संचरून ते परत एकदां दक्षिणेंत निघाले असतील.

महाराजा छत्रसाल ! जेव्हां चम्पतरायाचा तो परमतेजस्वी पुत्र बुंदेलखंडाचा तो अभिमानविषय दक्षिणेंत छत्रपति शिवाजी महाराजांस भेटण्याकरितां, त्यांच्याशीं स्वातंत्र्यसंगराचें हितगुज करण्याकरितां एकटाच निघाला असेल, तेव्हां त्यानें या मय्याच्या तटाकीं एखाद्या भिल्लाच्या दाराशीं आपला घोडा बांधून त्याचे झोंपडींत आपला मुक्काम केला असेल. रात्रीं एकटाच या आईच्या तटाकावर असलेल्या एखाद्या खडकावर बसून महाराजांबरोबर होणाऱ्या भेटीच्या सुखदायी कल्पनेनें त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले असतील. आणि जेव्हां महाराजांकडून स्वातंत्र्याच्या परमोज्ज्वल मंत्रानें भारून तो परत निघाला असेल, तेव्हां परत याच आईजवळ स्वातंत्र्ययुद्धाचा संकल्प करून त्यानें बुंदेलखंडांत प्रवेश केला असेल !

आणि पेशवा बाजीराव ! तो परम तेजस्वी खड्‌गधारी, परशुरामवंशीय ब्राह्मण तर चिरविश्रान्तीकरितांही आईच्या तटाकीं असलेल्या रावेरखेडीस आला ! आपल्या आयुष्यांत अनेक वेळां त्यानें ही नर्मदामय्या ओलांडली. ज्यांच्या धाकानें दिल्लीच्या पातशहाच्या मत्त हत्तींनींही तोंडचा घांस पटकन् खालीं टाकावा, अशा त्या भिम-

थडीच्या तट्टांवर आरूढ झालेले परमप्रतापी ठेंगण्या बांध्याचे हिंदु सैनिकवीर बरोबर घेऊन अनेक वेळां त्यानें या आईच्या तटाकीं आपली छावणी घातली असेल. अनेक वेळां या मय्याच्या अथांग पाण्यांत त्यानें जलविहार केला असेल. त्यानें या आईच्या तटाकावर अनेक रात्री हिंदुसाम्राज्याचीं भव्य, दिव्य स्वप्नें पाहात व्यतीत केल्या असतील.

आणि जेव्हां त्याला असा अनुभव आला कीं जन्मभरच्या अविश्रांत परिश्रमांनीं शरीर जीर्ण शीर्ण झालें आहे, अल्पवयांतच मृत्यूच्या भेरींचे पडसाद कानीं पडूं लागले आहेत, तेव्हां तो परत एकदां तो अज्ञेय पंथ आक्रमिण्याकरितां हिच्याच तटाकीं आला. एके दिवशीं त्यानें हिचेंच शेवटील स्नान केलें. आणि मग सर्व आप्तवर्ग दूरवर पुण्यास राहिलेला, जवळ जिव्हाळ्याचें असें कोणीही नाहीं, अशा अवस्थेंत त्यानें या मय्याच्या कुशींतच आपलें मस्तक ठेऊन शेवटील श्वास घेतला ! हिच्याच कुशींत आपलें शरीर ठेऊन देऊन त्याचा आत्मा परलोकाची अज्ञात वाट चालूं लागला !

मल्हारराव होळकर ! तो धनगर म्हातारा तर अनेक वर्षें हिच्या तटाकीं वास्तव्य करून होता. त्याचे " बासंडा " हातीं धरणारे परमप्रतापी घोडेस्वार, कित्येक वेळां त्यांनीं आपली छावणी या मय्याच्या तटाकीं घातली असेल. त्या म्हाताऱ्यानें जो आपल्या पराक्रमानें सबंध हिंदुस्थान हालवून सोडला, यवन सेनेच्या मनांत अनेक वेळां त्यानें जो थरकांप निर्माण केला, तें सर्व कर्तृत्व या नर्मदामय्याचें स्तन्य पिऊनच त्याचे अंगीं निर्माण झालें होतें !

त्याची परम साध्वी सून अहल्या ! पण जाऊं द्या.' मागें एकदां तिचें वर्णन येऊन गेलें आहे.

त्यानंतर पाटीलबाबा महादजी शिंदे जेव्हां दिल्ली पादाक्रांत करून, दिल्लीच्या पातशहास आपल्या अंगुलीच्या इशाऱ्यानें नाचणारें बाहुलें बनवून, जेव्हां त्याचे जवळून गौरवाचीं वस्त्रें घेऊन विजयी पताका नाचवीत तीं वस्त्रें दक्षिणेंत आपल्या राजाच्या प्रतिनिधीस अर्पण करण्याकरितां निघाले, तेव्हां त्यांनीं एक रात्र या मय्याच्या तटाकीं विश्रांति घेतली असेल.

त्यांच्या सैनिकांच्या कलरवानें हा तटाक गजबजून गेला असेल. त्या सैनिकांच्या अश्वांच्या खिंकाळण्यानें हा प्रांत निनादून गेला असेल. त्यांच्या बरोबरच्या मत्त गजांनीं या मय्याच्या अथांग डोहांत मनसोक्त जलक्रीडा केली असेल. आपल्या

प्रबल शुंडांनीं त्यांनीं या मय्याचें जल आकाशांत इतस्ततः उडविलें असेल. परम कृतज्ञतेनें पाटील बावांनीं या मय्यास अनेकानेक प्रणिपात केले असतील !

आणि भाऊराव–विश्वासरावांची जोडी ! असीम आवेशानें भाऊराव पेशवे बरोबर दोन लक्ष सेना व कबिला घेऊन पानिपतास निघाले, तेव्हां त्या अफाट सेनासमूहाचा विश्रामही एक रात्र या नर्मदामय्याच्या तटाकावर झाला असेल. हिच्या जलानें आपली तहान भागवून तें सर्व सैन्य भावी विजयाच्या आशेनें प्रफुल्लान्तःकरण होऊन पुढें निघालें असेल !

हे तर वीर मरुतांचे समूह झाले ! भारतीय संस्कृतीचा दिव्य संदेश प्रत्येकाच्या कानीं पोंचविण्याकरितां जेव्हां अनेकानेक साधुसंत, ज्ञानेश्वरांपासून तों रामदासांपर्यंत सगळे, भारतभ्रमणाकरितां निघाले असतील, तेव्हां त्यांनीं निश्चितच या आईच्या तटाकावर चारसहा दिवस, कदाचित् अधिकही मुक्काम केला असेल. जेव्हां या तटाकावर त्यांची परस्परांशीं भेट झाली असेल, तेव्हां परस्परांच्या आत्मानुभवाचें गुज त्यांनीं परस्परांस याच तटाकीं सांगितलें असेल. कदाचित् त्या आत्मानुभवाच्या रंगांत उन्मत्त होऊन ते या आईच्या तटाकीं नाचलेही असतील. ही आई आपल्या लेंकरांचा तो आत्मानंद पाहून पुलकित झाली असेल. तिच्या शरीरावर रोमांच तरंगित झाले असतील.

ही परंपरा अजूनही खंडित झालेली नाहीं. काल हिच्या तटाकीं स्वामी वासुदेवानंद सरस्वती आपल्यास आलेला आत्मानुभव मुठी भरभरून वांटीत समाजकल्याणाकरितां शरीर तिळतिळ झिजवीत हिंडले, आणि शेवटीं गरुडेश्वरीं त्यांनीं आईच्या कुशींत देह ठेवला !

आजही वीतरागी संन्यासी पूजनीय गुरुदेव शंकरानंद भारती आणि दुसरेही अनेक तपस्वी " बहुजनहिताय " तेथें विचरण करीत आहेत. हें शरीर, त्याचा प्रत्येक कण न् कण समाजकल्याणार्थ खर्च व्हावा अशी आंतरिक इच्छा धारण करणारे अनेकानेक तपस्वी अगदीं आजही या आईजवळ आशीर्वादाची अपेक्षा करीत तपश्चर्या करीत बसले आहेत. भारतीय संस्कृतीचा परमतेजस्वी संदेश शांतपणें, ढोलकीं न वाजवितां समाजाच्या कानीं पोंचविण्याकरितां अनेक तपस्वी आजही आईजवळ हे पाठ शिकत आहेत.

आणि ती आजही बोलावीत आहे !

तिची हांक ऐकूं येईल, त्या प्रत्येकाला ! या भारतीची ही मौन भाषा ज्याला उमगूं शकेल त्याला ! भारतीय संस्कृतीच्या पुनरुद्धाराकरितां अनेकानेक तपस्व्यांची, अनेकानेक ब्राह्मणांची, अनेकानेक क्षत्रियांची, अनेकानेक वैश्यांची, अनेकानेक शूद्रांची नर्मदामाई आतुर अंतःकरणानें वाट पाहत आहे !

तिला त्यागजीवी ब्राह्मण हवे आहेत. तिला पराक्रमी क्षत्रिय हवे आहेत. तिला निस्पृह वैश्य हवे आहेत. तिला कष्टाळू शूद्र हवे आहेत.

ती अगदीं आतुर झाली आहे ! डोळ्यांत प्राण आणून ती आपल्या लेंकरांची वाट पाहत आहे ! अनेक ऋषींनीं केलेल्या तपश्चर्येचा परिपाक दों दों हातांनीं मुक्तपणें आपल्या लेंकरांस वांटण्याकरितां ती परम उत्सुक झाली आहे. हा परिपाक सांभाळूं शकतील, त्याची जोपासना करूं शकतील, अशा लेंकरांची ती वाट पाहत आहे. अगदीं अधीर झाली आहे ती.

ज्याला ऋजु अंतःकरण घेऊन तिजजवळ जातां येईल, अशा प्रत्येकानें तिच्याजवळ जावें, तिच्या कुशींत बसावें, अगदीं निःसंकोच मनानें !

कारण ती आपली आई आहे.

आणि मग तिच्या जवळून भारतीय संस्कृतीच्या पुनरुद्धाराचा तो परमतेजस्वी मंत्र घेऊन प्रत्येकानें समाजसन्मुख होऊन परत फिरावें,

अगदीं प्रत्येकानें !